# अमृतगुटिका

(चांगदेव पासष्टी : भाव संवाद)

लेखक

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे**

आनंदोत्सव
प्रकाशन मंच

प्रकाशक
चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

**अमृतगुटिका**
**(चांगदेव पासष्टी : भाव संवाद)**
**AMRITGUTIKA**
**(Changdev Pasashti : Bhav Sanvad)**

**लेखक : प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

सर्व हक्क स्वाधीन : **सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक :** आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (0241) 2424167
M. 9881500942
Web- www.anilsahasrabuddhe.in
Email- usahasrabuddhe@gmail.com

**प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२१**

**टाईपसेटींग**
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक :** मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

**मुखपृष्ठ :** विराज बिज्जा, अहमदनगर

**मूल्य :** १२५/–

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.
या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.

**अनिल सहस्रबुद्धे लिखित 'अगस्त्य' कादंबरीचे प्रकाशन करताना**
**परम पूजनीय स्वामी श्री गोविंददेव गिरी महाराज**

**परम पूजनीय स्वामी श्री गोविंददेव गिरी महाराज**
**(परम पूजनीय श्री किशोरजी व्यास महाराज)**
**यांचे चरणी...**

# अमृतगुटिका

## (चांगदेव पासष्टी : भाव संवाद)

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ज्ञानवेध | ०७ |
| २. | चांगावटेश्वरू | १४ |
| ३. | चांगदेव पासष्टी | ३३ |
| ४. | गुटिकांमृत | ७७ |
| ५. | श्री चांगदेवांचे निवडक अभंग | ८५ |




# संवाद–द्वार

सद्‌गुरू श्री निवृत्तिनाथ, माऊली श्री ज्ञानदेव, संत सोपानदेव आणि माऊली संत मुक्ताई; ही चार भावंडे, म्हणजे, मराठीचिये नगरी प्रगटलेली, सत्–चिद्–आनंद–स्वरूपाची ज्ञानमयी अमृतलीला! भूलोकीला घडलेले, कैवल्यतेजाचे महानुभवन! अनंत अवकाशाला, शब्दब्रह्मात कवळणाऱ्या पैसाच्या खांबाची, अनिवार आनंद साऊली. माऊलींच्या मुखातून प्रकटलेले गुह्य, अमृतवाहिनी होऊन; चराचराला, संजीवकपणे, शब्दनादब्रह्मातून अमृतानुभव संवेद्य करीत; अनंतपणे ओघवते आहे.

जगद्‌गुरू योगेश्वर श्रीकृष्णांनी, उपनिषदरूपी गोमातांचे दोहन करून; मायासंग्रामसमयी; महावीर अर्जुनाला निवेदित केलेले योग–गुह्य–अमृत; माऊली ज्ञानोबारायांनी; सद्‌गुरू निवृत्तिनाथ कृपेने; श्रोतृसंवाद साधत, मायबोली मराठीतून, सर्वांना सहज सेवन करण्याची संधी दिली. आत्मसंवादात्मकतेने या हृदयी प्रकटलेले त्या हृदयी, लिलया घातलें. भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरी रूपातील या संवादाने अवघे विश्व प्रकाशमान झाले. आदिनाथ शिवांपासून स्वसंवेद्यतेने स्रवत आलेले, अद्वैतामृत, आत्मसंवादात्मकतेने ‘अमृतानुभव’ स्वरूपात; श्री सद्‌गुरू निवृत्तिनाथ कृपेने, सद्‌गुरू होऊन; ज्ञानसाधक, ज्ञानपिपासू, साधकांसाठी प्रसिद्ध केले. ‘ज्ञानदेव तू कैवल्यम्’ हे वचन सार्थ करीत; उपनिषदांच्या सर्वमहावाक्यांना साद घालीत, सर्वांना आनंद डोहातील आनंदतरंगात, आनंदस्नात केले. हरिपाठ, अभंगावली, रूपके यांच्या छंदात जनताजनार्दनाला, आनंद दीपावली घडविली. चराचराला ‘सत्–चिद–आनंद’ सुखात, जीवनमुक्त होता यावे म्हणून ‘पसायदान’ मागितले.

सद्गुरू परंपरेने चालत आलेली, समाधीयोग, ध्यानयोग, राजयोग, हटयोग, स्वरूपातील खडतर अशा योगमार्गाची साधना करणाऱ्यांना; भक्तियोगाची जोड देऊन; सर्वसामान्यांनाही अद्वैतापर्यंत घेऊन जाता येईल; अशी वहिवाट प्रशस्त केली. भागवत धर्माचा पाया घातला. नामी संधी चालून आलेली दिसताच; अवघ्या पासष्ट ओव्यांत आत्मस्वरूप साधनेचा; अमृतानुभव, गुटिकेच्या स्वरूपात, श्री योगीराज चांगदेव यांना; आत्मसाक्षात्कारपूर्वक, मैत्रसंवादस्वरूपात, आत्मसंवाद साधत, श्री निवृत्तिनाथ प्रसादस्वरूपात, प्रदान केला. योगीराज चांगदेव हे तर केवळ निमित्त. मायाबाजारात, अहंकारग्रस्त होऊन; आत्मस्वरूप होण्याच्या मार्गावर असूनही; वंचित झालेल्या समस्त, सर्वसामान्य साधकांना; 'चांगदेव पासष्टी'; 'अमृतगुटिका' रूपाने, आपल्या दिव्य आत्मसंवाद शैलीत, संत ज्ञानेश्वर माऊलींनी आत्मानुभव प्रसाद दिला. या दिव्य घटनेच्या निमित्ताने, 'चांगदेव पासष्टी'वर भावसंवाद करण्याचा औध्दत्यपूर्ण प्रयत्न, या पुस्तकाच्या रूपाने केला आहे. ओघाने श्री योगीराज चांगदेवांच्या विभूतिमत्त्वावर, त्यांच्या चरित्रात्मक माहितीवर, अभंगरचनांवर, प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न येथे केला आहे. अज्ञ अभ्यासकाने, जाणिवेच्या अवकाशात झेपावण्याचे धाडस करीत; केलेल्या या 'भाव संवाद' स्वरूप जवळिकेचा, जाणकारांनी, स्नेहाळ मायेच्या भूमिकेतून, आस्वाद घेण्याचा प्रयत्न करावा, अशी नम्र प्रार्थना.

●●●



# अमृतगुटिका

## १. ज्ञानवेध

अमृतानुभवातील अज्ञान खंडन आणि ज्ञान खंडनावरील प्रवचनात, श्रोते दिव्यानुभूती घेत होते. मंत्रमुग्ध अवस्थेत डोलत असतांनाच, महाराजांनी परिहारपूर्वक, आपल्या वाणीला विराम दिला. माऊली ज्ञानोबारायांची आरती सुरू झाली–

**आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।**
**सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।।**
**आरती ज्ञानराजा ।।ध्रु।।**
**लोपलें ज्ञान जगीं । हित नेणतीं कोणी ।**
**अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ।।१।। आरती ।।**
**कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।**
**नारद तुंबर हो । साम गायन करी ।।२।। आरती ।।**
**प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।**
**रामजनार्दनीं । पायीं मस्तक ठेविलें ।।३।। आरती ।।**

आरती आटोपली. महाराज निवांत झाले. श्रोते पांगले. एक भक्त मात्र अजून महाराजांच्या जवळच घुटमळत होता. महाराजांना आता त्या भक्ताची सवयच झाली होती. महाराजांची सेवा करण्यासाठी, भक्त गणु सरसावयाचा.

सेवा तरी काय असे? त्या निमित्ताने गणु हळूच, महाराजांना प्रश्न विचारायचा. महाराजांना हेच हवे असायचे. ते गणुला म्हणत, ''गणोबा तुमच्या प्रश्नांना उत्तरे देतांना, मला आत्मानुभव घडल्याचा आनंद मिळतो.'' महाराजांच्या या म्हणण्याचा अर्थ गणुला कळला की नाही; कोण जाणे? गणु मात्र मोहरून जायचा. त्याच्या डोळ्यात, आनंदासक्तीची चमक दिसे. मग गणुच्या प्रश्नांचे समाधान करण्यात, महाराज आणि गणुचा कितीतरी वेळ निघून जात असे. दोघांनाही कळायचे नाही. आजही तसेच घडत होते.

**गणु** : महाराज, माऊलींनी ज्ञानखंडन करतांना-

**एवं ज्ञानाज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अहनी ।**
**उदैला चिद्गगनीं । चिदादित्यु हा ।।** अमृ.अ.८.ओ.१९।।

असे म्हटले.

ज्ञान म्हणजे दिवस आणि अज्ञान म्हणजे रात्र; या दोहोंना पोटात घालून; म्हणजे दिवस आणि रात्र मावळून गेल्यामुळे चिदाकाशात, चिद्सूर्याचा उदय होतो; असे आपण सांगितले. म्हणजे? मी नाही समजलो.

**महाराज** : गणु, अरे, असं पाहा, दिवस म्हणजे, आपल्याला भासतो तो प्रकाश आणि रात्र म्हणजे आपल्याला भासतो तो अंधार. हे दोन्ही उगवतात आणि मावळतात कोठे? या अनंत अवकाशातच! तिथे अंधार आणि उजेड, काहीच नाही. म्हणजे असणे-नसणे हा भासच नाही. अशी ती चिरंतन, निखळ अशी अवस्था आहे. दिवस म्हणजे सुख आणि रात्र म्हणजे दुःख, असे लक्षात घे. ह्या दोन्ही गोष्टी पोटात घेण्याची अवस्था ही खरी शाश्वत, निखळ अवस्था असते. यालाच 'सत्-चिद्-आनंद' किंवा दिव्य प्रकाश अवस्था म्हणतात. हीच निखळ आनंद स्थिती. यालाच 'जीवमुक्त दशा' म्हणतात.

**गणु** : महाराज, जीवनमुक्त अवस्था, म्हणजे तर मृत्यू; होय ना?

**महाराज** : गणोबा, मृत्यू झाल्यावर, आनंद भोगण्याची, सत्-चिद्-आनंद' अशा अनुभूतीत रंगून जाण्याची, अवस्था कशी मिळणार? ही जीवनमुक्त अवस्था, जीवाच्या ठिकाणीच, म्हणजे याचि देही याचि डोळा, अनुभवता येते. हीच तर पूर्ण ज्ञान अवस्था होय. अरे, माऊली म्हणतात,

**''झाला देवोचि भक्तु । ठावोचि झाला पंथु ।**
**होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हें ।।''**



अमृ. 'जीवन्मुक्त दशाकथन', अ.९. ओ.३५

ही पूर्ण ज्ञान अवस्था निर्माण झाली की, तेथे देव आणि भक्त, ही द्वैत अवस्था म्हणजे देव वेगळा आणि भक्त वेगळा अशी अवस्था, नांदत नाही. देवच भक्त होऊन जातो आणि भक्तच देवस्वरूप होतो. परमेश्वराची, म्हणजेच देवाची प्राप्ती भक्ताला करायची असतेना; म्हणजे भक्ताला मोक्ष हवा असतोना; तो मोक्ष त्याला या देवस्वरूप होण्याने प्राप्त होतो. हे बघ, असा भांबावू नकोस. देव प्राप्तीसाठी, आपण भक्ती हा मार्ग अनुसरतो. भक्तिमार्ग, हे साधन असतेना; देवापर्यंत जायचे. ते साधनच देव होते आणि भक्तही होते. म्हणजे साधनच साध्य आणि सिद्धताही होते. माऊली म्हणतात, पंथु म्हणजेच मार्ग ठावोचि झाला. ठायीच झाला, म्हणजे भक्त आणि देव, भक्तीच्या ठिकाणीच अनुभवास येतात. त्यामुळे तो भक्त, लोकांच्या दृष्टीने जरी देवापेक्षा वेगळा दिसत असला; तरी तो देवस्वरूपच म्हणजे देव आणि भक्त मिळून एकच झालेला असतो. अशी अवस्था भक्तिसाधनेच्या ठिकाणी उत्पन्न होते. अवघे विश्वच, आपल्या ठिकाणी स्वरूपाने, अर्थात एकलेपणाने, म्हणजेच अद्वैत रूपाने, भक्ताला अनुभवास येते.

**गणु** : महाराज, मी एक विचारू? आपण रागावणार तर नाही ना?

**महाराज** : गणोबा, अगदी निःशंक मनाने विचार, परमार्थात रागलोभ नसतो. नाही रागावणार आम्ही.

**गणु** : महाराज, आपण, मला जे भक्तिसाधनेविषयी आणि जीवनमुक्तीविषयी सांगितले; त्यांविषयी माझ्या मनात एक शंका आहे.

**महाराज** : कोणती?

**गणु** : महाराज, आपण एवढी भक्ती करता, अमृतानुभव या ग्रंथावर प्रवचन करता. आम्हाला पडणारे प्रश्न, आम्हाला येणाऱ्या शंकांचे निरसन करता? आपणाला, अशी जीवनमुक्त अवस्था प्राप्त झाली का?

गणुने प्रश्नार्थक मुद्रेने महाराजांकडे पाहिले. महाराजांना गणु असा प्रश्न विचारील; असे वाटले नव्हते. संतापाची एक लहर महाराजांच्या मुद्रेवर सळसळून गेली. क्षणात, त्यांनी स्वतःला सावरले. मुद्रा प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला. महाराज, लगेचच उत्तर देत नाहीत; हे पाहून गणु गडबडला.

**गणु** : महाराज, मी चुकलो, उद्धटपणे आपल्याला प्रश्न विचारला.

महाराज आता चांगलेच सावरले होते. गणुच्या या अपराधी भावाने, ते

स्वतःही खजील झाले. खळखळून हसत, प्रसन्न, प्रेमळ, मैत्र भावाने ते बोलू लागले.

**महाराज** : अरे गणोबा, तू आणि मी आपण सारख्याच अवस्थेत आहोत. मी ही भक्त आणि तू ही भक्तच. आपण दोघेही भक्तीच्या मार्गावर मार्गक्रमणा करतो आहोत. मी काही ग्रंथावलोकन केले, माझ्या गुरूंची सांगी स्वीकारले, इतकेच. तू ही तेच करतो आहेस.

**गणु** : म्हणजे महाराज, मी नाही समजलो.

**महाराज** : गणोबा, भक्तिमार्ग स्वीकारला. मार्गाचा अंगिकार नाही झाला. मी म्हणजे, ग्रंथ वाचलेला, महाराज, प्रवचनकार, आचार्य, हा जो माझा परिचय आहे; तो कुठे सांडला? तू, गणोबा, माझा शिष्य, सेवक, सेवेकरी, हा परिचय कुठे सांडला?

**गणु** : हा परिचय सांडायचा म्हणजे?

**महाराज** : अरे वेड्या, मी काय नि तू काय अजून स्वतःच्या परिचयातच गुंतलो आहोत. यालाच जीवाचा अहंकार म्हणतात. तू प्रश्न विचारून; माझी, महाराजांची परीक्षा पाहतोस; असे वाटून, मी संतापलो. म्हणजे माझा अहंकार, नागासारखा फडा काढून उभा राहिला. हा अहंकार सांडून, भक्तिमार्गाने, भक्ताने देवाकडे जायचे असते. हे कुठे घडते? मी प्रवचन करतो, म्हणजे मी अजून मार्ग समजावून घेतोय. आणि तू प्रश्न विचारतो, म्हणजे तू ही मार्ग समजावून घेतोस. मार्गाचा अंगिकार झाला की देवा शिवाय दुसरे काहीच आठवता कामा नये. यालाच अहंकार सांडणे म्हणतात. भक्ती करता करता आपणच भक्ती झाले पाहिजे, म्हणजे भक्ती हा स्वभाव झाला पाहिजे. आपण तर फक्त त्या मार्गाचा विचारच करतो आहोत. मग तूच सांग. मी आणि देव, एक कसा होणार? म्हणजे मी जीवनमुक्त कसा होणार? मी अजून पोटभऱ्या महाराज आहे असे समज.

**गणु** : महाराज, आपण असे म्हणता मग माझे काय? मी तर कधीच जीवनमुक्त होऊ शकणार नाही!

**महाराज** : तसे नाहीरे बाबा, अहंकार सांडून देवाचे स्मरण करायचे म्हणजे अनन्य भक्ती करण्याचा अभ्यास करायचा, या अभ्यासाने आपला मार्गही सिद्ध होईल. अरे भगवंताचीच सांगी माऊलींनी सांगितली आहे,-



**''पैं अभ्यासाचेनि बळे । एकां गति अंतराळें ।**
**व्याघ्र सर्प प्रांजळे । केलें एकीं ।।** ज्ञा.अ.१२ ओ.११० ।।
**विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे ।**
**एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें कळें ।।** ज्ञा.अ.१२ ओ. १११ ।।
**म्हणोनि अभ्यासासि कांही । सर्वथा दुष्कर नाही ।**
**यालागिं माझ्या ठायीं । अभ्यासें मीळ ।।** ज्ञा.अ.१२ ओ.११२ ।।

**गणु** : पण महाराज, असा अभ्यास किती काळ करावा लागेल? मला ते शक्य होईल?

**महाराज** : अरे, गणोबा, तुलाच काय? कोणालाही परमेश्वर प्राप्त करणे शक्य आहे. अट एवढीच आहे. भक्ती हा स्वभाव झाला पाहिजे. म्हणजेच जीवाचा अहंकार सांडून, देवाशी अनन्य व्हायला हवे.

माऊली म्हणतात,

**''अवघिया उपचारा । जपध्यान निर्धारा ।**
**नाहीं आन संसारा । देवावाचुनी ।।''**

अमृ. जीवन्मुक्त दशा कथन. ओ.क्र. ४०

संसाराचा सगळा व्याप विसरून निर्धारपूर्वक देवाचेच स्मरण करावे. म्हणजे, भक्ताने देवाशी एवढे एकचित्त व्हावे, एकरूप व्हावे; की तो परब्रह्मस्वरूप होऊन जाईल. माऊली वर्णन करतात.

**जैशा अकारादि अक्षरा । भेटती पन्नासही मात्रा ।**
**तैसें या चराचरा । दुसरें नाहीं ।** अमृ. ग्रंथपरिहार ओ.२९ ।।
**तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी ।**
**किंबहुना सरोभरीं । शिवेसीचि ।।** अमृ. ग्र.प.ओ.३० ।।
**म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ।**
**सणु भोगिजे सणें विश्वाचेनि ।।** अमृ. ग्र.प.ओ.३१ ।।

सर्व अक्षरे व मात्रा ॐकारातच विलीन होतात. तसे हे जग ब्रह्मरूपातच विलीन झाले आहे. त्यामुळे परमेश्वराचे वर्णन करतांना परमेश्वराकडेच अंगुली म्हणजे बोट दाखवावे लागते. देव देवासारखाच आहे म्हणूनच तोच सर्वकाही आहे. भक्त, त्यापासून वेगळा नसतोच. नाहीच. हा अमृतानुभव अभ्यासाने

आला; की सणानेच सण साजरा करावा; तसे भक्तच विश्व होऊन विश्व भोगू शकतो.

पण, बरका गणोबा, या अवस्थेसाठी किती अभ्यास करावा लागेल; हे काही सांगता येणार नाही. हजारो वर्षे अभ्यास करूनही, अहंकारच गेला नाही; तर त्या भक्तालाही हा अमृतानुभव भोगता येणार नाही. आणि हा अभ्यास, स्वभाव झाला तर अगदी एका क्षणातही अमृतानुभव भोगता येईल.

**गणु** : महाराज, जीवन्मुक्तीचा हा अमृतानुभव घेण्यासाठी, भक्ती हा एकच मार्ग आहे का?

**महाराज** : अरे गणोबा, भक्ती हा एकच मार्ग नाही. भगवंतांनीच भगवद्‌गीतेमध्ये अनेक मार्ग सांगितले आहेत. माऊलींनी ते ज्ञानेश्वरीत उघडही केले आहेत. मात्र कलियुगाचे ठिकाणी नामभक्ती अर्थात नवविधा, पंचविधा, अनेकविधा भक्ती हाच मार्ग तुला, मला आणि सर्वांना सुलभ आहे. तू तर ज्ञानेश्वरीचे पारायण करतोस. म्हणजेच आपण समजून घेतो आहोत. अंगीकृत करीत नाही. म्हणूनच हजारो वर्षे साधना करूनही अमृतानुभव भोगता येत नाही, असे मी म्हणालो.

**गणु** : महाराज, हजारो वर्षे तप करूनही अभ्यास पूर्ण झाला नाही तर?

**महाराज** : म्हणूनच, गणोबा, माऊलींनी गुटिकांमृत तयार करून दिले आहे.

**गणु** : म्हणजे, महाराज?

**महाराज** : गणोबा, तुला एक गोष्ट सांगतो. श्री योगीराज चांगदेवांनी चौदाशे वर्षे योगाभ्यास केला. गुरुकुलाचे स्वामी झाले. मोठा शिष्य परिवार त्यांना अनुसरू लागला. सिद्धसंप्रदाय सिद्ध झाला. हटयोग, राजयोग, ध्यानयोग या मार्गाने त्यांना सर्व सिद्धी प्राप्त झाल्या. पंचमहाभूतांवर त्यांनी विजय मिळविला. एव्हढेच नव्हे तर; देवदेवतांशी संवाद करून, त्यांना हवे त्या कार्यासाठी, कार्याप्रवण करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. आपण विश्वावर विजय मिळविल्याचा आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला. तरी श्री ज्ञानदेवांनी अवघ्या पंधरा-सोळाव्या वर्षी रेड्यामुखी वेद वदविल्याचे त्यांच्या कानी गेले, तेंव्हा त्यांना मोठे कुतुहल वाटले. एव्हढ्या लहान मुलाने हा चमत्कार कसा घडवला; हे त्यांनी पाहायचे ठरविले. माऊली ज्ञानेश्वरांनी योगीराज श्री चांगदेवांच्या निमित्ताने सर्वांना अमृतानुभव कसा आणि केव्हा प्राप्त होईल; हे



सांगण्यासाठी 'गुटिकांमृत' स्वरूपात अमृतानुभवची किल्ली, सर्वांच्या हाती देऊन, अमृतानुभवाचा म्हणजेच जीवनमुक्तीचा मार्ग मोकळा केला. अमृतानुभवची ही किल्ली म्हणजेच माऊलींनी लिहिलेला 'चांगदेवपासष्टी' हा ग्रंथ होय.

●●●

# २. चांगावटेश्वरू

गणुचे श्री योगीराज चांगदेव महाराजांविषयीचे कुतुहल वाढले. माऊली ज्ञानेश्वरांनी, रेड्यामुखी वेद वदविले; याचे या योगीराजांना कुतुहल का वाटावे? योगीराज तर सर्वज्ञ होते ना? एवढ्या मोठ्या योगीराजांना जीवनमुक्त अवस्था प्राप्त झालीच असणार. त्यांनी चौदाशे वर्षे तपश्चर्या कुठे केली असावी? एक ना अनेक प्रश्नांचे काहूर, त्याच्या मनात निर्माण झाले. श्री योगीराज चांगदेवांची सर्वश्रुत असलेली कथा, सांगोवांगी, त्याला माहीत होती. महाराजांच्या मुखाने साद्यंत कथा ऐकावी; यासाठी तो आतुर झाला. नित्याप्रमाणे तो बरोबर महाराजांजवळ आला.

**गणु** : महाराज, योगीराज चांगदेवांनी चौदाशे वर्षे तपश्चर्या केली, असे आपण सांगितलेत. म्हणजे त्यांचे वय चौदाशे वर्षांचे होते? एवढी तपश्चर्या त्यांनी कुठे कुठे केली?

**महाराज** : गणोबा, ऋषी, मुनी, तपस्वी, योगी, नाथ, सिद्ध आणि पुराणातील राजे, यांच्या तपश्चर्येच्या कथा आपण वाचतो. श्री योगीराज चांगदेव, हे ही असेच महान योगी होते. त्यांचा आणि माऊलींचा संबंध आला. त्यांनी संत मुक्ताबाईंचे शिष्यत्व स्वीकारले. हे आपणा सर्वांना ठावूक आहे. त्यांच्याविषयीची फारशी माहिती उपलब्ध नाही. परंतु साहित्य, संस्कृती आणि इतिहास संशोधकांनी त्यांच्याविषयी काही माहिती मिळविली आहे. महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, अंतर्गत 'प्रवरा खोरे' असे गॅझेटियर प्रसिद्ध केले आहे. त्यात डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी, 'सांस्कृतिक जीवन' विभागात 'वन्य संस्कृती' या लेखात, सांस्कृतिक वारसा सांगताना, 'हरिश्चंद्र



गडावरील राजा हरिश्चंद्राची कथा' यात वर्णन केल्याप्रमाणे, ''तेथेही हरिश्चंद्रेश्वराचे शिवालय आहे. येथूनच प्रवरेची भगिनी मुळा नदीचा उगम सांगितला जातो. हरिश्चंद्र गडावर प्रचंड मोठ्या गुहा आहेत. एखाद्या गुरुकुलाची सोय असावी तसा हा परिसर आहे. विश्वामित्रांचा निवास येथे असावा असेही सांगितले जाते. तारामती, रोहिदासाचे डोंगर येथे आहेत. मध्यकाळात चांगदेवांचे निवासस्थान येथे होते.'' असा उल्लेख केला आहे.

गणोबा, मी सुद्धा कुतुहलाने या गडावर गेलो. तेथे एक नव्हे दोन भव्य शिवालये आहेत. एक शिल्पशैलीचा उत्तम नमुना आहे. दुसरे शिवालय अद्‌भूत आहे. एका विस्तीर्ण ऐसपैस गुंफेमध्ये भव्य असे शिवलिंग आहे. ते शिवलिंग, लांबीरुंदी पाहिली तर सात-आठ फुटांपेक्षाही लांबरुंद आहे. गुंफेतच कोरलेल्या चार खांबांच्यामध्ये हे शिवलिंग म्हणजे पिंडी खडकातच कोरून; स्वयंभू स्वरूपात निर्मिली आहे. ते खांब म्हणजे एखाद्या महाकाय वटवृक्षाच्या पारंब्या, पुन्हा जमिनीत शिरल्याप्रमाणे आहेत तर, ती पिंडी म्हणजे साक्षात तो वटवृक्ष असावा, तशी आकाश पेलण्यासाठी सिद्ध आहे. अक्षयवटाची कल्पना माझ्या मनात आली. त्याचवेळी श्री चांगदेवांना 'चांगावटेश्वरू' या शिवालयामुळेच म्हणत असावेत असे मनात आले. कोण जाणे? वटेश हे शंकरांचे नाव तसेच ते श्री चांगदेव महाराजांच्या गुरूंचे पित्याचे देखील नाव असावे. या शिवालयात एखाद्या हटयोग्याच्या चमत्काराप्रमाणे, सदैव पाणी असते. लहानमोठ्या सर्वांच्या गुडघ्याएवढेच पाणी, सर्वांना अनुभवाला येते, अशी शिवरात्रीची आख्यायिका येथे मौखिक परंपरेने आहे. मी शिवपिंडीशी गेलो. मला मात्र चांगले मांडीपर्यंत पाणी लागले. हरिश्चंद्र गडावरून परत येईपर्यंत योगीराज चांगावटेश्वरांचे गुरुकुल येथे असावे असे मनात घोळत होते. डॉ. सहस्रबुद्धे यांच्या विधानाला दुजोरा देणारे संशोधन, याच 'प्रवरा खोरे' गॅझेटियरमध्ये, प्रकरण ३ मध्ये, 'सांस्कृतिक जीवन' या अंतर्गत डॉ. अरुणा ढेरे यांनी नोंदविले आहे. त्यातील 'प्रवराकाठच्या संस्कृतीचा मानदंड : हरिश्चंद्र' या मथळ्याखाली माहिती नोंदविली आहे. त्यातील योगीराज चांगदेवांविषयीचे उल्लेख अंश असे ''हरिश्चंद्रेश्वर लेण्याच्या प्रांगणात हरिश्चंद्रेश्वराचे सुंदर मंदिर आहे. प्रवेशद्वारासमोर मळगंगेचा चांगदेवांनी जिचा मंगलगंगा असा निर्देश, 'तत्त्वसार' ग्रंथात केला आहे, त्या नदीचा प्रवाह आहे. त्याच्या एका बाजूला एक जुने शिवमंदिर आणि काशीतीर्थ नावाचे कुंड आहे. तर दुसऱ्या

बाजूला चौदा देवळांमध्ये, चौदा विष्णूमूर्ती असलेले सर्वतीर्थ आहे. गडावर अनेक वास्तूंचे, मूर्तींचे आणि मंदिरांचे अवशेष सर्वत्र विखुरलेले आहेत.'' ''गडावरच्या कोरीव लेखांचा अभ्यास डॉ. वि. भि. कोलते आणि डॉ. रा. चिं. ढेरे यांसारख्या काही विद्वानांनी केला आहे आणि त्यातून हरिश्चंद्रगडाचे सांस्कृतिक महत्त्व उजेडात आले आहे. विशेषतः 'चक्रपाणी' या ग्रंथात डॉ. रा. चिं. ढेरे यांनी या गडाचे प्राचीन महात्म्य पुराव्यांच्या बैठकीवर पुनर्रचित केले आहे. त्यांच्या विवेचनानुसार दहाव्या शतकापूर्वीपासूनच या गडाची ख्याती केवळ महाराष्ट्रात नव्हे तर भारतात सर्वदूर पसरली होती.'' ''भारतातल्या सर्व प्रमुख स्थानांची शिवमंदिरे प्रातिनिधिक रूपात काशीत आहेत. 'काशीखंडात' स्पष्ट उल्लेखही आहे की, काशीनगरीत नेपाळहून पशुपती आला, कायावरोहणावरून नकुलीश्वर आला, तसा हरिश्चंद्रगडावरून शंकर आला.'' ''ह्या शिवस्थानात शिवाबरोबर शक्तीही नांदत होती. ''सह्याद्रावेकवीरा तु हरिश्चंद्रे तू चंद्रिका'' असा या चंद्रिकेचा उल्लेख 'मत्स्यपुराणा'त आढळतो. शक्तीच्या एकशेआठ स्थानांमध्ये या गडाचा समावेश होतो. 'पद्मपुराण', 'स्कंदपुराण', 'देवीभागवत' या ग्रंथांनीही तिचा समावेश शक्तिस्थानांमध्ये केला आहे.'' ''महामहोपाध्याय वा. वि. मिराशींनी नाशिक जिल्ह्यात आंजनेरी येथे मिळालेल्या एका ताम्रपटाच्या आधारे हरिश्चंद्र नावाच्या राजामुळे या गडाला हरिश्चंद्रगड असे नाव मिळाले असल्याचे अनुमान केले आहे. लोकश्रद्धा, पुराणप्रसिद्ध राजा हरिश्चंद्राचा संबंध या गडाशी मानत आले आहेत. तर डॉ. रा. चिं. ढेरे यांचे एक संभवनीय अनुमान असे आहे की, हरी आणि हर यांचे हे एकत्रित स्थान असणे शक्य आहे. 'दक्षिणप्रयागमहात्म्य' आणि चांगदेवांच्या 'तत्त्वसार' ग्रंथाच्या आधारे हरी, हर आणि चंद्रिका शक्ती, यांच्या एकसरीकरणाचे प्रतीक या गडावर आणि गडाच्या नावात सामावले असल्याचे ते (डॉ. ढेरे) म्हणतात (हरि-चंद्रिका-ईश्वर)- ''गडावर सापडलेल्या कोरीव लेखांमध्ये योगी चांगदेवांचा उल्लेख आहे. ते आपल्या शिष्यांसह हरिश्चंद्रगडावर काही काळ वास्तव्याला होते. 'तत्त्वसार' नावाचा ग्रंथ त्यांनी (चांगदेवांनी) तिथेच लिहून पूर्ण केला. ग्रंथातही तशी नोंद त्यांनी (चांगदेवांनी) केली आहे.'' डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या विवेचनानुसार डॉ. अरुणा ढेरे असे अनुमान काढतात, ''याचा अर्थ असा की, सुमारे आठशे ते हजार वर्षांपूवी किंवा कदाचित महामहोपाध्याय वा. वि. मिराशी म्हणतात, तसा हरिश्चंद्र या ऐतिहासिक



राजाचा या दुर्गाशी संबंध असलाच तर सहाव्या शतकाच्याही पूर्वीपासून हरिश्चंद्रगड हे एक प्रख्यात सिद्ध पीठ होते. संपूर्ण भारतात ते ख्यातकीर्त होते. साधक आणि श्रद्धावंत तिथे हरिहरांचे ऐक्य अनुभवत होते. योगी आणि धर्मोपासक तिथे वास्तव्याला येत होते. शाक्त तांत्रिकांचेही ते एक मोठे शक्तिस्थान होते आणि चंद्रचंद्रिकेप्रमाणे तिथे शिव-शक्तीचे सामरस्य अनुभवाला येत होते.''

गणोबा, योगीराज चांगदेवांनी चौदाशे वर्षे तपश्चर्या केली. मोठा शिष्यपरिवार त्यांच्या भोवती होता. हे कोठे घडले असावे, असा तू प्रश्न विचारलास म्हणून तुला ही सर्व संशोधित माहिती सांगितली. मी हरिश्चंद्रगडाचे दर्शन घेऊन आल्यापासून माझ्या मनात योगीराज चांगदेवांच्या घोर तपश्चर्येविषयी सारखा हाच अनुमान विचार येत होता. भारतवर्षात आणि विशेषतः काशीतीर्थाचे ठिकाणीही प्राचीन काळापासून सिद्धपीठ आणि शक्तीपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या, हरिश्चंद्रगडाची निवड योगीराज चांगदेवांनी आपल्या, तपोभूमी आणि गुरुकुलासाठी केली असणार. माऊलींच्या चरित्रात उल्लेखिलेल्या सर्व स्थळांना सहज जवळ असे हे सिद्धपीठ आहे. माऊलींच्या बालवयातील चमत्कारांकडे योगीराज चांगदेवांचे लक्ष त्यामुळेच गेले असावे. सह्यगिरीच्या शिखररांगांतील तपश्चर्येला, योगाभ्यासाला, अतिशय रम्य, पवित्र असे हे स्थान आहे. हरिश्चंद्र आख्यानामुळे, राजयोगी विश्वामित्रांचे सिद्धपीठ म्हणूनही हरिश्चंद्रगडाला मान्यता असावी. चांगदेवांनी आपल्या योगसिद्धीसाठी हे स्थळ निवडले असावे. डॉ. ढेरे यांच्या 'चक्रपाणी' ग्रंथातील चर्चेप्रमाणे; माऊली ज्ञानेश्वरांनीही योगी चांगदेवांच्या 'चक्रपाणी' या नावाचा उल्लेख चांगदेव पासष्टीतील बासष्टाव्या ओवीत केला आहे.

**गणु** : महाराज आपण सांगितलेली दिव्य माहिती ऐकून; मला एका महासिद्धपीठाचे शक्तीपीठाचे दिव्य दर्शन घडले. आपण म्हणता तसे योगीराज चांगदेवांचे गुरुकुल, निवास आणि तपोभूमी येथेच असावी, यात मला जराही शंका वाटत नाही. परंतु महाराज योगीराज चांगदेवांची समाधीस्थाने निरनिराळ्या ठिकाणी दाखविली जातात त्यांचे काय?

**महाराज** : गणोबा, तुझे म्हणणे खरे आहे. पण ही गोष्ट सर्वच ऋषी, योगी, सिद्ध, मुनी, साधू यांच्या संबंधाने पाहायला मिळते. संशोधक त्याची चर्चाही करतात. चांगावटेश्वराचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न झाला आहे. 'श्री

सकलसंतगाथा' या ग्रंथाचे संपादक प्रा.डॉ. र. रा. गोसावी यांनी, 'चांगदेव तथा चांगावटेश्वर' चरित्र मांडण्याचा प्रयत्न केला. त्यातील महत्त्वाचे अंश सांगायचे तर ते असे, ''(चांगदेव) हे एक थोर योगीपुरुष, नाथ सांप्रदायिक असले तरी वैष्णवांच्या मेळाव्यात त्यांचा समावेश झाल्यापासून त्यांना भगवद्भक्त म्हणूनही ओळखले जाऊ लागले. त्यांनी चौदाशे वर्षे तपश्चर्या केली अशी पारंपरिक धारणा आहे. त्यांचे योगसामर्थ्य विलक्षण होते. म्हणूनच सद्गुरू भेटेपर्यंत त्यांनी वयस्तंभन केले होते. त्यांचे खात्रीलायक चरित्र उपलब्ध नाही.'' ''त्यांच्या चरित्रातील काही थोड्या घटना ज्ञात झाल्या आहेत त्या अशा : तापी पयोष्णी तीरावर चांगदेव ह्या गावी ते प्रथम लोकांच्या नजरेस पडले. चांगदेवपुरी या गावानजिक असलेल्या वनात, ते चर्मचक्षू अर्धोन्मीलित ठेवून गाढ तपश्चर्या करून योगी पुरुष झाले होते. चांगदेव हे त्यांचे नाव त्यांच्या चांगल्या रूपावरून पडले, असे सांगतात. योगसामर्थ्यामुळे त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्यांचा शिष्यपरिवारही वाढू लागला. हे सर्व होऊनही त्यांना गुरूबोध झाला नव्हता.''

''चांगदेवांच्या जन्माविषयी एक मिथ्थकथा सांगितली जाते. स्वर्गी इंद्राचा एक मरुद्गण होता. त्याच्यावर सर्व कार्यभार सोपवला होता. एकदा इंद्राची आज्ञा त्याला नीट ऐकायला आली नाही. त्यामुळे इंद्राला राग येऊन, 'तुझा अधःपात झाला आहे. तू मृत्युलोकी मनुष्ययोनीत जन्माला येशील' असा शाप दिला. मरुद्गणाने त्यांची लाघवी भाषेत स्तुती केली आणि उःशाप द्यायला प्रवृत्त केले. इंद्राने दयाशील होऊन, उःशाप दिला, 'हे मरुद्गणा, जगाचा उद्धार करण्यासाठी ब्रह्मा, विष्णू आणि हर कलियुगात अवतार घेतील. योगमाया आदिशक्ती मुक्ताबाईच्या रूपाने अवतार घेईल, महाविष्णू ज्ञानदेवांच्या रूपानं, मृडानिपती आदिशिव निवृत्तिनाथांच्या रूपानं, ब्रह्मा सोपानदेवांच्या रूपानं अवतार घेतील. तू पृथ्वीवर जन्म घेऊन अनन्यभावानं त्यांना शरण जाशील. त्यांच्या कृपेनं या विश्वात परब्रह्म व्यापून राहिल्याचा तुला साक्षात्कार होईल'. मरुद्गणानं इंद्राला नमस्कार केला, तेवढ्यात एक दैदीप्यमान मूर्ती खाली पृथ्वीवर अवतरू लागली.'' ''मुक्ताई ही चांगदेवांची गुरू असल्याचा उल्लेख चांगदेवांच्या 'तत्त्वसार' या ग्रंथात येतो. त्यांच्या अभंगांतही असाच उल्लेख आहे. त्यावरून त्यांची गुरुपरंपरा आदिनाथ-मत्स्येन्द्रनाथ-गहिनीनाथ-निवृत्तिनाथ-मुक्ताबाई-चांगावटेश्वर अशी ठरते.



चांगदेवांची शाखा 'वटेश्वर संप्रदाय' म्हणून ओळखली जाऊ लागली.''

**गणु** : महाराज, या सगळ्या चरित्रकथा सांगोवांगीच्याच दिसतात. त्यांच्या जन्माची कथा माऊलींच्या आणि निवृत्तिनाथ, सोपान आणि मुक्ताबाईंच्या कथेशी जुळणारी आहे. पण चांगदेवांचा चांगावटेश्वर हा उल्लेख का, हे नाही कळत?

**महाराज** : हो, हो अधीर नको होऊस. गणोबा मी सुरुवातीलाच, खात्रीलायक माहिती नाही; हे डॉ. गोसावीसाहेबांचे मत सांगितले ना; त्यांनीच वटेश्वरांविषयी संशोधकांनी घेतलेला परामर्श मांडला आहे. डॉ. र. रा. गोसावी लिहितात, ''ही वटेश्वर व्यक्ती कोण; याविषयी मतभेद आहेत. वटेश्वर म्हणजे चांगदेवांच्या अंतर्यामी प्रकाशणारे ईश्वररूप. मुक्ताईने विश्रांती वटाखाली चांगदेव पासष्टीचा अर्थ चांगदेवास समजावून सांगितला, म्हणजेच वटाखाली स्वतःच्या ईश्वररूपाशी चांगदेव एकरूप झाले, म्हणून वटेश चांगा असे हे स्वतःला म्हणवून घेऊ लागले असतील, असे एक मत तत्त्वसार ग्रंथाचे संपादक डॉ. ह. रा. दिवेकर व्यक्त करतात, तर चांगदेव चरित्राच्या संदर्भात तरी वटेश्वर हे शिवाचेच नाव आहे असे मत रा. चिं. ढेरे व्यक्त करतात. त्यांच्या (रा. चिं. ढेरे) मते वटेश्वर हे त्यांचे उपास्यदैवत होते. चांगदेवांनी चांगदेवपुरी येथे वटेश्वरांची उपासना केली होती. हे वटेश्वराचे स्थान खानदेशात तापी पयोष्णी संगमावर आजही पाहावयास मिळते. ह्याच गावी त्यांची समाधी असून तेथे माघात चांगदेवांची प्रतिवर्षी यात्राही भरत असते. सासवड (जि. पुणे) येथेही वटेश्वराचे एक भव्य शिवमंदिर आहे. वटेश्वर या नावाने अनेक शिवस्थाने सापडतात. चांगदेवांनी वटेश्वरावर रचलेली आरती ध्यानात घेता वटेश्वर हे चांगदेवांचे गुरू नसून उपास्य दैवत होते, हे सत्य ध्यानात येते. या आरतीच्या महत्त्वाच्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत- तापी तीरी देव प्रकट जाला... । प्रगटली मूर्ती आनंद जाला ।।१।। जय जय आरती जय वटेश्वरा । निराकार साकार तूंची शंकरा ।। सद्भावें आरती तुज परात्परा । भक्त तारावया कर्पुरगौरा ।।ध्रु।। आरतीच्या शेवटी ''मुक्ताई प्रसादे चांगावटेश्वरीं । ऐक्य ओवाळीत आरती चाग्या लक्ष लक्ष'' ही आरती आपल्या सद्गुरूंच्या नावे चांगामुधोजींनी रचली असावी हे ही अशक्य नाही. चांगदेवांच्या अभंगसंग्रहात आरती नाही.

**गणु** : हा महाराज, आता चांगदेवांची संगती लागली. चांगदेव हे वटेश्वर महादेवांचे भक्त आणि मुक्ताईचे शिष्य. तापी तीरावरच्या गावात वटेश्वर,

चांगदेव आणि मुक्ताईशिष्य या तीनही गोष्टी स्पष्ट झाल्या.

**महाराज** : गणोबा, खात्रीलायक माहिती मिळत नसली की एवढी सहज संगती लागत नाही, अरे, संतश्री निळोबाराय महाराजांच्या अभंगगाथेत, डॉ. गोसावी यांनी निळोबारायांनी नोंदविलेले, 'चांगदेवाचे चरित्र' नगरजवळच्या नारायणडोह गावाचा संदर्भ देऊन; मुधोपंतांच्या चांगदेवाचे चरित्र सांगतांना, चांगावटेश्वराचे चरित्र म्हणून उल्लेख केला आहे. ते चांगामुधोजींचेच आहे म्हणावे; तर चांगावटेश्वरांचे संदर्भही येतात.

**गणु** : म्हणजे?

**महाराज** : आता हेच पाहा. मुक्ताई म्हणजे माऊलींची बहीण असे आपण धरून चाललो आहोत. पण डॉ. र. रा. गोसावी यांनी, डॉ. रा. चिं. ढेरे यांचे वेगळे मतही नोंदविले आहे. ते लिहितात, ''आणखी एक महत्त्वाचे संशोधन म्हणजे डॉ. ढेरे यांनी 'चक्रपाणी' या ग्रंथात चांगदेवांनी गुरू ज्ञानदेवभगिनी मुक्ताई नसून, गोरक्षशिष्या योगिनी मुक्ताई असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार गुरुपरंपरा आदिनाथ-मत्स्येन्द्रनाथ-गोरक्षनाथ-योगिनी मुक्ताई-चांगदेव अशी ठरते. ज्ञानदेवभगिनी मुक्ताई व योगिनी मुक्ताई या दोघी योगसामर्थ्याने थोर होत्या, म्हणून त्यांच्यात ऐक्य मानून चांगावटेश्वरांना ज्ञानदेवभगिनी मुक्ताईच्या शिष्या मानले असे त्यांचे (डॉ. ढेरे) संशोधन आहे.'' संत निळोबारायांच्या चांगदेव चरित्रामध्ये

**''आरोग्य शरीर आंगी दिव्यकांती । नामें विराजिती चतुर्दश ।।१७।।**
**चांगदेव चांगा वटेश्वर चांगा । चक्रपाणी चांगा चांगासिद्ध ।।१८।।**
**शिवयोगीचांगा मणीसिद्ध चांगा । अनकरचांगा नाहुनामें ।।१९।।**
**नागेश नामेचांगा मुध्देश नामेचांगा । साऱ्यासिद्ध चांगा निखळदास ।।२०।।**
**चिंधादेवी चांगा म्हणवी बुटीचांगा । चौदानामे चांगा वर्तमाना ।।२१।।''**

(स.सं.गा.नि.गा. डॉ. गोसावी, अ.क्र. १५५४)

**गणु** : मग, ही संगतीच कोड्यात पडली.

**महाराज** : हो ना! आता आपली भागवत किंवा वारकरी संप्रदायातली मंडळी नामदेवांच्या अभंगगाथेनुसार चांगदेवांची समाधी, पुण्यस्तंभ (पुणतांबे) येथे असून; माघ वद्य त्रयोदशी, शके १२१८/सन १२९६ रोजी चांगावटेश्वरांनी ज्ञानदेव आणि सोपानानंतर लगेचच समाधी घेतल्याचे मानतात. मात्र या



समाधीशकाशी रा. चिं. ढेरे यांनी नोंदविल्याप्रमाणे चांगावटेश्वरांनी 'तत्त्वसार' या ग्रंथाची रचना शके १२३४/सन १३१२ हा शक जुळत नाही.

**गणु** : म्हणजे उलगडा झालाच म्हणायचा. मुक्ताई याच चांगदेवांच्या गुरू आणि त्यांची समाधी पुणतांब्याला!

**महाराज** : अरे गणोबा, या संबंधातही डॉ. गोसावीसाहेबांनी डॉ. ढेरे यांचे वेगळेच मत नोंदविले आहे.

**गणु** : आता, यात कोणता घोळ?

**महाराज** : डॉ. गोसावी लिहितात, ''रा. चिं. ढेरे यांच्या मते पुणतांबे येथील चांगदेवांची समाधी ही त्यांचे (चांगदेवांचे) प्रशिष्य चांगामुधेश यांची असून (शामजी मरुद्गण : चांगदेव चरित्र) चांगावटेश्वरांनी शके १२३४/सन १३१२ मध्ये 'तत्त्वसार' ग्रंथाची रचना करून शके १२४७/सन १३३५ माघ मासी तापी-पयोष्णी तीरावर 'चांगदेव' (जि. जळगाव एदलाबादहून चार मैलावर) या गावी समाधी घेतली.''

**गणु** : पण महाराज, नामदेवांनी तर सर्वांच्या समाधीचे प्रत्यक्ष वर्णन केले आहे. मग ते काय उगाच?

**महाराज** : गणोबा, तुझे म्हणणे ग्राह्य मानता येईल असे मलाही वाटते.

पण गणोबा, डॉ. र. रा. गोसावी यांनी 'नेवाश्याहून ही भावंडे आळंदीस येतांना पुणतांबे येथे थांबली' असा उल्लेख 'सणकांडी' मुक्ताबाई चरित्र लिहितांना केला आहे. तो प्रवासाचा मार्ग पाहाता ओढूनताणून आणल्यासारखा वाटतो. शिवाय ते लिहितात, ''मुक्ताबाईने चांगदेवांना आपलं बाळ मानून त्याला आत्मसुखाची झोप यावी म्हणून एक पाळणा म्हटला, 'निर्गुणाचे डहाळी पाळणा लावीला । तेथे सुत पहुडला मुक्ताईचा । निज निज बाळा न करी पै आळी । उनुहात टाळी वाजविते ।। हा पाळणा निजबोधाचा होता, हे वेगळे सांगायला नको.'' पाळणा सुंदर आहे. निजबोध करणारा आहे पण डॉ. गोसावी यांनी सणकांडी मुक्ताबाईंच्या अभंगगाथेत तो संपादिलेला नाही हे विशेष. हा पाळणा डॉ.साहेबांनी मुक्ताबाई-चांगदेव संवादात संपादिला आहे. (चां.अ.क्र.८.) त्यामुळे चरित्रात्मक माहितीत, गणोबा, तू म्हणतोस तसा घोळ होतो. शिवाय 'तत्त्वसार' या ग्रंथलेखनाचा शक चांगा मुधेश या समाधी शकाशी (१२३४) जुळतो. चांगावटेश्वरशिष्य चांगा मुधेश यातील नामसादृश्यामुळे हा संभ्रम निर्माण झाला असावा.

**गणु :** म्हणजे पुणतांब्याला चांगावटेश्वराची समाधी आहे हे मानायचे की नाही?

**महाराज :** हे बघ गणोबा, तू मघाशी म्हणालास तसे संत नामदेव पहिले संत चरित्रकार ठरतात. त्यांच्या अभंगाच्या प्रमाणाने ते मानावेच लागेल. गणोबा श्री नामदेवांनी 'श्री चांगदेव महाराजांची समाधी' प्रसंग अभंगछंदात वर्णिला आहे. स्वतः पांडुरंग, पुंडलिक, निवृत्ती, मुक्ताई, नामदेव, विसोबा खेचर अशी मंडळी श्री ज्ञानदेव व सोपान यांच्या समाधीनंतर तीर्थयात्रा करीत निघाली. गंगा गोदावरीचे स्नान करण्याचा मनोदय केला. पौष महिना कोपरगाव बेटावर कचेश्वरांच्या सान्निध्यात घालवल्यानंतर माघ प्रतिपदेला ''नामा म्हणे देवा जावे पुण्यस्तंभा । मनोहर जागा श्री सिद्धेश्वर''।। श्री चांगदेव महाराजांची समाधी स.सं.गा. श्री नामदेव महाराजांची गाथा सं. डॉ. गोसावी अ.क्र. ११४८।। याप्रमाणे सिद्धेश्वर आश्रमात माघ पौर्णिमेपर्यंत राहिल्यावर

**''निवृत्ति मुक्ताई संगे आला चांगा । म्हणती पांडुरंगा उठा आतां ।।३।।**
**ज्ञानदेवासाठीं उत्सव अलंकापुरीं । तैसा कऱ्हेतीरी सोपानासी ।।४।।**
**तैसा चांगयाची पुरवावी आळी । नामा वनमाळी उठावले ।।५।।''**

स.सं.गा.ना.गाथा अ.क्र. ११४९

खरेतर दशमीच्या दिवशीच प्रस्थान ठेवले होते. मंडप उभारला होता. नामदेव स्वतः नित्य कीर्तन करीत होते. स्वतः पांडुरंग हा सगळा सोहळा घडवीत होते.

**''गोदातीरीं उत्सव करिती जगजेठी । चांगदेवासाठी समारंभ ।।१।।**
**निवृत्ति मुक्ताबाई संगे पंढरीनाथ । आले मंडपात समुदायासी ।।२।।**
**निवृत्ति पांडुरंग बैसले निवाडे । चांगदेव पुढें उभे ठेले ।।३।।**
**जोडियेले कर चांगदेव पुढती । करिती विनंती वोसंडोनी ।।४।।**
**नामा म्हणे देवा उठिले अंतःकरण । नाही देहभान चांगयासी ।।५।।**

स.सं.गा. ना.गा अ.क्र. ११५१

बरं का, गणोबा, चांगदेवांचा, पुण्यस्तंभी समाधीस्त होण्याचा, संकल्प झाला होता. त्याचे प्रत्यक्ष साक्षी नामदेव महाराज आहेत. चांगदेव महाराजांनी स्वतः सर्वांसमोर आत्मनिवेदन केले आहे. नामदेव महाराजांनी अभंगातून या



कथेचे वर्णन केले आहे. त्यातून चांगदेवांनीच प्रांजळपणे आपल्या चौदाशे वर्षे केलेल्या तपश्चर्येचे फलित कथन केले आहे. हे आत्मकथनानुसार श्री चांगदेव महाराज, श्री ज्ञानेश्वर माऊलींना शरण आले होते. मुक्ताबाईंकडूनच त्यांनी अनुग्रह घेतला आणि पुणतांबे येथेच ते समारंभपूर्वक समाधीमग्न झाले हे स्पष्ट आहे. हे आत्मनिवेदन ऐकण्याजोगे आहे.

**''चवदाशें वर्षें शरीर केले जतन । नाहीं अज्ञानपण गेलें माझे ।।१।।**
**अहंकारे माझे बुडविलें घर । झालों सेवा चोर स्वामी संगें ।।२।।**
**तापत्रयीं तापलों महाअग्नीं जळालों । अविवेकीं झालों मंदमती ।।३।।**
**काय माझा देह वायांवीण व्यर्थ । आलों शरणागत पांडुरंगा ।।४।।**
**अभिमाने आलों श्री अलंकापुरी । अज्ञान केलें दुरी मुक्ताईनें ।।५।।**
**नामा म्हणे भोग दुःखाचे शरीर । काय याचा घोर करूनिया ।।६।।''**

स.सं.गा. ना.गा. अ.क्र. ११५२

चांगदेवांच्या समाधीचा सोहळा माघ शु. दशमीपासून माघ वद्य त्रयोदशीपर्यंत सुरू होता. त्याचे वर्णन नामदेवांनी केले आहे. त्रयोदशी दिवशी,

**''मुक्ताईने चांगा घेतलासे पोटा । उठा आतां भेटा लहानथोर ।।१।।**
**भेटले ऋषीवर वैष्णव सकळीं । बैसले ते पाळीं समाधीच्या ।।२।।''**

स.सं.गा. ना.गा. चां.स. अ.क्र. ११६२

चांगदेवांनी यथासांग पूजन आणि नमन केले. अखेर पुंडलिकांनी चांगदेवांचा हात धरला आणि चांगदेवाला समाधीस्थानी विराजमान केले.

**''कुंकुम केशराचे समाधीसी सडे । पहाती निवाडे जन लोक ।।१।।**
**गोदातीरी महोत्सव चांगदेवा । पूर्णा तूं विसावां पांडुरंगा ।।२।।**
**समाधी भोंवते उभे साधुसंत । उतरले आंत चांगदेव ।।३।।**
**निवृत्ति पांडुरंग गेले समागमें । वैष्णव रामराम बोलताती ।।४।।**
**राही रखुमाबाई उभ्या दोहीं बाहीं । मध्यें मुक्ताबाई संबोखिती ।।५।।**
**नामा पुंडलिक करिती समाधान । स्थीर करा मन बोध भावें ।।६।।''**

स.सं.गा. ना.गा. चां.स. अ.क्र. ११६६

गणोबा, चांगदेवांच्या समाधीनंतर सर्व मंडळी नेवाशाला आली. नंतर

तेथून अशीच महाराष्ट्रातील पुण्यस्थळे पाहात तापी तीरावर आली. तेथे मुक्ताबाईंचा समाधी सोहळा झाला. ''परंपरेनुसार शके १२१९ (इ. १२९७) च्या वैशाख वद्य १२ ला जळगाव जिल्ह्यातील एदलाबाद तालुक्यापासून तीन कोसांवर व चांगदेवांपासून दोन मैलांवर तापीतीरी महद्ग्राम तथा मेहुण येथे ती गुप्त झाली'' असे डॉ. गोसावी यांनी नोंदविले आहे. नामदेव, श्री विठ्ठल, पुंडलिक आणि निवृत्तिनाथ यांचे संवाद नामदेवांनी वेळोवेळी अभंगातून वर्णिले आहेत. हा कदाचित नामदेवांचा आत्मसंवाद मानला तरी; गणोबा तू म्हणतोस तसे ज्ञानदेव, सोपान, चांगदेव आणि मुक्ताबाई यांच्या समाधीप्रसंगांचे नामदेवच साक्षीदार आहेत हे खरे त्यामुळे, पुणतांबा येथील चांगदेवांची समाधीच सर्वमान्य म्हणावी लागेल. संत नामदेवांच्या अभंगामध्ये पुंडलिक, पांडुरंग, राही, रखुमाई उपस्थित होते. हे सांप्रदायिक आस्थेमुळे उल्लेखिले आहे.

**गणु** : महाराज, पण चांगदेवपुरीचे चांगदेव महाराज आणि वटेश्वरांचे स्थान कोणाचे? डॉ. ढेरे म्हणतात त्याप्रमाणे चांगामुधेश या प्रशिष्याचे स्थान कोणते? चांगदेव गाव वटेश्वर मंदिर या सर्व गोष्टी तर आहेतच, आणि जवळच मुक्ताबाईंची समाधीपण आहे, त्याचे काय?

**महाराज** : गणोबा, ह्याविषयी निर्णय करणे कठीणच होऊन बसते. पण चांगामुधोजीचा समाधी शक मुक्ताबाईंच्या समाधीनंतरचा आहे. त्यामुळे त्यांच्याशी मुक्ताबाईंचा संबंध नाही. आणि पुणतांब्यात चांगामुधोजींची समाधी म्हणावी तर सर्वमान्य चरित्रकार संत नामदेव तर चांगावटेश्वरांच्या समाधीवेळी मुक्ताबाई उपस्थित होत्या असे म्हणतात. याचा अर्थ असा की, चांगदेवपुरीतल्या चांगदेवांविषयी संशोधन व्हावे. पुणतांब्याच्या नव्हे. बरं गणोबा मृत माणसांना जिवंत करणे, हा चमत्कार मुक्ताईच्या आणि चांगदेवांच्या नावावर मौखिक परंपरेने आहे. तोही, पुणतांब्याचाच सांगितला जातो. एकूण गणोबा तीर्थावळी करीत असतांना, चांगदेवांची भ्रमंती अनेक ठिकाणी झाली असेल. त्यात तापी तीरावरील चांगदेवपुरी हे ही गाव आणि वटेश्वर मंदिर असणे शक्य आहे किंवा चांगदेव मूळ चांगदेवपुरीचे असतील नंतर योगसाधना करण्यासाठी हरिश्चंद्रगडावर आले असावेत. बरका गणोबा, ऋषीमुनींच्या समाध्यांच्या बाबतीत एवढेच काय, नवनाथांच्या समाध्यांच्या बाबतीत अशीच अनेक समाधीस्थाने दाखविली जातात. आपल्या गावातील स्थान हेच खरे समाधीस्थान, असा प्रत्येक गावाचा आग्रह असतो. तो ग्रामस्थांच्या श्रद्धेचा भाग आहे.



चांगावटेश्वरांचे अनेक शिष्य होते. चौदाशे वर्षांच्या कालावधीमध्ये अनेक ठिकाणी प्रवास, ध्यानधारणा, समाधीयोगसाधना घडली असेल. त्यामुळेच वटेश्वराची अनेक स्थाने आणि चांगदेवांची अनेक स्थाने सांगितली जात असतील. चांगदेव मुधोजींची समाधी हीच चांगावटेश्वरांची म्हणून प्रसिद्ध होणे शक्य आहे. कारण चांगामुधोजी हे चांगदेवांचे सशिष्य होते.

**गणु** : म्हणजे महाराज, भागवत संप्रदायात मान्यता असलेले स्थानच खरे म्हणावे लागेल.

**महाराज** : अगदी बरोबर.

**गणु** : आणि चौदाशे वर्षे योगसाधना करण्याचे स्थान आणि गुरुकुल सिद्धपीठ कोणते मानायचे? कारण भागवत संप्रदायात तर फक्त पुण्यस्तंभ पुणतांब्याचा उल्लेख आहे.

**महाराज** : गणोबा, आळंदी, नेवासा, पैठण, कोपरगावबेट, त्र्यंबकेश्वर, नाशिक या कृष्णा-गोदावरीच्या खोऱ्यांचा, मुळा, प्रवरा, गोदावरी नद्यांचा परिसर पाहिला तर, हरिश्चंद्रगड हा या परिसरातील महत्त्वाचे स्थान म्हणून प्रसिद्ध असावा, हे मान्य करावे लागते. येथे एखादे सिद्धपीठ, शक्तीपीठ आणि गुरुकुल असावे अशा सर्व सोयीसुविधा आणि वननिवास व एकांत साधता येईल असे स्थान म्हणून हरिश्चंद्रगड आहे हे, मी स्वतः पाहिल्यावर मला पटले. शिवाय चांगदेवांना माऊलींनी 'चक्रपाणी' असे संबोधले आहे. त्या सर्व गोष्टी पाहिल्या की चांगदेवांचे गुरुकुल, सिद्धपीठ हरिश्चंद्रगडावरच होते हे स्पष्ट होते. शिलालेखातील चांगदेव हा उल्लेख डॉ. ढेरे यांनी नोंदविला आहे, या प्रमाणाने तर ते सिद्धच होते. भीमाशंकर ते त्र्यंबकेश्वर या डोंगररांगांवर शिवस्थाने तर आहेतच परंतु कृष्णा आणि गोदा खोऱ्याचा हा प्रदेश, गालव, पाराशर, विश्वामित्र, अगस्ती, ऋष्यशृंग, कपिलमुनी, वाल्मिकी अशा अनेक ऋषीमुनींची स्थाने असलेला आहे; याची पुराणे साक्ष देतात. म्हणजे नाथ परंपरेतील नाथांनी जसा हा परिसर निवडला तसा त्याच परंपरेतील श्री योगीराज चांगदेवांनी, हाच परिसर निवडला असावा, हे स्पष्ट आहे. म्हणजे हरिश्चंद्रगड हेच श्री योगीराज चांगावटेश्वरांचे स्थान असावे.

**गणु** : महाराज, आपण अगदी निर्वाळा देऊनच स्थान निश्चित केले. हरिश्चंद्रगडावरूनच श्री चांगदेव महाराज आळंदीला श्री ज्ञानेश्वरांना भेटायला गेले असतील, नाही का?

**महाराज** : गणोबा, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांना चांगदेव भेटले. मात्र मुक्ताईकडून अनुग्रह घेऊन ते हरिश्चंद्र गडावर पुन्हा आले असावेत. तेथेच त्यांनी आपला 'तत्त्वसार' हा ग्रंथ पूर्ण केला. गुरुकुल आणि शिष्यमंडळींना निरोप दिला असावा आणि ते पुन्हा श्री ज्ञानदेवांच्या समाधीपूर्वी आळंदीत भागवत संतमेळ्यात राहू लागले असावेत. त्यांच्यात राहूनच त्यांनी अभंगरचना केली असावी असे म्हणता येते. या दृष्टीने त्यांचा एक अभंग मोठा सूचक आहे.

**''मी माझें दुरित आशापाश चित्ती । मोह ममता भ्रांति अहंभावे ।।१।।**
**हरितसे तेज अभीमान ताठा । एकतत्त्वें वैकुंठी हरिपाठें ।।२।।**
**नाशिवंत देह पंचतत्त्वमोळी । वायांच वाहाटुळी उडोनि जाये ।।३।।**
**मुक्ताई जीवन चांगया दिधलें । निर्गुणी साधिलें घर कैसें ।।४।।''**

स.सं.गा. श्री चांगदेवांचे अभंग अ.क्र. ३ संपा. डॉ. र. रा. गोसावी

**गणु** : पण महाराज, श्री चांगदेव महाराजांनी चौदाशे वर्षे फुकट घालवली का?

**महाराज** : नाही नाही. गणोबा, चांगदेव सिद्ध हटयोगी होते. योग मार्ग ऋषीमुनी, नाथ, सिद्ध सर्वांनीच अनुसरला. नाथांची गुरुपरंपरा मुक्ताई चांगदेवांपर्यंत येऊन पोचते. अरे कलियुगाचे ठिकाणी त्या अतिकठीण, क्लिष्ट योगमार्ग सर्वसामान्य गृहस्थाश्रमी लोकांना जमणे शक्य नाही. पूर्वीसुद्धा योगमार्गाने मोक्षाप्रत जायचे असेल तर विजनवासात जाऊन, साधना करावी लागे. सिद्धी प्राप्त करणे, युद्धातील शस्त्रास्त्र प्राप्त करणे, विविध शक्ती संपादन करणे, यासाठी समाधीसाधना अर्थात योगसाधना करावी लागे. वर्णाश्रमानुसार वानप्रस्थ आणि सन्यासमार्ग यांत अशी साधना करीत. ऋषी, सिद्ध अशी साधना करून जगाच्या कल्याणासाठी जीवन झोकून देत. या योगमार्गात सिद्धी प्राप्त होतात. त्या सिद्धींच्या योगाने पंचमहाभूतांवर विजय मिळविता येतो. सर्व शक्तींवर विजय मिळवून, त्यांना आपल्या आज्ञेत ठेवता येते. नाथसंप्रदायातील नवनाथांनी हा मार्ग जनकल्याणासाठी वापरला. या मार्गात मंत्र, तंत्र, यंत्र, विधीविधाने, अनेक प्रकारच्या वशीकरण विद्या प्राप्त करतात. जणू देवत्व प्राप्त होते. मोक्षसाधना भोगून, जनकल्याण करता येते. हा मार्ग निवृत्तिनाथांपर्यंत चालतच आला आहे. श्री चांगदेव महाराज हे या मार्गातील नाथपरंपरेतील योगीराज



होत. निवृत्तिनाथांपासून नाथसंप्रदायाने कलियुगात, नवविधा भक्तिमार्गाने प्रपंचात राहून सुलभपणाने मोक्षापर्यंत, याचिदेही याचिडोळा, जाता येते, हे जाणले. श्री ज्ञानदेवांनी भागवत संप्रदायाचा पाया, संत नामदेवांच्या सहाय्याने घातला, मात्र योगमार्ग नाथसिद्धपरंपरा आणि भक्तिमार्ग यांची सांगड घातली. म्हणूनच सर्व संतांची गुरुपरंपरा नाथपरंपरेतून आलेली दिसते. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालूनही ज्ञानयोग साधता येतो हे या संतमंडळींनी दाखवून दिले. सर्व कल्याणाचा मार्ग म्हणजे ज्ञानयोग आणि भक्तियोग यांची सांगड हे संतांनी सिद्ध केले. प्रसंगी योगमार्गातील सिद्धींचे चमत्कार सर्वांना या मार्गाकडे खेचून, ज्ञानी करण्यासाठी, या संतमंडळींनी केले असावेत. सिद्धी ही मोक्षमार्गातील अडथळा आहे. सिद्धींच्या मोहात मोक्षसाधना थांबते; हे ठावूक असूनही; संतांनी सामान्यांच्या श्रद्धेला बळकटी देण्यासाठी चमत्कारही केले. गणोबा, श्री योगेश्वर चांगदेव योगमार्गाचे आग्रही, सिद्ध, कर्मठ, असे नाथसंप्रदायातील प्रकांड साधक असावेत. वटेश्वर अर्थात आदिनाथ शिव हेच आपले पिता व हेच आपले गुरू म्हणून त्यांनी आपली कठोर साधना केली. ती सिद्धीसही गेली. म्हणजे गणोबा, नाथसंप्रदायासारख्या मार्गाचा, आग्रही पुरस्कार करून वटेश्वर सिद्धसंप्रदाय वाढविणारे कठोर योग पुरुष म्हणून त्यांचा अधिकार मोठा होता.

**गणु** : महाराज, योगीराज चांगदेवांनी संत ज्ञानेश्वरांना कोरे पत्र पाठवले असे सांगतात; असं खरंच का केलं असावं?

**महाराज** : गणोबा, खरंच कोरं पत्र पाठवलं याला, संप्रदायात चालत आलेली कथा एवढाच आधार आहे. हे पण श्री चांगदेव महाराजांच्या एका गमतीशीर कूट अभंगात वर्णिली आहे. तशी अवस्था श्री चांगदेवांच्या मनात आणि श्री ज्ञानदेव, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाईच्या मनाच्या ठिकाणी या प्रसंगाने झाली असावी असे वाटते.

**''आकाशाचा शेंडा घार रांधी मांडा । काऊळा वाढी कांदा कुल्लाळ भोजन करी ।।१।।**
**दिहा पडे चांदणें रात्रीं पडे उष्ण । चोर घरटी घाली तराळ घाली खाण ।।२।।**
**सासुनें खादलें उंडे सुन तरळे । लेकीं लासिली जांवाई गडबडा लोळे ।।३।।**
**धमकत घुसळण घातले पारी । वटेश्वरसुता म्हणे मुक्ताई अवधारी ।।४।।''**

स.सं.गा डॉ. गोसावी, श्री चांगदेवांचे अभंग क्र. १८

अतर्क्य, विस्मयकारक, विचित्र, विपरित, तरी सत्य अवतरते; हीच स्थिती या चांगदेव-मुक्ताई संवादातून प्रकट करून; सद्‌गुरू कृपेने अशक्य शक्य होते; असे सूचित केले आहे. मात्र त्यासाठी अहंकार दमन झाला पाहिजे. संप्रदायात श्री ज्ञानदेव व भावंडे यांच्याशी चांगदेवांच्या भेटीविषयी एक कथा सांगितली जाते. वै.ह.भ.प. मामासाहेब दांडेकर प्रासादिक- सार्थ श्री ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत, ज्ञानदेवांचे अल्पचरित्र, या भागात नोंदविली आहे. ती अशी, ''रेड्यामुखी वेद वदविणारे हे कोण? असा सर्वत्र चर्चेचा विषय झाला. अनेक महापुरुषांना या गोष्टीचे कुतूहल वाटले. अनेक महापुरुषांना ज्ञानदेवादि भावंडांना भेटण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. योगी, भक्त, पंडित त्यांना भेटण्यासाठी गर्दी करू लागले. यापैकी एक महान योगीपुरुष चांगदेव होते. त्यांचे वय १४०० वर्षे होते. चांगदेवांच्या मनात या बालयोगींच्या विषयी कुतूहल निर्माण झाले. भेटण्यापेक्षा पत्राद्वारे परिचय करून घेणे, त्यांना जास्त प्रशस्त वाटले, पण पत्रास कशी सुरुवात करावी? 'चिरंजीव' की 'रा.रा.' अशा संभ्रम आणि विचार गोंधळामुळे पत्र कोरेच पाठविले. ज्ञानदेवांना पाठविलेला हा कोरा कागद आणि त्या मागील हेतू त्यांच्या लक्षात आला. त्या कोऱ्या कागदावर ज्ञानदेवांनी पासष्ट (६५) ओव्या लिहून पाठविल्या आणि चांगदेवांचा गर्वपरिहार केला. त्या ग्रंथास 'चांगदेव पासष्टी' असे म्हणतात. पत्राचे उत्तर चांगदेवांना पोहचताच त्यांच्या मनात ज्ञानदेवांविषयीचे कुतूहल अधिकच वाढले. ते त्या क्षणी वाघावर स्वार होऊन, हातात सर्पाचा चाबूक घेऊन, ज्ञानदेवांच्या भेटीस निघाले. चांगदेव वाघावर बसून येत आहेत हे समजताच ज्ञानदेव ज्या भिंतीवर बसले होते. त्या भिंतीस त्यांनी आदेश दिला आणि त्या भिंतीवर बसून चांगदेवांना सामोरे गेले. अचेतन वस्तूला चैतन्य देणारे ज्ञानदेव पाहून चांगदेवांचा गर्वपरिहार झाला. ज्ञानदेवांना शरण जाऊन त्यांनी ज्ञानदेवांचे शिष्यत्व स्वीकारले. ज्ञानदेव भगिनी मुक्ताईने त्यांना आत्मस्वरूपाची प्राप्ती करून दिली.'' संत निळोबारायांनी श्री ज्ञानदेव आणि योगीराज चांगदेव भेटीचा प्रसंग 'चांगदेव चरित्र' वर्णन करतांना मोठ्या लाघवाने लिहिला आहे. (स.सं.गा. सं.वि.गा. अ.क्र. १५५२ ते १५५७ संपा. डॉ. र. रा. गोसावी).

**गणु** : महाराज, ही कथा मी ही वाचली आहे. माझ्या मनात प्रश्न पडला, की माऊलींनी त्याच कोऱ्या कागदावर 'चांगदेव पासष्टी' लिहून पाठवली असेल, तर मग 'चांगदेव पासष्टी' प्रसिद्ध कोणी केली असेल?

**महाराज** : तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. 'भावार्थ दीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी' सर्वांसमोर प्रकट झाली. 'अमृतानुभव' श्री निवृत्तिनाथांच्या कृपेने सिद्ध होऊन त्याचा आत्मसंवाद स्वरूप आस्वाद ज्ञानदेवांनी घेतला. ते म्हणतात-

**परी गा श्री निवृत्तीराया । हातातळी सुखविलें तूं या ।**
**तरी निवांतचचि मियां । भोगावें कीं ते ।।१।।** अमृ. ग्रंथपरिहार ओ.१।।
**ययालागीं हे बोलणें । अनुभवामृतपणें ।**
**स्वानुभूति परगुणें । वोगरिले ।।२४।।** अमृ. ग्रंथपरिहार ओ.२४।।

अर्थातच श्री निवृत्तिनाथांच्या आज्ञेने आणि श्री चांगदेवांकरिता, श्री निवृत्तिनाथांच्या कृपेने 'चांगदेवपासष्टी' ज्ञानदेव महाराजांनी श्री चांगदेवांना, प्रसाद स्वरूपात दिली. ते म्हणतात,

**''चांगदेवा तुझेनिव्याजे । माउलिया श्रीनिवृत्तिराजे ।**
**स्वानुभव रसाळ खाजे । दिधले लोभें ।''** चां.पा.ओ.क्र. ६१।।

असे असले तरी डॉ. र. रा. गोसावी चांगदेव चरित्रात लिहितात, ''मुक्ताईने विश्रांती वटाखाली चांगदेव पासष्टीचा अर्थ चांगदेवास समजावून सांगितला, म्हणजेच वटाखाली स्वतःच्या ईश्वररूपाशी चांगदेव एकरूप झाले म्हणून वटेश चांगा असे हे स्वतःला म्हणवून घेऊ लागले असतील असे एक मत 'तत्त्वसार' ग्रंथाचे संपादक डॉ. ह. रा. दिवेकर व्यक्त करतात,'' हा उल्लेख विचारात घेता; गणोबा, तू म्हणतोस तसे, श्री निवृत्तिनाथ कृपेने आणि सांगण्यावरून श्री ज्ञानेश्वरांनी या पत्ररूप पासष्ट ओव्या लिहून पाठवल्या. मात्र त्या 'चांगदेव पासष्टी' म्हणून मुक्ताईंनी चांगदेवांना समजून सांगण्याच्या निमित्ताने, एक प्रकारे सर्वांसाठी ग्रंथरूपाने खुल्या केल्या, असेच म्हणावे लागेल.

**गणु** : महाराज, 'चांगदेव पासष्टी' हा केवळ पासष्टच ओव्यांचा ग्रंथ लिहावा; हे ९००० ओव्यांची ज्ञानेश्वरी, सुमारे ९०० ओव्यांचा अमृतानुभव, सुमारे एक हजार अभंग लिहिणाऱ्या माऊली ज्ञानेश्वरांनी लिहावा, हे आश्चर्यच?

**महाराज** : अरे गणोबा, यात आश्चर्य काही नाही. हवा तेवढा विस्तार आणि हवा तेवढा संकोच हे तर श्री ज्ञानदेवांच्या काव्याचं एक वैशिष्ट्य

आहे. एखाद्या अभंगात संपूर्ण अमृतानुभवाचं सार ते सांगून जातात तसेच. जेव्हां ''चौदाशे वर्षे तपश्चर्या करून चांगदेव अजून 'कोराच' राहिलेला दिसतो'' ह्या डॉ. गोसावींनी नोंदविलेल्या मुक्ताईच्या वाक्याप्रमाणे, चांगदेवांचा 'कोरे'पणा हे अज्ञान आहे की पूर्णज्ञान आहे; हे पारखण्यासाठी श्री ज्ञानदेवांनी श्री निवृत्तिनाथांच्या आज्ञेने 'तत्त्वमसि' या महावाक्याचा बोध उत्तरात्मक पत्रात केला हे डॉ. गोसावींचे म्हणणे योग्य नव्हे का?

**गणु** : म्हणजे महाराज 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ म्हणजे तर, औषधाची गोळीच झाली म्हणायची.

**महाराज** : गणोबा बरोबर बोललास म्हणूनच तर 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ म्हणजे 'गुटिकांमृत'च होय. आई जशी बाळाला गुटी देते तसे माऊली ज्ञानेश्वरांनी, हे 'गुटिकांमृत' माऊली निवृत्तिनाथ कृपेने, श्री चांगदेवांना दिले आणि माऊली मुक्ताईंनी ते 'गुटिकांमृत' श्री चांगदेवांना पाजून जोजवले. यासंदर्भात मोठा रम्य उल्लेख ह.भ.प. निवृत्तीनाथ महाराज वक्ते यांनी केला आहे.

ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या 'ब्रह्मचित्कलादर्शन अर्थात श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा' या गीताप्रेस, गोरखपूरने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे, 'ज्ञानेश्वरी लिहून ही मंडळी नेवाशाहून ब्राह्मणीस गेली. तेथे ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या खांबास टेकून अमृतानुभव सांगितला, तो खांब अजूनही ब्राह्मणीस आहे.' यावरून अमृतानुभव ब्राह्मणीस सांगितला, हे सिद्ध आहे. आजही तेथे ब्राह्मणीस मुक्ताबाईचे मंदिर असून तिच्यापुढे रेडा आहे. मुक्ताबाई लहान असल्यामुळे जो पैठणला रेडा वेद बोलला, त्याच रेड्याच्या पाठीवर बसून मुक्ताबाई प्रवास करीत असे. मुक्ताबाई देवी असल्यामुळे तिचे वाहन रेडा आहे. त्या रेड्याच्या पाठीवर मुक्ताबाईच्या पादुका आहेत. ब्राह्मणीस शके १२१२ च्या कार्तिक वद्यात अमृतानुभव सांगितला. निवृत्तिनाथ म्हणाले, 'तुम्ही ज्ञानेश्वरी गीतेवरील टीका लिहिली, पण तुमचा 'सर्व खल्विदं ब्रह्म' याविषयीचा स्वतःचा काही अनुभव सांगा. म्हणून ज्ञानेश्वरांनी ब्राह्मणीस अमृतानुभव सांगितला.'

ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या या उल्लेखाच्या आधारे आज आणि प्रत्यक्ष ब्राह्मणीतील मौखिक परंपरेप्रमाणे, ब्रह्मचित्कला म्हणजे मुक्ताई अर्थात ब्राह्मणी. ब्राह्मणी म्हणजे ब्रह्मज्ञानी. माऊली ज्ञानेश्वरांनी जेथे, ज्या खांबास



टेकून श्री निवृत्तिनाथ कृपेने आपले, स्वतःच्या चिंतनातून स्वीकृत तत्त्वज्ञान, 'अमृतानुभव' स्वरूपात, १९ प्रकरणात ८११ ओव्यात, ब्रह्मचित्कला मुक्ताबाईंच्या समोर निरुपित केले तेथे त्यामुळे मुक्ताई ब्रह्मज्ञानी अर्थात ब्राह्मणी झाली. या प्रसंगाची आठवण म्हणजे ब्राह्मणी गाव. त्यातील मुक्ताई मंदिर आणि अमृतानुभव प्रसाद खांब अर्थात पैसाचा खांब या खुणा होत.

आळंदीस कोऱ्या पत्राच्या उत्तरार्थ श्री ज्ञानेश्वर निरुपित 'अमृतानुभव' ग्रंथातील अद्वैत तत्त्वज्ञान अर्थात ब्रह्मज्ञान केवळ पासष्ट ओव्यात कथन केले. तेच पुन्हा श्री चांगदेवांचे गुरुपद सांभाळीत ब्रह्मचित्कला मुक्ताईंनी पासष्ट ओव्या चांगदेवांना उलगडून दाखविल्या आणि चांगदेव ब्रह्मज्ञानी झाले. अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी यांचा असा अन्योन्य संबंध आहे. माऊली ज्ञानेश्वरांनी, माऊली निवृत्तिनाथांच्या आज्ञेने ब्रह्मज्ञान चांगदेवांस पासष्टीच्या स्वरूपात निवेदित केले. तेच ब्राह्मणी मुक्ताईंनी माऊलीच्या ममतेने चांगदेवास उलगडून सांगितले. एकप्रकारे या ब्राह्मणीने अमृतगुटिका बालकास देऊन जोजविले, शांत केले. त्या पासष्टीचा अर्थ मुक्ताबाईने सांगितले – लेवविला सर्वांगी पासष्टी अर्थ । होऊनि कृतार्थ ठेला पायीं ।।६४।। (नि.गा. १५५७). याच ग्रंथात श्री. वक्ते महाराजांनी चांगदेव पासष्टी हे माऊली ज्ञानेश्वर विरचित प्रकरण असल्याचाही निर्वाळा दिला आहे.

**गणु** : महाराज, 'चांगदेव पासष्टी' हा 'गुटिकामृत' स्वरूपातला ग्रंथ आहे ना? मग, महाराज, एखादा ग्रंथच पत्र म्हणून कसा पाठवला? की पत्राला ग्रंथाचं स्वरूप दिलं? अहो, ग्रंथ वेगळा आणि पत्र वेगळं, होय ना महाराज?

**महाराज** : गणोबा, अरे वा! तू तर मोठाच भाष्यकार झालास! पण, हे बघ, माऊलींचा प्रत्येक शब्द, प्रत्येक ओवी यांनाही ग्रंथाचं मूल्य आहे. माऊलींच्या प्रत्येक शब्दात केवळ ज्ञानाचाच अनुभव घेता येतो. कारण माऊलीच ज्ञानस्वरूप आहेत. मग गणोबा, पत्राला ग्रंथाचं मूल्य नाही का प्राप्त होणार? माऊली मुक्ताईंनी हेच तर चांगदेवांना समजावून दिलं.

**गणु** : महाराज, हे गुटिकांमृत समजून घ्यायला मी अति आतूर झालो आहे. महाराज, मला आपल्या मुखाने 'चांगदेव पासष्टी'तील दिव्य अर्थ समजून घ्यायचा आहे.

**महाराज** : होय, होय, गणोबा तू जेव्हढा आतूर आहेस, तेव्हढाच मी

ही आतूर आहे!

**गणु** : म्हणजे महाराज?

**महाराज** : गणोबा, माऊलींचे शब्द हा केवळ समजून घेण्याचा विषयच नाही. नामदेव महाराज म्हणतात त्याप्रमाणे, माऊलींचा शब्द हा अनुभवण्याचा विषय आहे. हां, त्यासाठी समजून घेतलंच पाहिजे. म्हणूनच आपण अवधान एकवटून एकचित्ताने हे 'गुटिकामृत' सेवन करूया.

●●●



# ३. चांगदेव पासष्टी

महाराजांनी 'गुटिकांमृत' स्वरूप 'चांगदेव पासष्टी' जाणून घ्यायला सुरुवात केली. गणु कानात प्राण एकवटून, अमृतपान करण्यास सिद्ध झाला. माऊली ज्ञानेश्वरांचा आत्मसाक्षात्कार पत्रातून प्रकट होऊ लागला. निर्गुण निराकार परमाात्म्याच्या, सच्चिदानंदस्वरूप अवस्थेची जाणीव होऊ लागली. श्री ज्ञानराज माऊलींच्या सर्वव्यापी प्रदक्षिणेला श्री निवृत्तिनाथकृपेने सुरुवात झाली. अक्षर-अक्षर, शब्द-शब्द, कागदावर उमटतांना कागद धन्य, धन्य होऊ लागला-

**स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ।**
**दावी, मग ग्रासु । प्रगटला करी ।।१।।**

महाराज सांगू लागले- श्री वटेशु, स्वस्ति. जो (वटेश अर्थात आदिनाथ शिव) लपोनि, जगदाभासु दावी; मग प्रगटला (की) (जगताचा) करी ग्रासु. हे, श्री वटेशा, तुझे कल्याण असो. श्री वटेशा, तू म्हणजे, साक्षात शिव आहेस. जो शिव (कैवल्य, अनंत, परमात्मा) लपतो, दिसेनासा होतो, तेव्हां तोच हे आभासात्मक जगत दाखवितो. या दृश्य जगात सर्वत्र तो शिव लपलेला असतो. आपल्याला वाटते, हे दिसणारे प्राणीमात्र, वस्तुमात्र, त्यांचे अस्तित्व, त्यांचा व्यवहार, त्यांचा जन्ममृत्यू; हेच खरे आहे. वास्तविक या सर्वात लपलेल्या 'शिव' तत्त्वाची, सच्चिदानंदरूप परमात्म्याची, ती लीला असते. खेळ असतो. तो खेळच खरा आहे, असे समजून; लपलेल्या शिवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण करू लागतो. त्यासाठी साधनांचा, मार्गांचा

अनुसार आपण करतो. वस्तुतः शिव तर आभासात्मकतेने प्रकटलेल्या, सर्व चराचर वस्तुमात्रात नव्हे तर वस्तुमात्रांच्याच रूपाने नटला आहे. ते बाह्य, नाशिवंत, मर्त्य, परिवर्तनशील असे नटवे रूप, आपल्याला भासमान होते. त्याच रूपात शिव लपलेला असतो. किंबहुना तो रूप घेतो, म्हणजेच लपतो. म्हणूनच ते रूप सत्य आहे असे वाटते. बहुरूप्याने रंग फासून, कपडे विशिष्ट प्रकारचे घालून, प्रसिद्ध क्रांतीकारक उमाजी नाईकाचे सोंग आणलेले असते किंवा साक्षात अर्धनारी नटेश्वराचे सोंग आणलेले असते किंवा पोलिस इन्स्पेक्टरचे सोंग आणून, चौकशी करीत हिंडणे सुरू केलेले असते; ती सर्व सोंगे असतात. भ्रामक असतात. सोंग सांडले की पुन्हा सोंगात लपलेला बहुरूपी प्रगट होतो. तेव्हा सोंग नाहीसे झालेले असते. बहुरूप्याने सोंगाचे सामान नाहीसे केलेले असते. वटेशाची लीला तशीच आहे. वटेश लपतो तेव्हा हे आभासात्मक जग वटेशच दाखवितो. जेव्हां स्वतः वटेश प्रगट होतो तेव्हा ह्या जगाचा तो ग्रास घेतो. जग नाहीसे होते. श्री ज्ञानदेव म्हणतात, ''श्री वटेशु तू चांगदेव रूपातच आहेस. त्या चांगदेवाचं कल्याण असो. हे चांगदेवा आपण चांगदेव म्हणून, पत्र म्हणून कोरा कागद पाठविलात खरा, परंतु आपण तर श्री वटेशु आहात, हे मी ओळखले आहे. वटेशु असलेल्या चांगदेवांचे कल्याण असो.'' निर्मळ अंतःकरणाच्या, चौदाशेवर्ष घोर योगसाधना करणाऱ्या आणि शिष्यांकडून करविणाऱ्या, योगीराज चांगदेवांच्या अंतःकरणात, कदाचित आपल्या योगसाधना बलाचा अहंकार सूक्ष्मरूपाने वावरतो आहे; ह्याची जाणीव, माऊली, केवल ज्ञानस्वरूप असलेल्या श्री ज्ञानेश्वरांना, श्री चांगदेवांनी पाठविलेल्या, कोऱ्या पत्रामुळे झाली असावी. योगसाधनेने सिद्ध अवस्थेला पोचलेल्या चांगदेवांना, त्यांच्या स्वस्वरूपाची आठवण करून द्यावी; असा ज्ञानप्रज्वलनाचा उद्देश, श्री ज्ञानदेवांच्या मनी सद्गुरू निवृत्तिनाथांनी प्रेरित केला असावा. म्हणूनच कोणताही औपचारिक मायना न लिहिता, श्री चांगदेवांमध्ये लपलेल्या किंवा चांगदेव रूपाने वावरणाऱ्या श्री वटेशांना, श्री ज्ञानदेवांनी अर्थात श्री ज्ञानदेवातील आत्मरूपाने संबोधित केले. स्वस्ति, असे म्हणताना, श्री ज्ञानेश्वरांना आत्मकल्याणाची जाणीव, भासमान चांगदेव आणि ज्ञानदेव या दोन्ही व्यक्तींना, रूपांना करून द्यावीशी वाटली असावी. ज्ञानसाधनेनेच, सच्चिदानंद स्वरूप प्राप्ती स्वरूपातील कल्याण होईल, अशी या मागील जाणीव असावी. अन्यथा कोऱ्या पत्राने, मनाचा थांग कोणाला आणि



कसा लागावा? कोरे पत्र पाठवितांना चांगदेवांच्या मनाचा उडालेला गोंधळ आणि कोरे पत्र पाहून, क्षणभर का होईना; श्री निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या भावंडांमध्ये, निर्माण झालेला संभ्रम श्री ज्ञानेश्वर माऊलींनी 'स्वस्ति, श्री वटेशु' या संबोधनाने आणि परमात्म्याच्या, अर्थात शिवतत्त्वाच्या लीलाविग्रहाचे सूत्र - 'जो लपोनि जगदाभासु दावी; मग, प्रगटला करी (जगताचा) ग्रासु' - निवेदित करून; तो संभ्रम दूर केला आहे.

**प्रगटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव आभासे ।**
**प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ।।२।।**

माऊली म्हणतात, (हे चांगदेवा) ''परमात्मा म्हणजेच अंतरात्मा, म्हणजेच शिव अर्थात तो परमेश्वर प्रगटतो तेंव्हा दिसत नाही. कारण तो प्रगटला की सर्व आभासविश्व माया लयास जाते. मात्र तो मायारूपाने अर्थात विश्वरूपाने नटला की आभासित होतो. सृष्टी अनुभवास येते. आपण सर्व खरे आहोत असा आभास-अनुभव आपल्याला येतो; असे मी म्हणालो खरा परंतु तसे तरी कसे म्हणता येईल? कारण तो परमात्मा म्हणजेच अंतरात्मा तर 'न खोमता' आहे. तो निर्गुण निराकार आहे म्हणजेच न खोमणारा अर्थात न रुपणारा, न रुजणारा, निरासक्त निरुपाधिक असा आहे. म्हणजेच तो अंतरात्मा अर्थात परमात्मा, परमेश्वर म्हणजेच वटेशु अर्थात शिव तर प्रगटही नसतो आणि लपलेलाही नसतो.'' असे सांगून श्री ज्ञानेश्वरांनी परमेश्वराचे निरहंकारी असे निर्गुण, निराकार अस्तित्व वर्णन केले. वास्तविक अरुपाचे वर्णन केले. तेथे आभासही नाही आणि प्रगटणे अर्थात ज्ञानही नाही. अज्ञान आणि ज्ञान ही जेथे असत नाही असा परम प्रकाश, केवल चैतन्य, असा अनंत परमात्मा आहे. या अवस्थेची जाणीव योगीराज चांगदेवांना श्री माऊली ज्ञानोबाराय करून देण्याचा प्रयत्न करतात. परमात्म्याच्या या निर्गुण, निराकार, निरहंकारी, निरासक्त अवस्थेचे प्रमाण देतांना माऊली परमेश्वराचे असणे अर्थात परमेश्वराने वर्णन करावे तसे; श्रीमद्‌भगवद् गीतेवरील भाष्यस्वरूप श्री ज्ञानेश्वरीत, नवव्या अध्यायात निरुपण करताना म्हणतात-

**हें असो पर्वताचिये हृदयींचे । जे विं पर्जन्य धारास्तव न खोंचे ।**
**तेविं कर्मजात प्रकृतीचें । न लगे मज ।।** १२६।।अ.९, ज्ञा.।।

पावसाच्या धारांनी जसे पर्वताच्या हृदयातील कशाचाही भेद होत नाही; त्याप्रमाणे प्रकृतीचा कर्मसमुदाय मला स्पर्श करू शकत नाही. परमात्मा अर्थात अंतरात्मा लपणे आणि प्रगटणे या क्रियांच्या बाबतीत पूर्ण उदासीन असतो. जणू श्री ज्ञानदेव चांगदेवांना म्हणतात, ''प्रगटणे आणि लपणे ह्या गोष्टी त्या खोमता नसलेल्या अर्थात निर्विकार, निरुपित, निरुपाधिकाला नाहीतच. अर्थात या अवस्था केवळ आपल्यासारख्या जीवाला आहेत. ज्ञान आणि अज्ञान हे या भासमान होणाऱ्या जगताच्या संदर्भाने असते. म्हणूनच जीवाला झालेला अहंकार मिथ्या होय. योगी तर निरुपाधिक स्थितीला पोचलेला असतो. हे योगीराज चांगदेवा आपण तर त्या सिद्ध अवस्थेला पोचले आहात.'' श्री ज्ञानेश्वरांनी हेच प्रमाण देत सांगितले –

**हें अव्यक्तपणे थिजलें । तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें ।**
**तैसें अमूर्तमूर्ति मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणें ।।**

(ज्ञा.अ.९ दा.ओ.क्र. ६६)

अव्यक्तपणे गोळा झालेले हे विश्व नंतर विश्वाच्या आकाराने विस्तार पावले. त्याप्रमाणे अव्यक्त, अमूर्त अशा माझ्याकडून हे त्रैलोक्य विस्तारले असे जाण.

श्री ज्ञानेश्वर माऊली मोठ्या सूचकतेने योगीराज चांगदेवांना सांगतात– ''लपणे आणि प्रगटणे अर्थात अज्ञान आणि ज्ञान हे परमेश्वराला अर्थात अंतरात्म्याला अभिप्रेतच नाही. त्या दोघांना आपल्यात सामावणारे परमप्रकाशरूप असे अस्तित्व, आपल्या अंतरात्म्यात प्रकटते तेंव्हा, मी आणि तू असा अहंकाराचा ढग नाहीसा होतो. हे योगीराज हे आपण समजावून घ्या; की तो तर 'न खोमता' आहे. प्रगट असा तो आणि तो लपून सृष्टीरूपात तो नटलेला तो अशी अवस्था, या दोन्ही केवळ आपल्या मनाने संकल्पित केलेल्या गोष्टी आहेत. ह्या दोन्ही अवस्था त्याच्या त्याच्याच पोटात आहेत असे माना.''

**बहु जंव जंव होये । तंव तंव कांहींच न होये ।**
**कांहीं न होनि आहे । अवघाचि जो ।।३।।**

जंव जंव बहु होये तंव तंव कांहींच न होये. काही न होनि आहे. जो अवघाचि. माऊली ज्ञानेश्वर चांगदेवांना म्हणतात, ''तो (परमात्मा) जेव्हां



प्रगट असतो तेव्हां तो दिसत नाही आणि स्वतःला सृष्टीरूपात लपवून सृष्टीरूपाने नटतो तेव्हां तो आभासमान होतो. असे मी म्हटले खरे पण आणखी गुह्य गोष्ट सांगू? जेव्हां जेव्हां, तो असंख्यरूपाने अर्थात बहुरुपांनी सृष्टी होऊन नटतो ना ते तो काहीच होत नाही म्हणजे त्याला खरेतर विकारच झालेला नसतो. असे काही नसतांना सुद्धा तो आहे कारण; हे चांगदेवा, हे अवघे (अवकाश) तोच आहे. म्हणजे असे की सत्‌चिद्‌आनंद असा परमात्मा, सर्वत्र भरूनही उरला आहे. त्याचे अनेकरूपाने नटणे, तो केवळ असल्याचे आपल्याला वाटणे, असे सर्व असूनही; तो निर्विकारच असतो. त्याच्या सर्वव्यापकतेतही त्याच्यात काहीच बदल होत नाही. जीव आणि जड सृष्टीत तो गुप्त रूपाने म्हणजे लपलेपणाने आहेच. तरीही तो स्वतंत्र, वेगळा, एकला असा आहे. आणि त्याही पलिकडे या दोन्ही अवस्थांचा त्याच्यावर कोणताही परिणाम झालेला नसतो?'' त्या अविचल, निर्विकार, सर्वव्यापक, नित्य सच्चिदानंदस्वरूप असलेपणाचे वर्णन करतांना ज्ञानदेव एका अभंगात म्हणतात –

**''तुज सगुण म्हणों की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकू गोविंदु रे ।।१।।**
**अनुमानेना अनुमानेना । श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ।।ध्रु।।**
**तूज स्थूळ म्हणों कि सूक्ष्म रे । स्थूळसूक्ष्म एक गोविंदु रे ।।२।।**
**तुज आकार म्हणों कीं निराकार रे । साकारू निरूकारू एकु गोविंदु रे ।।३।।**
**तुज दृश्य म्हणों कीं अदृश्य रे । दृश्य अदृश्य एकु गोविंदु रे ।।४।।''**

(ज्ञा.गा. अ. ४०)

एकप्रकारे श्री चांगदेवांना त्या परमप्रकाशापर्यंत पोचविण्याचे दायित्व ज्ञानदेवांवर, श्री निवृत्तिनाथांनी सोपविले. सृष्टीतील सर्व रूपांना, चैतन्यशाली करणाऱ्या, निखळ चैतन्यालाही चैतन्यमयतेत, सामावून घेणारे चैतन्य प्रकाशित करणाऱ्या प्रकाशालाही प्रकाशित करणारा प्रकाश; असे ते सर्वव्यापी तत्त्व, जेथे अज्ञान आणि ज्ञानही लोप पावते, असे परमज्ञान आहे. ज्ञान आणि अज्ञानाचा खेळ मांडून दोहोंना पोटात घेतांनाही, ते तत्त्व निर्विकारच असते. असे ते तत्त्व जेथे जीवाचा आणि शिवाचाही अहंकार गळून पडतो, असे असलेपण तेथे असते, म्हणूनच ज्याला आपण गोविंद असे नाव दिले; त्याचे वर्णन श्रुतींनाही, नेति, नेति, नेति असे त्रिवार म्हणत घोषित करावे लागले आहे. वर्णनच करता येत नाही; मग जीवदशा भोगणाऱ्या चांगदेवांसारख्या

योग्याला देखील ते अवगत कसे होईल? ते अवगत झाले की; अवगत होणेच नाहीसे होते! संत ज्ञानेश्वरांना ज्ञानमूर्ती म्हणतात. गुह्य प्रकट करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. म्हणूनच ते योगीराज चांगदेवांना, 'काही न होनि (देखील) आहे' असा तो, निर्माण झालेले व निर्माता यांच्या पलिकडे सर्वव्यापक आहे, हे श्री माऊली ज्ञानेश्वर आपले म्हणणे दृष्टांत प्रमाणांसह श्री चांगदेवांना पटवून देतात–

**सोनें सोनेपणा उणे । न येतांचि झालें लेणें ।**
**तेवीं न वेंचिता जग होणे । अंगे जया ।।४।।**

सोनेपणा न येतांचि उणे, सोने झालें लेणे, तेवी (स्वतःस) न वेंचितां जग होणे (हे) जया अंगे (आहे) असे ते सोनेपण. तसे सच्चिदानंदस्वरूपाला; धक्काही न लागता, जग होणे घडते अर्थात कोणताही विकार न घडता सोनेपण कायम राखत सोने धातू म्हणून असतोच. तसेच त्या धातूचे (सोन्याचे) दागिनेही होतात. 'सोनेपण' अविचल असते. हा सोनेपणाचा स्वभावच आहे (जया अंगे) अर्थात तेच त्या तत्त्वाचे असलेपण आहे. ही 'सोनेपण' अवस्था ही 'निरंजन' अवस्था होय. संत ज्ञानेश्वर माऊलींनी एका अभंगात याचे आणखी वर्णन केले आहे. –

**चहूं शून्याआरूतें महाशून्यपरुतें । सर्वांसी पहातें तेंची तें गा ।।१।।**
**दिसे तेंही शून्य पहा तेंही शून्य । देहामाजी निरंतर भिन्न रूप ।।२।।**
**शून्य निरशून्य दोन्ही हारपलीं । तेथूनी पाहिली निज वस्तू ।।३।।**
**ध्येय ध्यान ध्याता निरसुनी तिन्ही । झालों निरंजनीं अति लीन ।।४।।**
**ज्ञानदेव म्हणे अनुभवी तो जाणें । गुरुमुखें खुण सांगितली ।।५।।**

(ज्ञा.गा. ८०१)

हे निजरूप अर्थात आत्मवस्तू, सच्चिदानंदस्वरूप स्वयंप्रकाशाने नित्य प्रकट होऊन विश्वभर नांदतेच आहे. 'अमृतानुभवा'त अज्ञान खंडन करतांना, माऊली ज्ञानेश्वर दृष्टांत देतात–

**अंधारू कां उजिवडु । हा एकला एकवडु ।**
**जैसा कां मार्तंडु । भलतेथे ।।** अ.अ.खं.अ.सात ओ. २५९।।



कुठे अंधार तर कुठे उजेड असतो. सूर्यमात्र (मार्तंड) आहे तेथे एकटा स्थिर आहे. तसा परमेश्वर स्थिर असतो. त्याला अज्ञान आणि ज्ञान काहीच नाही. त्याचे सूर्यपण कायम आहे. माऊली ज्ञानेश्वर सोन्याचे प्रमाण देऊन, श्री चांगदेवांना मायावाद समजावून सांगत आहेत. माऊली ज्ञानदेव 'कांहीं नहोनि आहे । अवघाचि जो ।।' हे श्री चांगदेवांना आणखी दृष्टांत देऊन पटवून देत आहेत. ते लिहितात –

**कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडें उदक ।**
**ते वीं जगेसी सम्यक । स्वरूप जो ।।५।।**

ते स्वरूप (परमात्मा) जगाकडे सम्यकपणे पाहतो, निर्विकार अशा समत्वाने पाहतो. जसे कल्लोळ(रूपी) कंचुक (वस्त्र/चोळी) न फेडिता (देखील) पाणी उघडपणे पाणीच असते. कल्लोळ उपाधीचा त्यावर काहीच परिणाम होत नाही. तसे ते स्वरूप, अर्थात परमात्मा सच्चिदानंद रूप निर्विकार, नित्य स्थिर असा आहे. श्री माऊली आणखी दृष्टांत देतात –

**परमाणूचिया मांदिया । पृथ्वीपणें न वचेचि वायां ।**
**ते वीं विश्वस्फूर्ति इयां । झांकवेना जो ।।६।।**

परमाणूंच्या मांदियां (परमाणूंचे असंख्य समुदाय) मुळे चराचराच्या अनेक रूपांच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नाही. पृथ्वी वाया (तिचे पृथ्वीपण) न वचेचि (सोडत नाही) पृथ्वी निर्विकार असते. स्थिर असते. तिचे पृथ्वीपण अबाधित असते. त्याप्रमाणे विश्वस्फूर्ति होणे हा ज्याचा स्वभावच (परमेश्वराचा) आहे. त्या विश्वस्फुरणामुळे त्याचे परमेश्वरत्व झाकत नाही. त्या स्वाभाविक स्फुरणामुळे त्याच्या निर्विकार, निर्लेपपणाला बाधा पोचत नाही. श्री माऊली म्हणतात, विश्व ही परमेश्वराची (स्वभावतः) स्फूर्ती आहे. चराचर विश्वोत्पत्तीमुळे त्याचे अस्तित्व अजिबात विचलित होत नाही. एका अभंगाच्या रूपाने माऊली ज्ञानेश्वर, पुन्हा परमतत्त्वाची ही नित्यता निरुपाधिकता आणि मायास्फुरणाची त्याची स्वाभाविकता अभंगाद्वारे स्पष्ट करतात –

**अव्यक्ताचे घरीं व्यक्त पै नांदे । मायेचेनि छंदे जग दावी ।।१।।**
**गगनीं अभ्रपडळ वायो संगे येत । तैसें तें निभ्रांत मेघवृष्टी ।।२।।**

**अद्वैत संचलें द्वैताचा आचार । मायेचा घराचार वोडंबरी ।।३।।**
**निवृत्तिदेवीं धरिली माया हे असार । प्रपंच परिवार निर्दाळिला ।।४।।**
(ज्ञा.गा. अ.क्र. ३४५)

विविध दृष्टांतांच्या सहाय्याने माऊली पुन्हा पुन्हा एकच गोष्ट श्री चांगदेवांना स्पष्ट करून सांगतात. हे भासमान दृश्य सत्य वाटले; तरी यामुळे निखळ सच्चिदानंदस्वरूप झाकले जाऊ शकत नाही. लाटा पाण्याला झाकू शकत नाहीत किंवा परमाणू मूळ पृथ्वीला झाकू शकत नाहीत. म्हणूनच श्री ज्ञानदेव श्री चांगदेवांना पुन्हा पुन्हा सांगतात; तो परमात्मा ''कांही नहोनि आहे । अवघाचि जो ।।'' असा आहे.

**कळांचेनि पांघुरणें । चंद्रमा हरपों नेणे ।**
**कां वन्ही दीपपणें । आन नोहे ।।७।।**

निजतत्त्वाच्या नित्यतेविषयी श्री माऊली चंद्र आणि अग्नीच्या नित्यतेचा दृष्टांत देतात. शुक्ल प्रतिपदेपासून कलेकलेने प्रगट होत जात, पौर्णिमेला चंद्रमा पूर्णस्वरूप प्रगटतो; तर वद्य पक्षात, प्रतिपदेपासून कलेकलेने चंद्र हरपतो आहे, असे दिसते. ते अमावस्येला चंद्र पूर्णतः हरपला आहे, नाहीसा झाला आहे असे वाटते. एकप्रकारे कलांच्या पांघुरणाने चंद्राची वृद्धी किंवा क्षय होत जाणारी रूपे दिसतात हे खरे; पण तो तर केवळ आभास असतो. चंद्र आहे तेथेच आकाशात स्थिर आहे. कालप्रवाहामुळे आणि गतीच्या योगाने ही आभासात्मक रूपे दिसतात. या कलांमुळे आपल्याला आभासरूपे दिसतात. चंद्रावर त्याचा यत्किंचितही परिणाम झालेला नसतो. दीपक लावला की अग्नीचे वेगळे रूप जाणवते. प्रत्येक दिव्यातील अग्नी तोच असतो. आन नोहे, अन्य अग्नी नसतो. दिवा, सूर्य, तारे, नक्षत्रे, चुली, वीज, इंजिने इ. सर्व ठिकाणी वेगळा अग्नी आहे असे वाटते. एव्हढेच काय शरीरातील उष्णता हे अग्नीचे रूप आणि वणव्यातील अग्नीचे रूप, भिन्न असल्याचे भासते. पेटविले तरच अग्नी, रूप घेऊन प्रकाशतो असे वाटते. वास्तविक हा माणसाच्या अनुभव, व्यवहारांचा काल्पनिक खेळ असतो. अग्नी नित्य आहे. तो सुप्त असो की प्रज्वलित दिसो, तो आहेच. तसे सच्चिदानंदरूप आहेच. परमज्ञान आहेच. माणसाच्या अज्ञान आणि ज्ञानाच्या खेळाने ते आहे किंवा नाही असे वाटते. मात्र परमज्ञान किंवा परमात्मा नित्यच आहे. तुमच्या असण्या-नसण्याने किंवा



तुमच्या जाणीव-नेणिवेच्या योगाने तुम्हाला तो आहे-नाहीचा संभ्रम होतो. वस्तुतः त्या परमानंदावर तुमच्या या संभ्रमित किंवा काल्पनिक अवस्थेमुळे काहीही परिणाम होत नाही. 'कांही नहोनि अवघाचि जो (तो) आहे'. श्री ज्ञानेश्वर एका अभंगात प्रवचन करतात, -

**देव आहे जैसे तैसा नेणवे सहसा । भांबावला कैसा विश्वजनु ।।**
**तया रूप ना रेखा लय ना लक्षण । ते प्रतिमें आणून वासना रूपें ।।१।।**
**देखा सर्वगत निराळा अद्वैत । तया मूर्तिमंत ध्याय जनु ।।**
**तिहीं देवासि आरू जेथुनि विस्तारू । तो ध्वनि ओंकारू त्या आरू ।।**
**आतां तो नाद ना बिंदु काळा ना छंदु । अक्षय परमानंदु सदोदितु ।।२।।**
**अवतरे तैसाच नव्हे होय तें न संभवे । आहे तें आघवे लाघव या ।।**
**तो येकट एकला रचला ना वेचला । आदिअंती संचला अनंतपणें ।।**
**पृथ्वी आप तेज वायु आकाश । हीं सकळही हारपती प्रळयांतीं ।।**
**तो निरशून्य निरुपम निरंजन निर्वाण । ते दशा पाषाण केंवि पावती ।।३।।**
**पाहतां या डोळां परि न दिसे कांही केल्या । व्यापुनिया ठेला बाहिजु भीतरि ।।**
**तो पदपिंडाअतीतु भवभावरहितु । बापरखुमादेविवरू विठ्ठलु हृदयांतु रया ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञा.अ.गा.क्र. ४५ डॉ. गोसावी खंड १)

सर्वव्यापी नित्य अशा परमात्म्याची जीवाला जाणवणारी लीला माया आहे हे श्री ज्ञानेश्वर परोपरीने श्री चांगदेवांना पटवून देत, चांगदेवांना अद्वैत अशा परमात्मतत्त्वाचा परमप्रकाश प्रकाशित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते पुढे म्हणतात -

**म्हणोनि अविद्या निमित्तें । दृश्य द्रष्ट्रत्व वर्ते ।**
**ते मी नेणें, आईते । ऐसेंचि असे ।।८।।**

''अविद्येच्या निमित्ताने (अज्ञानामुळे) दृश्य, द्रष्ट्रत्व असा भेद द्रष्ट्याला व्यवहारात दिसतो. ते मी नेणे (ज्ञानदेव ते जाणत नाहीत) अर्थात आत्मतत्त्व जाणत नाही. कारण ते (परमात्मतत्त्व) ऐसेचि आइतें, आहे (ते तर स्वतःच, स्वभावतः ऐसेचि, सिद्ध आहे - आईते आहे) सच्चिदानंद स्वरूप नित्य सिद्ध (आयतेच- आपसूकच - स्वभावतः, मुळातच सिद्ध) आहे म्हणूनच मला अविद्येच्या निमित्ताने घडणारा दृश्य, द्रष्ट्रत्व, द्रष्टा असा व्यवहार मला ठावूकच

नाही हे चांगदेवा आपणही लक्षात घ्या. (आपणही, अर्थात आपणही आत्मतत्त्वस्वरूपच आहात म्हणून हे जाणून घेतले जाईल) हे चांगदेवा सुरुवातीला मी म्हटल्या 'लपे तंव तंव आभासे । प्रगटे तंव तंव (आभास) न दिसे' असे ते परमतत्त्व नित्य आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर–

**(परमतत्त्व) तूं जयां प्रति लपसी । तयां (त्या जीवाला) जग हे दाविसी ।**
**(परमतत्त्वा–देवा तू) प्रकटु तैं करिसी । आघवेंचि (सर्वात्मक) तूं ।।**
(ज्ञा.१४.४)

श्री माऊली ज्ञानेश्वर पुन्हा परमतत्त्वाच्या नित्य सिद्ध स्वरूपाच्या दर्शनासाठी दृष्टांत देतात –

**जेंवीं नाममात्र लुगडे । येऱ्हवी सुतचितें उघडें ।**
**कां माती मृदभांडे । जयापरी ।।९।।**

ज्याप्रमाणे लुगडे (धोतर, पंचा इ.) हे रूप केवळ नाममात्र आहे. त्यात सूत नित्य आहे. किंवा मृद्‌भांडे (माठ, मडके, तवली, रांजण इ.) हे नाममात्र रूप होय. त्यात माती नित्य असते. म्हणजेच सूत किंवा माती हे आयतेच सिद्ध असे नित्य आहे. प्रत्येक नाममात्र रूपात, ते नित्य असतेच. रूप नष्ट झाले; तरी ते नित्य तत्त्व प्रकटतेच. दृष्टांत देऊन माऊली योगीराज चांगदेवांना जाणून घेण्यास सांगतात की;

**तेंवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत दृङ्‌मात्र जे असे ।**
**तें चि द्रष्टा दृश्य मिसें । केवळ होय ।।१०।।**

अतीत (पलिकडील नित्य तत्त्व, सच्चिदानंदरूप) हे, दृश्य (रूप) आणि द्रष्टा (पाहणारा) ही दशा दृङ्‌मात्र (दृष्टीभ्रम म्हणून) (पाहण्यापुरती, वरवर दिसायला) स्वरूपात असते. द्रष्टा आणि दृश्य या निमित्ताने तेच नित्यतत्त्व, जे केवल आहे, (नित्य सिद्ध, एकल आहे) ते रूपाने नटून प्रकटते. अन्यथा ते केवलच आहे. नित्य सिद्धच आहे. ज्याप्रमाणे –

**या उपाधिमाजीं (चराचर रूपे) गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।**
**तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।** ज्ञा.अ.२.१२६।।



तसे, हे चांगदेवा, आपण तत्त्वज्ञ, संत, योगी आहात, हे आपण जाणावे.

माऊली ज्ञानेश्वर आणखी दृष्टांत देऊन; नित्य आणि अनित्य किंवा भ्रामक यांची श्री योगीराज चांगदेवांशी पत्राद्वारे चर्चा करतात –

**अलंकार येणें नामें । असिजे निखिल हेमें ।।**
**नाना अवयव संभ्रमे । अवयविया जेंवी ।।११।।**

''अवयविया अर्थात जीव जेंवी (ज्याप्रमाणे) संभ्रमितपणे नाना अवयव आहेत, यांतच गुंतवितो; जसे हे डोळे, हे कान, हे हात, हे नाक इ. मात्र या सर्व अवयवांत एकच जीव (जीवात्मा) नांदत असतो. या सर्व शरीराच्या पलिकडे, तो जीव (आत्मतत्त्व) हेच खरे नित्य असते. किंवा विविध अलंकार विविध नावांनी ओळखले गेले; जसे बांगड्या, चंद्रहार, तोडे इ. तरी त्या सर्व अलंकारांत हेम (सोने) निखळपणे असतेच. हे सर्व अलंकार स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे वितळवून एकत्र आणले; तरी निखळ सोनेच असल्याचे लक्षात येते. त्याप्रमाणे सृष्टीत चरअचर अशा असंख्य रूपाने, तो परमात्माच नटलेला असतो. या सर्व रुपांचा विलय त्याच्याच ठिकाणी होतो. कारण तो परमात्मा नित्य आहे. त्याप्रमाणे हे चांगदेवा –

**तेवीं शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।**
**प्रकाश, ते एकसरी । संवित्ति हे ।।१२।।**

त्याप्रमाणे 'शिव'तत्त्वापासून अर्थात शिवोनि पृथ्वीवर अनेक प्रकारचे पदार्थ अर्थात चतुरखाणी– अंडज, स्वेदज, उद्‌भिज, जारज असे जीव; फळे, फुले, डोंगर, दऱ्या, सरिता, सूर्य, चंद्र, आकाश इ.इ. भासमान होतात. अर्थात 'शिव', अर्थात संवित्ती म्हणजेच सच्चिदानंदस्वरूप, परमात्माच या सर्व पदार्थांच्या रूपाने नटलेला असतो. ते सर्व एकसरीपणे संवित्तिच असतात. त्यांचा विलय झाला की संवित्ति प्रकाशमान होते. कारण परमात्म्याच्या पूर्णज्ञानस्वरूप प्रकटण्यातच, रूप विलय पावतात. त्या नित्यतत्त्वाने अर्थात संवित्तिनेच त्या सर्व पदार्थांचा ग्रास स्वतःचे ठिकाणी घेतलेला असतो. जसे मी सुरुवातीला म्हणालो की, 'जो वटेशु लपोनि जगदाभासु दावी आणि प्रगटला की (या जगदाभासाचा) ग्रासु करी.' जसे–

**स्वप्नाचें दिसणे न दिसणें । जैसे आपलेनि असलेपणें ।**
**विश्वींचे आहे नाही जेणें । प्रकाशे तैसें ।।** ज्ञा.अ. १८.१११६ ।।
**उदया येतां गभस्ती । नाना नक्षत्रव्यक्ती ।**
**हारवीजती दीप्ती । आंगिका जेवीं ।।** ज्ञा.अ. १८.१०९७ ।।
**तेवी उठतिया आत्मप्रथा । हे भूतभेदव्यवस्था ।**
**मोडीत मोडीत पार्था । वास पाहे तो ।।** ज्ञा.अ. १८.१०९८ ।।
**पाटिवरील अक्षरें । जैसी पुसतां येती करें ।**
**तैसीं हारपती भेदांतरें । तयाचिया दिठी ।।** ज्ञा.अ. १८.१०९९ ।।

म्हणजे चांगदेवा, आत्मप्रकाश प्रकट झाला की सर्व सृष्टी त्यातच विलय पावते आणि तोच नित्य आहे, हे लक्षात घेऊन; संभ्रम आणि कार्यकारणे नाहीशी होतात. चांगदेवा, जे नित्य आहे ते जीवाच्या ज्ञानअज्ञानापलिकडे, निखळपणाने आहे. तेच परमज्ञान किंवा आत्मज्ञान होय. त्या आत्मज्ञानाला, मग ज्ञानाचे सहाय्यही, अनावश्यकच ठरते. नाहीतर ज्ञान अज्ञानाच्या संभ्रमात आपण राहू आणि होईल असे की,

**जे आत्मज्ञान निखळ । तेंहि घे ज्ञानाचें बळ ।**
**तैं सूर्य चिंती सबळ । तैसे नोव्हे? ।।**
(अमृ.अ. तिसरा वाचा ऋण परिहार ओ.क्र. १९)

सूर्याला उदयासाठी दुसऱ्याचे बळ घ्यावे लागत नाही तो स्वतःच सबळ असतो; तसे आत्मज्ञानाला, अज्ञान नाहीसे झाल्यावर (व्यावहारिक) प्रगटलेल्या ज्ञानाचे सहाय्य आवश्यक नाही. आत्मज्ञान हे स्वयंप्रकाशी आहे. ते आत्मज्ञान आपणास प्राप्त झाल्यावर; मग मी, तू पणा कसा राहील?

**नाहीं ते चित्र दाविती । परि असें केवळ भिंती ।**
**प्रकाशे ते संवित्ति । जगदाकारे ।।१३।।**

''असे पाहा भिंतींवर नाहीं ते (विविध प्रकारचे) चित्र दाखवितात; परंतु ते रंगाने काढलेले चित्र; काही काळाने पुसून जाते. अशी अनेक चित्रे काढली जातात, नि पुसलीही जातात. मात्र भिंती आहे तेथे स्थिर नित्य असते. अगदी तसे संवित्ति (परमेश्वर - निज - परमात्मा) जगदाकारे (जगाच्या आकारात, जड, चेतन, चराचर, वस्तुमात्र, प्राणिमात्र अशा विविध स्वरूपात) प्रकाशते.



मात्र हे सर्व जगदाकार नश्वर असतात, ते प्रकटतात आणि नष्ट होतात किंवा विलय पावतात. संवित्ति मात्र नित्य असते. या नित्यतेचे ज्ञान प्रकाशले की जगाविषयीची भ्रांती, आसक्ती, आभास राहातच नाहीत. जगाच्या आकाराने ते केवलज्ञान, सच्चिदानंदरूपच आपल्याला अनुभवास येत असते. म्हणूनच त्या जगदाकारातील सच्चिदानंदरूप स्वीकारावे; म्हणजे जगदाकारांकडे तटस्थपणाने पाहाता येते.'' श्री माऊली ज्ञानेश्वर पत्रात आत्मसाक्षात्कार वर्णन करीत आहेत. ते म्हणतात -

**बांधयाचिया मोडी । बांधा नहोनि गुळाची गोडी ।**
**तयापरि जग परवडी । संवित्ति जाण ।।१४।।**

हे चांगदेवा, अहो, बांधया (साचा) जसा असेल; तसे म्हणजे त्याच्या मोडीप्रमाणे (आकाराप्रमाणे) गुळाची ढेप तयार होते. गुळाला बांधा (आकार) प्राप्त होतो. पण तो 'बांधा न होनि गुळाची गोडी' म्हणजे बांध्यात गुळाची गोडी नसते. ज्या गोडीमुळे गुळाला गुळपण येते; ती गोडी त्या आकारात नसते. त्याचप्रमाणे ही जगपरवडी (जगातील आकार आणि व्यवहार, मांडामांड, उत्पत्ति, स्थिती आणि लय अशी परवड) म्हणजे चैतन्य किंवा संवित्ति नव्हे; तर ते चैतन्य असते म्हणून जगपरवडी घडू शकते. ही जगपरवडी, केवळ त्या गुळाच्या ढेपेसारखी तात्कालिक असते. त्यातील संवित्ति नित्य असते. जगाचा हा पसारा त्या संवित्तितून आकाराला येतो आणि संवित्तिमुळेच असल्याचे ज्ञात होते, आणि संवित्तितच तो विलय पावतो. संवित्ति (ते आत्मरूप, चैतन्य, सत्चिद्आनंदरूप) नित्य असते. तेच जगपसाऱ्याचे मूळ कारण, कार्य आणि असलेपणही असते तरी ती अविचल व नित्य असते. हे लक्षात घेतले की ते (नित्यकारण) आहे म्हणून; मी, तू हा भेद, हे भिन्न आकार आणि भिन्न व्यवहार आहेत. हे भेद केवळ वरवरचे आहेत. हे सर्व भेद त्याच्यातच विलय पावतात. ते भेदच आपण खरे मानतो परंतु 'संवित्ति'चे ज्ञान झाले; की सर्व भेदाभेद आणि आभासच नाहीसे होतात आणि केवलता अर्थात 'संवित्ति' तेव्हढी अद्वैतपणे राहाते. आकारातल्या भेदांचा किंवा द्वैताचा आणि संवित्ति स्वरूपाचा परस्पर संबंधच नाही. हे आपण समजून घ्यावे. म्हणजे मी आणि आपण हेही भेद गळून पडतील. हा भ्रामक अहंकारच गळून पडेल. आपण आनंदस्वरूप होऊ. सच्चिदानंद अशी ही 'संवित्ति' तर कधी आकारात (बांध्यात)

बंदिस्त होतच नाही.

असे पाहा– आणखी काय सांगावे –

**घडियेचेनि आकारें । प्रकाशिजे जेवीं अंबरें ।**
**तेवीं विश्व स्फुर्ति स्फुरें । स्फुर्तिचि हे ।।१५।।**

ज्याप्रमाणे अंबरे (वस्त्र) घड्या घालून ठेवल्याने; ही वस्त्रे आहेत असे आपण म्हणतो खरे परंतु घडी नेसत नाही, ती घडी फेडून मगच वस्त्र अनुभवतो. अगदी तसेच स्फूर्तीच्या स्फुरणाने (संवित्तिच्या स्फुरणाने) विश्वस्फूर्त होते, (जग आकारात येते). घडीच्या आकारात जसे वस्त्रच आहे, असा अनुभव येतो; तसे जगदाकारात ती स्फूर्तीच (संवित्तिच) अर्थात ते परमात्मतत्त्वाचाच आपण अनुभव घेतो. म्हणजे जगदाकारातही ती स्फूर्तीच स्फुरत असते. जीवाचे वावरणे हे चैतन्य स्फुरणच प्रकट करते. ते चैतन्यच नसेल; तर जीव लयास गेला, असे आपण म्हणतो. चैतन्य (आत्मतत्त्व) लयास गेले असे आपण म्हणतो. परंतु चैतन्य गेलेले नसते ते केवळ शरीरातून नाहीसे होते. घडी नश्वर आहे, वस्त्र नित्य आहे तसे विश्वाकार नश्वर आहेत मात्र स्फूर्ति अर्थात संवित्ति नित्य आहे. जसे–

**मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।**
**अद्वयाब्जिनी विकाशु । वंदु आता ।।** ज्ञा.अ. १६ ओ.१ ।।

म्हणून सारे काही त्या संवित्तिचा (सच्चिदानंदस्वरूपाचा, कैवल्याचा) अर्थात अद्वयाचा विकास (विलास) आहे. म्हणून त्या परमतत्त्वाला वंदन करावे अर्थात त्याचा अनुभव करावा. हे चांगदेवा –

**आणि मुक्त, मुमुक्षु बद्ध । हें तंववरी योग्यता भेद ।**
**अनुभवामृतस्वाद । विरुद्ध जव ।।** अमृ.अ. १० ग्रंथपरिहार ओ. २५ ।।

जोपर्यंत आपण अनुभवामृतस्वाद चाखला नाही अर्थात त्या संवित्तिचा किंवा परमेश्वराचा अर्थात सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव आपण घेत नाही तोपर्यंत त्याच्या विरुद्ध, भावाभास असलेले मुक्त, मुमुक्ष, बद्ध असे भेद आपल्या मनात उमटत राहातात. आपल्या कोऱ्या कागदात, हे सारे भेद नाहीसे झाल्याचेच मला अनुभवास आले आहे. आपल्याला हा अनुभवामृतस्वाद



आमच्यापर्यंत पोहोचवायचा होता म्हणूनच हा कोऱ्या पत्राचा प्रपंच असे मला वाटते आहे. हे चांगदेवा त्या परमज्ञानाच्या प्रकाशात मी आणि आपण हा भेदच विरून गेला आहे.''

श्री ज्ञानदेव श्री योगीराजांना स्पष्टपणे सुचवितात –

**न लिंपता सुखदुःख । येणें आकारे क्षोभोनि नावेक ।**
**होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ।।१६।।**

येणे आकारे नावेक क्षोभोनि किंवा सुखदुःख न लिंपता, जो (तो परमात्मा/अंतरात्मा, परमज्ञानी) आपणचि आपणिया सन्मुख होतो म्हणजेच विश्वात विविध आकारातून तोच परमात्मा प्रकट असतो, याचे ज्ञान होते. तेव्हा या प्रकटलेल्या आकारांना अर्थात जीवांना सुखदुःखांची शृंखला असते परंतु परमात्मा (परमज्ञानी) परमेश्वर त्या सुखदुःखाच्या शृंखलांनी किंवा ढगांनी लपेटला जात नाही किंवा लिंपला जात नाही अर्थात झाकोळत नाही. किंबहुना ती सुखदुःखे त्याला किंचितही विचलित करीत नाहीत याचा अनुभव होतो. कदाचित या आकारांनी नावेक (किंचितकाळ) क्षोभला (संतापला) तरी क्षणकालच, तो पुन्हा स्वतःच स्वतःला सन्मुख होऊन, स्वतः स्वस्वरूपाची जाणीव होऊन; सुखदुःखाने भरलेल्या विश्वातही सच्चिदानंदस्वरूप होऊन नांदतो. ही अवस्था सिद्धाची असते. तो परमात्मा, स्वतः सिद्ध, स्वयंभू, निर्गुण, निराकार, निर्विकार असा आहे, तोच आकाराच्या ठिकाणी, अर्थात तुमच्या, माझ्या रूपात, अंतरात्मा असतो. तो अंतरात्मा प्रकटला (पूर्ण परमज्ञान झाले की) सुखदुःखांचा परिणाम त्याच्यावर होत नाही. तो स्वतःच स्वतःला कैवल्यरूपात अनुभवतो.

असे पाहा –

**तया नांव दृश्याचें होणे । संवित्ति दृष्ट्रत्वा आणिजे तेणें ।**
**बिंबा बिंबत्व जालेंपणें । प्रतिबिंबाचेंनि ।।१७।।**

संवित्ति दृष्ट्रत्वा (अनुभवास) आणिजे तेणे; अशा त्याला 'दृश्याचे होणे' असे नाव आहे. जणू प्रतिबिंबामुळे बिंबाला बिंबत्वाची जाणीव होते. बिंब, प्रतिबिंब आणि बिंबत्व यांचा हा खेळ किती गमतीशीर आहे पाहा. बिंबत्व (परमात्मा, चैतन्यतत्त्व) बिंबरूपाने नटते (रूपे घेते) असे बिंबरूप

निर्माण झाल्याने, आरशात पाहिले की प्रतिबिंब उमटते. ते प्रतिबिंब, अस्तित्वात असल्याची जाणीव करून देते ती दोन प्रकारे. एक म्हणजे बिंब आहे म्हणून प्रतिबिंब आहे. आणि दुसरी म्हणजे हे जे बिंब आहे, त्यात बिंबत्व आहे म्हणून बिंब आहे. म्हणजे या खेळात बिंबत्वाची नित्यता हे परमज्ञान होते; ते प्रतिबिंब या अज्ञानामुळे बिंबाचे ज्ञान झाल्यामुळे म्हणजे बिंबत्व नित्य. बिंब अनित्य आणि प्रतिबिंब तर पूर्णतःच भ्रामक. म्हणून दृश्य (बिंब) त्यालाच म्हणता येईल; जे संवित्ति अर्थात नित्य असे परमतत्त्व किंवा परमेश्वरत्व दृष्ट्रत्वास आणील. दृश्यात दृष्ट्रत्व परमात्म्याच्या अस्तित्वाने येते, म्हणूनच ते दृश्य, संवित्ति अर्थात सच्चिदानंदस्वरूप प्रकट करू शकते. ज्ञानी, योगी हा त्याच्या आकारातील लपलेली संवित्ति. अर्थात दृष्ट्रत्व आकारातून दृश्य करतो. योगी परमज्ञानी झाला; की त्याचे रूप स्वरूप म्हणून अनुभवास येऊ लागते. अशा अवस्थेला सुखदुःखाने लपेटले जाऊ शकत नाही. तो योगी ठायीच निर्गुण, निराकार, निर्विकार अशा सच्चिदानंद स्वरूपावस्थेला पोचलेला असतो. म्हणूनच तो मौन होतो, त्याचा व्यवहार कोरेपणाने घडतो. तो एकल एकटा समत्वस्वरूप होतो. हे योगीराज चांगदेवा, हे निर्लेपत्व योग्याला प्राप्त होते; हे आपण समजावून घ्या. श्री गुरु निवृत्तिनाथांनी हेच सांगितले आहे पाहा –

**तिमिर पडले प्रपंच भासे । झाकोळला दिसे आत्मनाथ ।।१।।**
**हरिविण दुजे चिंतिता निभ्रांत । अवघेंचि दिसे माया भ्रम ।।२।।**
**सांडूनि तिमिर सर्व नारायण । हें चि पारायण नित्य करी ।।३।।**
**निवृत्ति सज्जन अवघा आत्माराज । एक तत्त्व बीज जपा लाहो ।।४।।**

(स.सं.गा. श्री निवृत्तिनाथ गाथा, डॉ. गोसावी – अ.क्र. ३०९)

म्हणूनच योगीराज, मला वाटते –

**विज्ञानाचें ज्ञान अज्ञानीं घनवट । ज्ञाने अज्ञान नीट लाविले दिसें ।।१।।**
**मी तूं हे मात हरपले दृष्टांत । ह्रदयी ह्रदयस्थ निजते जें ।।ध्रु।।**
**साकार निराकार शून्याशून्य दिठा । रूपीं रूपवाटा हरि माझा ।।२।।**
**बापरखुमादेविवरू ह्रदयस्थ घटीं । बिंबोनि उफराटी कळा दिसे ।।३।।**

(स.सं.गा. श्री ज्ञा. गाथा डॉ. गोसावी अ.क्र. २१)



म्हणूनच हे योगीराजा, आपण 'होय आपणिया सन्मुख' असे व्हावे. म्हणजे बिंबातील संवित्ति दृश्य होईल. जसे –

**तेंवीं आपणचि आपुला पोटीं । आपणयां दृश्य दावित उठी ।**
**द्रष्टा, दृश्य दर्शन त्रिपुटी । मांडें तें हे ।।१८।।**

आपणच आपल्याच पोटी असलेले (आपल्या ठिकाणी असलेले) दृश्य दाखवित उठावे (सुटावे) म्हणजे आपणच दृश्य आपलेच दर्शन आणि पाहाणाराही आपणच अशी त्रिपुटी मांडली तर जे दिसेल, जसे

**सुताचिये गुंजे । आंत बाहेर नाहीं दुजें ।**
**तेवी तिनपणें विण जाणिजे । त्रिपुटीं हे ।।१९।।**

सुताच्या गुंड्यात आत बाहेर एकूण सूतच असते. त्याप्रमाणे ही तिन्ही गोष्टींची (द्रष्टा, दृश्य आणि दर्शन) एकत्रच वीण म्हणजे ही त्रिपुटी होय.

अहो, बिंब प्रतिबिंबाच्या खेळात आपण (द्रष्टा) आरशात जे प्रतिबिंब पडलेले असते ते दृश्य अर्थात, स्वतःच्याच भ्रामक प्रतिमेचे दर्शन घेऊ लागतो. हे दर्शन प्रतिबिंबाचे नसते किंवा बिंबाचेही नसते. ते दर्शन द्रष्टा म्हणून त्या बिंबातील द्रष्ट्रत्व असते. ते द्रष्ट्रत्व हे द्रष्टा, दृश्य आणि दर्शन ही त्रिपुटी अनुभूत करते. सुताच्या गुंडीत जसे अंतरबाह्य सूत असते, त्याचप्रकारे द्रष्ट्रत्व – चैतन्य – संवित्तिचा हा खेळ असतो. व्यवहारातील सर्व अनुभव खरे वाटतात, ते या द्रष्ट्रत्वामुळे. ते परमतत्त्वच सर्वांठायी असते. त्याचे ज्ञान योग्याला झाले की तो स्वतःतच अनुभवू लागतो. याचाच अर्थ द्रष्टा, दृश्य आणि दर्शन ह्या त्रिपुटीमध्ये परमात्म्यावाचून दुसरे काही नाही. म्हणूनच हे चांगदेवा –

**निर्गुणाचे रंगी रंगले हें मन । सांवळे सगुण ब्रह्म तें ची । मताभिमानी ऐसा विश्वास न धरिती । वचनीं निर्गुणी सगुण दोन्ही भिन्न असती ।।२।। असिपदी जैसें तत्पद तें नाही । सांवळें ब्रह्म पाही तैसें असे ।।३।। निवृत्तिदास म्हणे चांगया ब्रह्म तेंचि खरें । सांवळे निधरि जाण रया ।।४।।**

(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ७९१, डॉ. गोसावी)

हे चांगदेवा स्वस्वरूपाशी एकरूप झाले की योग्याची स्थिती संवित्तिरूप

होते.

**मी माझें मोहित राहिले निवांत । एकरूप तत्त्व देखिलेंगे माय ।।१।।**
**द्वैताच्या गोष्टी हरपल्या शेवटीं । विश्वरूपें मिठि देतु हरी ।।२।।**
**छाया माया काया हरिरूपीं ठाया । चिंतीता विलया एक तेजीं ।।३।।**
**ज्ञानदेवा पाहा ओहंसोहं भावा । हरिरूपीं दुहा सर्वकाळ ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ६०९, डॉ. गोसावी)

अशी स्थिती झाली की –

**नुसधें मुख जैसें । देखिजतसें दर्पण मिसे ।**
**वायांचि देखणें ऐसें । गमों लागें ।।२०।।**

दर्पण मिसे (सहज हातात आरसा आला म्हणून) जैसे नुसधे मुख देखिजदसें तेव्हां वायांचि देखणे ऐसे गमों लागे. सहज हातात आरसा आला. प्रतिबिंब दिसले. आपलेच मुख आहे हे लक्षात आले. कशासाठी पाह्यचे. हे तर प्रतिबिंब आहे, म्हणजे वायाच आहे (खोटेच आहे) मग हे आपलेच प्रतिबिंब तरी आपण कोणत्या जाणिवेमुळे म्हणालो; असा विचार करू लागलो की आपल्यात पाहण्याची शक्ती आहे म्हणून त्या शक्तीनेच आपण आणि आपले प्रतिबिंबही साकारले. आरसा नाही तर प्रतिबिंबही नाही, आपणही आपल्याला पाहू शकत नाही. म्हणजे प्रतिबिंबही नश्वर आणि आपणही नश्वर; पण हे तरी का घडले; परमेश्वर या आपल्या रूपाने नटला म्हणून, बिंब आणि प्रतिबिंब दिसले पण तो परमेश्वर तर निर्गुण निराकार आहे. त्याच्याच नटण्याचा त्याच्यावर परिणाम होत नाही, म्हणजेच या विश्वरूपाने परमात्मा नटला असला; तरी विश्व म्हणजे परमात्मा नव्हे. तर विश्वाकार ही परमेश्वराची क्रीडा किंवा माया आहे. हे जे आपल्याला जाणवले ते परमज्ञान झाले की बिंबप्रतिबिंब आभास ठायीच हरपतो आणि परमज्ञान प्रकाशाने अद्वैत स्थिती प्राप्त होते. हे चांगदेवा सद्गुरू निवृत्तिनाथ कृपेने, माझ्या मनातील उठलेले ज्ञान तरंग येथे दृश्य होत आहेत –

**त्रिगुणत्रिपुरी वेढिला । जीवत्वदुर्गी आडिला ।**
**तो आत्मा शंभूनें सोडविला । तुझिया स्मृती ।।** ज्ञाने.अ.१७–२।।



याकरिता आपण हे समजून घ्यावे.''

**तैसें नवचतां भेदा । संवित्ति गमे त्रिधा ।**
**हे चि जाणे प्रसिद्धा । उपत्ति इया ।।२१।।**

संवित्ति गमे त्रिधा, तैसे नवचता (तसे न पाहता) भेदा, (संवित्ति ही एकल, एकटे, अद्वैत आहे) हेचि प्रसिधा जाणे. इया उपत्ति (हाच सिद्धांत होय) परमात्मा दृश्य, दर्शन, द्रष्टा किंवा दृश्य, द्रष्टृत्व, द्रष्टा असा बिंबप्रतिबिंब न्यायाने त्रिविध आहे असे भासले; तरी त्या भेदांना न लक्षात घेता (न वचता – न पाहाता) परमात्मा निर्गुण, निराकार, निर्विकार, अद्वैत असा आहे, हा सिद्धांत, हे चांगदेवा, आपण समजून घ्या. द्रष्टा, दृश्य आणि दर्शन ही त्रिपुटी सांडली; की परमात्मा प्रकाशमान होतो. त्रिपुटी स्वरूपातील आभास नाहीसा होतो. हे पाहा –

**जे अहंभावाचें वोझें सांडुनी । विकल्पाच्या झुळुकां चुकाळुनी ।**
**अनुरागाचा निरू ताउनी । पाणिढाळु ।।** ज्ञा.अ. ७ ओ. ९९।।
**जया ऐक्याचिया उतारा । बोधाचा जोडला तारा ।**
**मग निवृत्तिचिया पैल तीरा । झेंपावले जे ।।**ओ. १००।।

अशा प्रकारे त्रिपुटी सांडून अद्वैत अशी संवित्ति अर्थात परमप्रकाश, परमेश्वर, कैवल्य यांचा अनुभव घ्यावा.

अहो–

**दृश्याचा जो उभारा । तेंचि द्रष्ट्रत्व होय संसारा ।**
**या दोहीं माजिल अंतरा । दृष्टी पंगु होय ।।२२।।**

संसाराच्या ठिकाणी अर्थात या जगाच्या पसाऱ्यात, दृश्याचा जो उभारा दिसतो (जे आकर्षण, अनुभव, आसक्ती, मोहकता – असा उभारा) तोच द्रष्ट्रत्व आहे (सत्य आहे, तत्त्व आहे असा आभास निर्माण होतो) परंतु दृश्याचा उभारा आणि द्रष्ट्रत्व यातील अंतर पाहण्यास द्रष्ट्र्याची दृष्टीच पंगु होते. कारण दृश्याच्या उभाऱ्यातच तो अडकतो तो उभाराच त्याला सत्य वाटू लागतो. त्यामुळे परमात्मा, त्याच्या नटण्याने निर्माण झालेले हे मायावी विश्व आणि प्रत्येक जीवातील आत्मा द्रष्ट्रत्व यांचा परस्पर संबंध काय आहे, हे

कळेनासे होते. वास्तविक जीवात्मा (द्रष्ट्रत्व) परमात्मा आणि दृश्य विश्व यात काहीच फरक नसतो म्हणजे परमात्माच जीवात्मा रूपाने नटल्याने दृश्यविश्व भासमान होते. या तिहीतील अंतिम सत्य परमात्मा आहे; हे कळल्याशिवाय दृश्यविश्व आणि त्यातील सुखदुःखादी व्यवहार, अनुभवातील मायामयता किंवा आभासात्मकता कळत नाही. योगी संवित्ति जाणून स्थिर होतो. म्हणूनच हे सारे कळण्यासाठी दृष्ट्रत्वाचा अंतरात्म्याचा बोध होणे आवश्यक आहे.

अहो–

**दृश्य जेधवां नाहीं । तेधवां दृष्टि घेऊनि असें काई ? ।**
**आणि दृश्येंविण कांही । दृष्ट्रत्व होणे ? ।।२३।।**

दृश्यच जेथे नाही तेथे दृष्टीचा काय उपयोग? दृश्य नसेल तर तेथे दृष्ट्रत्व तरी कसे असणार? म्हणजे दृष्ट्रत्वाशिवाय दृश्य नाही आणि ते पाहणारा म्हणजे दृष्टीही नाही म्हणून दृष्ट्रत्व हेच दृश्य आणि दृष्टी निर्माण करते. दृष्ट्रत्व हे तर त्या परमेश्वराचे नटणे आहे त्यामुळेच द्रष्टा, दृश्य आणि दर्शन ही त्रिपुटी निर्माण झाली नव्हे का? ही त्रिपुटी सांडल्यानेच परमेश्वराचे, अर्थात निजतत्त्वाचे ज्ञान होते. म्हणूनच हे चांगदेवा, ही त्रिपुटी ओळखून, दृष्ट्रत्वा पलिकडील निर्गुण, निराकार, निर्विकार आत्मज्ञान किंवा परमज्ञानप्रकाश अनुभवावा –

**त्रिपुटि उलटु निर्गुणि अरूता । पाहाता दृष्टांता भेदु नाहीं ।।१।।**
**भेदु अभेदु अवघाचि गोविंदु । बिंबे बिंब छंदु हरि लीला ।.२।।**
**नाहीं आला गेला शब्द पैं दृष्टांते । दृश्या दृश्य भूतें एकतत्वी ।।३।।**
**बापरखुमादेविवरू अर्ध उर्ध्व शेज । वेंगी तूं उमज अरे रया ।।४।।**

(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ५४४, संपा. डॉ. गोसावी)

योगीराज चांगदेवा –

**म्हणोनि दृश्याचे जालेपणे । दृष्टी द्रष्ट्रत्व होणें ।**
**पुढती ते गेलिया जाणें । तैसेंचि दोन्ही ।।२४।।**

म्हणूनच असे पाहा दृश्य निर्माण झाले असे आपण केंव्हा म्हणतो? जेंव्हा ते डोळ्यांनी (पंचज्ञानेंद्रियांनी) ते पाहाता येते. ते का पाहाता येते? कारण दृष्ट्रत्वामुळे दृश्य होऊन परमात्म्याचे नटणे घडते. परंतु पुढे तेच (दृश्य) गेल्यावर दृष्टी काय पाहाणार? दृष्ट्रत्वामुळे परमेश्वराचे नटलेले रूप (मायारूप) तरी कसे अनुभवणार? म्हणजेच दृश्य रूपात परमेश्वराचे आभासात्मक नटणे असते, तेंव्हाच दृष्टी, द्रष्टा आणि द्रष्ट्रत्व किंवा दर्शन घडते. अर्थात हे सारे काही, त्या सच्चिदानंदरूप, संवित्ति अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार असा परमात्मा असे ज्याला म्हणतो; त्या परमज्ञानावस्थेच्या प्रकर्षाने घडते. म्हणूनच त्रिपुटीने लपेटलेल्या अवस्थेतही हा परमज्ञान प्रकाश योग्याला होतो. हेच त्याचे देही विदेही होऊन आत्मस्वरूपी प्रकटणे होय –

**तैसे माझां (आत्मस्वरूप) साक्षात्कारीं । सरे अहंकाराची बारी ।**
**अहंकार लोपी अवधारीं । द्वैत जाय ।।** ज्ञा.अ. ११ ओ.क्र. ६९४।।

अंतरात्म्याचा परमज्ञानप्रकाश प्रकटला की अहंकाररूपी त्रिपुटी सरते, लोप पावते आणि केवळ सच्चिदानंदस्वरूप, अद्वैताचा परमज्ञानप्रकाशच तेव्हढा राहतो. म्हणजे असे पाहा –

**आत्मतेजें तेज रवि तेज बिंबे । जीवशिवी बिंबे ज्ञान तेजें ।।१।।**
**तैसें तुज ज्ञान जालें रे हें काज । केशवी विराज चित्त झाले ।।२।।**
**समाधिचें रूप रूपासि आलें काह्या । पसरूनी बाह्या देता क्षेम ।।३।।**
**प्रवृत्ति निवृत्ति दोहींची तटाक । उतरलासि एक सिंधोदक ।।४।।**
**क्षीर नीर हरि जाला असे स्वादु । अवघाचि गोविंद नाना देहीं ।।५।।**
**निवृत्तिसंपत्ति आलिया पै हाता । तत्वीं तत्त्व निमथा उलथा तू ।।६।।**

(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ७१०, संपा. डॉ. गोसावी)

म्हणून लक्षात घ्या–

**एवं एकचि झालीं ती होती । तिन्ही गेलिया एकचि व्यक्ति ।**
**तरी तिन्ही भ्रांती । एकपण साच ।।२५।।**

दृश्य, दृष्टी आणि द्रष्ट्रत्व हे सगळे एकाच व्यक्तीच्या ठिकाणी हारपते. म्हणजेच दृश्य, दृष्टी, द्रष्ट्रत्व ही तिन्ही भ्रांतीच होय. याकरिता एकपण हे सत्य होय. परमात्मा हाच एकल, एकटा, केवल, अनंत, परमज्ञानरूप, सच्चिदानंदस्वरूप, संवित्ति होय. म्हणजे तोच एकला अद्वैतपणाने सर्वत्र सृष्ट अशा रूपात नटलेला असला तरी; सर्व सृष्ट त्याच्याच ठिकाणी हारपतात.

नव्हे मुळात असे सृष्ट रूपात नटतेवेळीही त्याच्या एकपणात किंचितही विकार, विचलन घडलेले नसते. त्यातून स्वभावतः सृष्ट स्फुरते त्यामुळे तोच आपसुकच सृष्टात चैतन्यस्वरूप असतो. सर्व सृष्ट त्याच्यात हारपते तेव्हांही ते चैतन्यरूप आहे तेथेच म्हणजे त्याच्यातच स्वाभाविकपणे असते. तेच 'एकपण' परमसत्य, परमज्ञान असे सच्चिदानंद कैवल्य, परब्रह्म, परमात्मन् होय.

**अधिक देखणें तरी निरंजन पाहाणें । योगराज विनवणें मना आलें वो माये ।।१।। देहवळी देउनि साधिलें म्यां साधनीं । यानें समाधान मज जोडलें वो माये ।।२।। अनंगपण फिटलें मायाछंदा सांठवलें । सकळ देखिलें आत्मस्वरूप वो माये ।।३।। चंदन जे जेविं भरला अश्वत्थ फुलला । तैसा म्यां देखिला निराकार वो माय ।।४।। पुरे पुरे आतां प्रपंचा पाहाणें । निजानंदी राहणें स्वरूपीं वो माये ।।५।। ऐसा सागरू । रखुमादेविवरूविठ्ठलु निर्धारू म्यां देखिला वो माये ।।६।।**

अहो ही स्थितीच अलौकिक आहे -

**तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।**
**हें सरले अद्वैता । अफुटामाजीं ।।**

(अमृ. अ.९ जीवन्मुक्त दशाकथन ओ.क्र. ७)

अहो मला सांगा -

**दर्पणाच्या आधि शेखी । मुख असतेचि असे मुखी ।**
**माजीं दर्पण अवलोकी । आन कांही होय ।।२६।।**

दर्पण हातात घेण्याआधी आणि दर्पण बाजूला शेखी (ठेवून दिल्यावर) केल्यावर ही; मुख जेथे असते तेथेच असते. मग दर्पणात अवलोकन केल्याने मुखात कोणता भेद (फरक) झाला - अन्य असे काय झाले. दृश्य, दृष्टी आणि दृष्ट्रत्व नव्हते, तेव्हा संवित्ति होती. चैतन्य होतेच. ते दृश्य, दृष्टी आणि दृष्ट्रत्व प्रकटले; तरी ते परमात्मतत्त्व आहे तेथेच आहे. दृश्य, दृष्टी आणि दृष्ट्रत्व नाहीसे झाल्यावरही; परमात्मतत्त्व आहे तेथेच निर्गुण, निराकार, निर्विकार आहे. विश्व प्रकटण्यापूर्वी, प्रकटल्यावर आणि विश्वाचा लय झाल्यावर ते परमज्ञानस्वरूप तसेच अविचल निर्विकार, सर्वव्यापी असेच अनंतपणे आहे. म्हणजेच -



**तेव्हां घेणें देणें घटे । परी ऐक्याचें सूत न तुटे**
**जेवीं मुखीं मुख वाटे । दर्पणें केलें ।।**

(अमृ. अ.७ अज्ञान खंडन ओ.क्र. १३३)

**पुढें देखिजे तेणे बगे । देखतें ऐसें नमों लागे ।**
**परी दृष्टीतें वाऊगें । झकवित असे ।।२७।।**

आरशात समोर पाहिले तर त्यामुळे आपले मुखच आपण पाहात आहोत असे वाटते. पुढे देखिजे तर त्यामुळे बगे देखते ते (तेच दिसते आहे) ऐसे, नमो लागे (असे वाटू लागते) परंतु दृष्टीला हे वावगे (चुकीचे, भ्रमित) दिसत असते. ते खरेच आरशात प्रतिबिंब पडलेले आहे आणि आपलेच मुख आहे असे वाटते. परंतु 'आरसा' हे त्या काचेचे रूप असते म्हणून तसा भास होतो. पारा लावला की पाऱ्यामुळे काचेचे आरशात रूपांतर होते. म्हणजे पाऱ्यामुळे त्या काचेत एक भ्रामक प्रतिमा दिसते. याचा अर्थ काचेतही ते प्रतिबिंब नसतेच. पारा खरडून काढला तर आपण काचेत पाहात असतांना सुद्धा प्रतिबिंब दिसणार नाही. प्रतिबिंब हा भ्रम, प्रतिबिंब पडणे हाही भ्रम, ते काचेने दिसते आहे हाही भ्रम. म्हणजे त्या आरशात आपण दिसतो आहोत, असे म्हणणे हे आपणच आपल्या दृष्टीला फसवीत आहोत, असे नाही का होत? तेथे काहीच नाही. आपले मुख आपल्या जवळच असूनही आपण आरशात आपल्या डोळ्यांना फसवीत आहोत. भ्रांतीत अडकतो आहोत -

**म्हणोनि दृश्याचिये वेळे । दृश्य द्रष्ट्रत्वा वेगळें ।**
**वस्तुमात्र निऱ्हाळे । आपणापाशी ।।२८।।**

दृश्य प्रकटे तेव्हां ते द्रष्ट्रत्वा वेगळे असते. म्हणजे द्रष्ट्रत्व ज्या आत्मरूपामुळे प्रकटले आणि दृश्यरूपाने नटले या दोन्ही ठिकाणी द्रष्ट्रत्व अर्थात जीवात्मशक्ती ही आत्मरूपापासून वेगळी असते आणि दृश्य तर या दोन्हीहून भिन्न असते. चांगदेवा, आपण दृश्य आहात, ते आपणात द्रष्ट्रत्व आहे म्हणून. पंचभौतिक जीव आणि स्वयंस्फूर्त परमात्मा, एकवटून जीवरूपाने नटला म्हणून. चांगदेव हे नाव आणि त्यांचा लौकिक संबंध, यापेक्षा माणूस प्राणी म्हणून चांगदेव आणि माणुसपण हेही आत्मरूपामुळे, म्हणजे निर्गुण, निराकार, निर्विकार असे आत्मरूप, स्वाभाविक स्फुरणामुळे माणूस नावाचा जीव म्हणून, अर्थात द्रष्ट्रत्व

म्हणून प्रकटले आणि लौकिकात चांगदेव हे नामाभिधान व त्या नामाभिधानासह लौकिक व्यवहार, साधक, योगी, सिद्ध, गुरू इ. असे एकूण दृश्य निर्माण झाले; परंतु या दृश्यापासून आत्मरूप स्वतःच्याच स्वसंवेद्यतेने आपल्यातूनच स्फुरलेल्या द्रष्ट्याचे, द्रष्टा म्हणून दर्शन घेते आहे. आत्मरूप स्वतःलाच स्वतः तटस्थ राहून, अलिप्त राहून न्याहाळत आहे. अशी ही परमतत्त्वाची लीला आहे. हे तर असे झाले -

**आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती आंगे ।**
**की द्वैताचेनि पांगे । उगळिते आहाती ।।**
(अमृ.अ.प. शिवशक्ती समावेशन, ओ.क्र. ३)

**मीच माझा डोळा मीच शून्यात निळा । माझा मी वेगळा तयामध्यें ।।१।।**
**उफराटी दृष्टी लावितां नयनीं । ते दृष्टीची वाणी किंचत ऐका ।।२।।**
**उफराटी दृष्टी देखे उन्मनीवरी । तेव्हां निर्विकारी मीच मग ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे देहा डोळां दिठी । पाहातां सर्व सृष्टि निवृत्ति एका ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञानदेव गा. अ.क्र. ८८७ संपा. डॉ. गोसावी)

निजवस्तु ही स्वभावतः स्फुरण पाऊन विविध रूपात नटते; तरी त्या विविध रूपात देखील नित्य, स्थिर आणि निर्विकारपणे राहाते. ती रूपात असते; तरी ती रूपापासून वेगळी केवल, निर्गुण, निराकार आणि निर्विकार असते. जसे -

**वाद्य जातेविण ध्वनि । काष्ट जातेविण वन्ही ।**
**तैसे विशेष ग्रासूनी । स्वयेंचि असे ।।२९।।**

वाद्य वाजत असतांना ध्वनी उमटतो पण वाद्य वाजत नसतांनाही, तो ध्वनी असतोच. लाकूड जळत असतांना अग्नी दिसतो. तसा लाकूड जळत नसतांनाही तो असतोच. त्याप्रमाणे सर्व विशेष वस्तूत जसा परमात्मा असल्याची जाणीव त्या विशेष वस्तूंच्या प्रकटल्याने जाणवते; तशा सर्व विशेष वस्तू प्रकट होत नसतांनाही, परमात्मा परमात्म्याच्या ठिकाणी असतोच. त्या वस्तू प्रकट होतात. त्या देखील त्या वस्तूंच्या ठिकाणी सुप्त रूपाने परमात्मा असतो म्हणूनच. म्हणजे त्या वस्तूंच्या ठिकाणी परमात्मा असूनही, तो पूर्ण अलिप्त स्वसंवेद्य, केवल, चिरंतन आणि सच्चिदानंदरूप असतो. जसे



**अलंकारातें आलें । तरी सोनेपण काई गेले ।**
**कीं कमळ फांकले । कमळत्वा मुळे ।।** ज्ञा.अ. १४-१२४ ।।
**कीं विरूढलेया जोंधळा । कणिसाचा निर्वाळा ।**
**वेचला कीं आगळा । दिसतसे ।।** ज्ञा.अ. १४-१२६ ।।
**म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।**
**तैसा नव्हे उखितें । आघवें मीचि ।।** ज्ञा.अ. १४-१२७ ।।

किंवा-

**कां भूमि कुंभ ठेविजे । तै संकुभता आपजे ।**
**तो नेलियां म्हणिजे । तेणेंवीण ।।** अमृ.अ.४ ज्ञानाज्ञान भेद कथन, ओ. ४२।।
**परी दोन्ही हे भाग । न शिवति भूमीचें आंग ।**
**ते वेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणे ।** अमृ. ज्ञानाज्ञान भेद कथन ओ. ४३।।

म्हणून हे लक्षात घ्या-

**जें म्हणतां नये कांहीं । जाणो नये कैसे ही ।**
**असतचि असे पाही । असणे जया ।।३०।।**

संवित्ति किंवा परमात्मा असे जे काही, ते नाही असे म्हणता येत नाही. ते कसे आहे, ते नेमकेपणाने जाणताही येत नाही. परंतु त्याचा असलेपणा त्याला असतोच हे लक्षात ठेवावे. निर्गुण, निराकार, निर्विकार अशा परमात्म्याला नाकारता तर येत नाही पण तो कसा आहे ते जाणता येत नाही. तरी त्याची जाणीव होतेच. हेच त्याचे एकल, एकटे, अद्वितीय आणि अद्वैत पण आहे. जसे-

**जो सर्व नेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे ।**
**कांहींच न होनि आणिजे । आपणपयां जो ।।** ज्ञा.अ. १६ ओ.१९ ।।

अहो तो परमात्मा -

**आत्मा आंगे प्रसिद्ध देखिला । अंतर्बाह्य अलिप्त व्यापला ।।१।।**
**देखिजेसें नाही देखिला म्हणती काई । देखणें तें देही देखतुसे ।।२।।**
**रुपरेखा नाहीं लक्षावा कवणें ठायीं । लक्षी लक्षितांही परतल्या दृष्टी ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणें आनंद होईल पूर्ण । अनुभवें तेचि खुण देखतसे ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ६२८, संपा. डॉ. र. रा. गोसावी)

माऊली ज्ञानेश्वर आणखी दृष्टांत देतात –

**आपुलिया बुबुळा । दृष्टी असोनि अखम डोळा ।**
**तैसा आत्मज्ञानी दुबळा । ज्ञानरूप जो ।।३१।।**

आपुलिया अखम डोळा बुबुळा, दृष्टी असोनि, बुबुळाला डोळा पाहता येत नाही. कारण तो स्वतःच दृष्टीरूप असतो म्हणून तो स्वतःला पाहायला दुबळा ठरतो. तैसा जो आत्मज्ञानी, ज्ञानरूप झालेला असल्याने, त्याला ते आत्मज्ञान (असे व्यक्तिमत्त्व) किंवा ज्ञान, पाहण्याच्या बाबतीत तो दुबळाच ठरतो. स्वतः अद्वैत झाल्यावर त्याला आपलेच रूप कसे पाहाता येईल? परमज्ञानाला परमज्ञान कसे पाहता येणार? म्हणून त्याच्या अंगभूत असलेल्या स्वयंस्फुरणाच्या योगाने स्वतः निर्विकार राहूनही सृष्टीरूपात नटतो आणि सृष्टीरूपात स्वतःला अनुभवत असतांनाही तोच सृष्टीरूप झाल्याने, सृष्टीचे स्वाभाविक रूप, आत्मज्ञानाने पाहतांनाही, स्वतः मात्र निर्विकार होतो. म्हणजे हे चांगदेवा, ज्ञानाला ज्ञान आहे, याची; डोळ्याला डोळा आहे याची; अर्थात दृष्टी आहे याची; जाणीव संवेदित होऊनही, तो त्याचे स्वरूप पाहू शकत नाही. वर्णन करू शकत नाही, कारण मुळीच त्यात निर्विकारता, निर्गुणता, निराकारता आहे. जाणीव होते, ती स्वतः सत्‌चिदानंदरूप आहे याची. परंतु ते म्हणजे काय; हे वर्णन करण्याचे, द्वैत त्याच्या ठिकाणी येऊच शकत नाही. हेच त्याचे केवलत्व आहे.

**आपुलेनि जाणपणें । आपणयातें जाणों नेणें ।**
**डोळ्या आपुले पाहणें । दुवाड जैसें ।** अमृ. अ. ६ शब्द खंडन ओ. ८८।।

किंवा

**आरसा आपुलिये । आंगी आपणा पाहे ।**
**तैं जाणणें जाणों लाहे । आपणयातें ।।** अमृ. अ. ६ शब्द खंडन ओ. ८९।।

हे योगीराज चांगदेवा, त्यामुळेच परब्रह्मस्वरूप, कोणत्या प्रकारे, योगी अथवा ज्ञानी साधकांनी जाणावे; हा प्रश्न आत्मचिंतनाचा आहे. असे पाहा –

**जे जाणणेंचि कीं ठाई । नेणणें कीर नाही ।**
**परि जाणणें म्हणोनियां ही । जाणणें कैचे ।।३२।।**



जे ठाईच जाणणेंचि कीं (आहे) तेथे नेणणे काय ते नाहीच. हे खरे तरी जाणून घ्यायचे म्हणूनही कसे जाणावे? परब्रह्मस्वरूप हे पूर्ण ज्ञानरूप असल्याने, तेथे अज्ञान कसे ते नाहीच. परंतु त्या पूर्णज्ञानरूप अवस्थेला पोहोचलेल्या, अद्वैत स्वरूप झालेल्या, योग्याला, त्या अद्वैत अशा पूर्णज्ञान स्वरूपाचे, संवेदन जाणवत असले; तरी वर्णन केवळ अशक्यच होय. याकरिता –

**या लागी मौनेंचि बोलिजे । कांही न होनि सर्व होईजे ।**
**नव्हतां लाहिजे । कांहीच नाहीं ।।३३।।**

हे चांगदेवा, पूर्णज्ञानरूप, परमात्मा किंवा परब्रह्म हे शब्दांच्या पलिकडे असते. म्हणून शब्दमागुते सारूनच बोलावे. अर्थात अद्वैत अवस्थेत आत्ममग्न अवस्थेचा अर्थात सर्वात्मक अवस्थेचा, अनुभव घेणेच शिल्लक राहते. ते सच्चिदानंदरूप किंवा पूर्णज्ञानस्वरूप, एकल, एकटे असे संवेदित होत राहिले; तरी तेच निर्गुण, निराकार, निर्विकार तरी स्वयंस्फूर्त स्वभावाने सर्वात्मक असल्याचा अनुभव करते. ते ज्ञानस्वरूप निर्गुण, निराकार, निर्विकार असल्याने ते तटस्थपणे असते. हे खरे म्हणजे ते 'कांहीं न होनि हे खरे'; तरी स्वयंस्फुरण हा त्याचा स्थायीभाव असल्याने तेच सर्व विश्वरूप अशा सृष्टी रूपाने अर्थात, सर्वपणाने नटलेले असते. म्हणजेच कशातच नव्हता. (लिप्त न होता) ही सर्व लाहिजे (सर्वात्मक असावे) तरी ते ज्ञानरूप म्हणजे दृष्ट विश्वरूप नाही. ह्याचाही अनुभव घ्यावा. एकप्रकारे त्या परमचैतन्याचा स्वभाव चैतन्यमयतेने स्वयंस्फूर्तपणे, प्रकट होण्याचा असला तरी ते चैतन्य ठायीच मात्र, निर्गुण, निराकार, निर्विकार असे सत् चित् आनंद स्वरूप आहे. याचे संवेदन या मौनातील आत्मचिंतनात घडते. याचाच अर्थ असा की, परमात्मा आणि अंतरात्मा या दोन्ही स्वरूपात, सत्‌चित्‌आनंदस्वरूप, कैवल्य, निर्गुण, निराकार, निर्विकार आहे; याचा मौन चिंतनात अनुभव करावा. ज्ञानी पुरुष अशा पूर्णज्ञान अवस्थेत, देही विदेही अवस्था भोगण्याचे सामर्थ्य प्राप्त करतो तेव्हा त्याचा दृश्य चराचर विश्वातला अहंकार पूर्णतः सांडलेला असतो. याची जाणीवही त्याला नसते. म्हणूनच तो पूर्णतः मौनपणेच बोलतो. (स्वसंवेद्यता भोगतो) अशी उन्मन अवस्था पूर्णज्ञानी पुरुषाला याचि देही विदेही होऊन, भोगण्याची अनुभूती येते. जसे –

**आदिमध्य अंत तुजमाजि बिंबे । ब्रह्मी ब्रह्म थांबे लवण जळी ।।१।।**
**तैसें झालें ज्ञाना उन्मनी उलथा । प्रपंच चळथा उडालिया ।।२।।**
**रिगु निळगु काज जालें तुझे घर । अवघाचि संसार कळला आम्हा ।।३।।**
**गोप्य गुजराज उमजले हरि । दिसे अभ्यंतरी आत्माराम ।।४।।**
**न दिससि ज्ञाना देहीं तुझ्या राम । घेतला विश्राम ऐसें दिसे ।।५।।**
**निवृत्ति निवांत समरसें पाहात । अवघाचि दिसत देहीं विदेही ।।६।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ६२४, संपा. डॉ. गोसावी र. रा.)

समरस झाला अर्थात ज्ञानस्वरूप झाला की निवांत अवस्था, अर्थात मौनावस्था प्राप्त होते. तेथील आत्मसंवाद हा शब्देवीण देही असूनही विदेहीपणाने घडतो. जसे –

**नाना बोधाचिये सोयरिके । साचपण जेणे एके ।**
**नाना कल्लोळ माळिके । पाणी जेवी ।। ३४ ।।**

नाना प्रकाराने बोध समजून घेतला तरी सत्य एकच असते. जसे ‘एकं सत विप्रा बहुधा वदंती’ किंवा ज्याप्रमाणे पाण्यावर कल्लोळांच्या नाना मालिका प्रकटल्या तरी पाणी पाणीच असते; तसे पूर्णज्ञान स्वरूपावस्थेला विश्वस्वरूप नटलेल्या अवस्थेचे संवेदन होऊनही; परब्रह्म निष्काम अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार असल्याचाच आत्मरूपाशी अनुभव घडतो. अहो,

**जे देखिजतें विण । एकलें देखतेंपण ।**
**हें असो आपणीया आपण । आपणचि जें ।।३५।।**

विश्वरूपाने नटलेले असूनही जे तो नटलेपणा पाहाण्यापलिकडे एकलेपणाचे देखतेपण (अनुभव) भोगतो; कारण विश्वरूपाने नटलेपणासह, ते परब्रह्म तत्त्व, सर्व काही आपले आपल्यात असल्याचे संवेदन भोगते. पूर्णज्ञानी पुरुषालाही सर्वत्र भरून उरलेल्या परब्रह्मांचाच स्वतःत, आत्माराम दर्शनाचा अनुभव येतो. आणि देहाचा अर्थात विश्वरूपाचा अहंकार नाहीसा होऊन; सिद्ध, निर्गुण, निराकार, निर्विकार अशी अवस्था प्राप्त होते. माया आणि स्वयंस्फुरणही आत्मानंदात विलीन होऊन; केवळ असवसेची संवेदना प्रकाशते. जे शुद्ध पूर्णज्ञानरूप आहे ते तद्रूप झाल्यावर त्याला, जाणून घेण्याचे ज्ञान राहातच नाही.



**जें कोणाचे नव्हते नि असणें । जे कोणाचें नव्हतां दिसणे ।**
**कोणाचें नव्हतां भोगणें । केवळ जो ।।३६।।**

जो केवळ अर्थात पूर्णज्ञानस्वरूप झाला, तो कोणाचा नसूनही सर्वांचा असतो, कोणाचा नसतांनाही, सर्वांना आपलाच आहे, असा दिसतो. अर्थात अनुभवास येतो. ती कोणत्याही रूपात नटूनही त्यापेक्षा वेगळा असतो. तरी ते रूपही तोच भोगत असतो. असे तो सर्वांत असून, सर्व त्याच्या ठिकाणी असून, तो कोणातच नसतो; तरी तो केवलपणे सर्व भोगतो. त्याचे असे होते की –

**आपुलेनि समीरपणें । वेल्हावती विंजणे ।**
**की माथेचि चांफेपणें । बहकताती ।।२।।** अमृ.अ.९ जीमुद ओ.२
**जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ।**
**चकोरचि जैसे । चंद्रमा झाले ।।३।।** अमृ.अ.९ जीमुद ओ.३
**फुलेंचि जाळीं भ्रमर । तरुणीची झाली नर ।**
**जाळें आपुले शेजार । निद्राळुचि ।।४।।** अमृ.अ.९ जीमुद ओ.४
**तैसे भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।**
**हे सरळे अद्वैता । अफुटा माजी ।।७।।** अमृ.अ.९ जीमुद ओ.७

पूर्णज्ञानीपण असे असल्याचा आत्मानुभव येतो खरा. त्यात हे चांगदेवा आपले ऐश्वर्य केव्हढे पाहा –

**तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।**
**चांगया, मज तुज आपण याचा । बोळ एके ।।३७।।**

आपण तर प्रत्यक्ष परब्रह्म, पूर्णज्ञानस्वरूप अशा वटेश्वरांचे पुत्र आहात. ते म्हणजे असे; कापुराचा रवा (कण) ही कापूरच असतो तेव्हा आपणही पूर्णज्ञानस्वरूप, परब्रह्म असे अद्वैत सिद्ध आहात. आपल्याला माझा बोल म्हणजे, आपलाच बोल आपणच ऐकतो असे घडेल म्हणजे आपण आणि मी यात पूर्णज्ञानस्वरूप अशा आपणाच्या ठिकाणी भेद संभवत नाही. म्हणजे माझे जे हे बोलणे आहे; ते आपल्या व माझ्या अशा एकाच आत्मस्वरूपाविषयी बोलणे आहे. म्हणजे आपण आपलेच मौनातील पूर्णज्ञानस्वरूप भोगणे,

माझ्या मुखाने बोलवून; ऐकत आहात; असा हा अनुभव आहे. म्हणजे, हे बोलणे, हा तर आपलाच आत्मसंवाद आहे. म्हणजे –

**ज्ञानदेवो म्हणे । तुज माझा बोल ऐकणें ।**
**तें तळहाता तळीं मिठी देणें । जयापरि ।।३८।।**

मी, ज्ञानदेव तर असे म्हणतो; की आपण माझे बोल ऐकणे; म्हणजे आत्मस्वरूपाने, आत्मस्वरूपाचे बोलणे ऐकण्यासारखे आहे. कारण आपण आणि मी, आपले उभयतांचे आत्मस्वरूप वास्तविक एकच आहे. म्हणजे दोघेही परब्रह्मस्वरूपच आहोत. म्हणून ते आपले बोलणे म्हणजे तळहाताने तळहाताला आलिंगन देण्यासारखे आहे म्हणजे आपणच आपल्याला आलिंगन दिल्यासारखे आहे – म्हणजे –

**बोलेंचि बोल ऐकिजे । स्वादेंचि स्वाद चाखिजे ।**
**कां उजिवडे देखिजे । उजिडा जेवी ।।३९।।**

बोलाने स्वतःच स्वतःचे बोल ऐकावे किंवा पक्वान्नाने स्वतःच स्वतःचा स्वाद घ्यावा किंवा उजेडानेच उजेड पाहावा असे झाले. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर –

**सोनिया वरकल सोनें जैसा । का मुखामुख हो आरिसा ।**
**मज तुज संवाद तैसा । चक्रपाणी ।।४०।।**

सोन्याला सोन्याचाच मुलामा (वरकल) द्यावा किंवा मुखानेच मुखाचा आरसा व्हावे; तसे हे चक्रपाणी, हा आपला आणि माझ्यातला संवाद आहे. म्हणजेच हा केवळ आत्मस्वरूपाचा आत्मसंवाद आहे. पूर्णज्ञानमय अवस्थेमुळे तू आणि मी हा भेदच नाहीसा झाला असून; सच्चिदानंदरूपाचे संवेदन, आपल्या आत्मसंवादातून घडत आहे. ही अवस्था म्हणजे

**गोडिये आपली गोडी । घेतां काय न माये तोंडी ।**
**आम्हां परस्परें आवडी । तो पाडू असे ।।४१।।**

आत्मस्वरूपाच्या दृष्टीने आपल्या दोहोंची अद्वैत अवस्था निर्माण झाली आहे. म्हणून गोडीनेच गोडी चाखायला सुरुवात केली तर ती तोंडात मावणारच



नाही; कारण तोंडाची शक्ती मर्यादित ठरेल. तसा आपणा दोहोंचा स्नेह आहे. परस्परांना समजून घेणेच, आता शब्दात वर्णन करण्यासारखे किंवा मुखाने सांगण्यासारखे राहिले नाही. या स्नेहाला कैवल्याची अर्थात आत्मरूपाची मर्यादा आहे. खरे तर आपणास भेटण्याच्या उद्देशाने निघालो तेव्हां –

**सखया तुझेनि उद्देशें । भेटावया जीव उल्हासे ।**
**कीं सिद्ध भेटी विसकुसे । ऐशिया बिहे ।।४२।।**

हे सखया, चांगदेवा, आपल्याला भेटण्याच्या उद्देशाने जीव उल्हासला होता, आतूर झालो होतो; मात्र आपणासारख्या सिद्ध पुरुषाला भेटावे तरी कसे; (विसकुसे) कोणत्या प्रकारे या शंकेने मी बिहीत होतो. म्हणजे असे होऊ लागे; की –

**घेवों पाहें तुझें दर्शन । तव रूपा येवों पाहे मन ।**
**तेथें दर्शना होय अवजतन । ऐसें गमों लागें ।।४३।।**

आपले दर्शन घेण्याचा प्रयत्न करू लागले की; मन आत्मरूपात मग्न होई, तसेच स्वतःच्या देहबुद्धीचाही विचार येई. आत्मरूप मन झाले; की आपण आणि मी वेगळा नाही; असे वाटून आपले दर्शन आपसुकच मनात होई. देहबुद्धीने आपली भेट घेण्यास उत्सुक होताना; माझे लहानगे रूप आठवे. वाटे आपण चौदाशे वर्षे योगसामर्थ्याने जगलात, सिद्धपदाला गेलात, प्रत्यक्ष काळालाही बांधलेत; अशा आपल्या विराट विभूतिमत्त्वाचे दर्शन कसे घ्यावे; असा प्रश्न पडे. असे दर्शन हे अवजतन अर्थात उद्धटपणा तर होणार नाही ना? असा विकल्प मनात येई. परंतु जेव्हां आत्मरूपाने विचार मनात येई तेव्हां आपण आणि ज्ञानदेव, हे एकच आत्मरूप आहे; मग दर्शन कोणाचे घ्यायचे? असा प्रश्न पडे. त्यामुळे आपल्या दर्शनाची माझ्या मनातील इच्छा, सफलच होत नाही असे वाटे. आपले दर्शन आत्मरूपावस्थेत घेण्याचा उल्हास निर्माण झाला तर –

**अरे अरे ज्ञाना झालासि पावन । तुझें तुज ध्यान कळो आलें ।।१।।**
**तुझा तूंचि देव तुझा तूंचि भाव । फिटला संदेह अनन्य तत्त्वी ।।२।।**
**मुरडूनियां मन उपजलासि चित्ते । कोठें तुज रितें न दिसे रया ।।३।।**
**दीपकीं दीपक मावळल्या ज्योती । घरभरी वाती शून्य झाल्या ।।४।।**

**वृत्तीची निवृत्ति आपण सकट । अवघेंची वैकुंठ चतुर्भुज ।।५।।**
**निवृत्ति परमानुभव नेमा । शांति पूर्ण क्षमा ज्ञानदेवो ।।६।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. २४५ संपा. डॉ. गोसावी र. रा.)

अशी स्थिति व्हावी! हे चांगदेवा, आपल्यातील, आत्मस्वरूप स्थितीमुळे द्वित्त हरपले. त्यामुळे आपल्यांशी काय बोलावे; काय बोलू नये; असा कल्प निर्माण झाला.

**कांही करीं बोले कल्पी । कां न करी न बोले कल्पी ।।**
**ये दोन्ही तुझिया स्वरूपीं । न घेति उमसू ।।४४।।**

हे चांगदेवा, योगीराजा, आपण आता काही कृती करावी किंवा काही बोलावे ही कल्पना करतो किंवा काही कृती किंवा बोलणे होणार नाही, अशी कल्पना केली तरी आपण आणि मी आपल्या (तुझीया) स्वरूपीच असल्याने 'न घेति उमसू' (योग्य ठरणार नाही) आपल्यातील या आत्मस्वरूप अद्वैतामुळे बोलणे, कृती करणे किंवा न बोलणे न कृती करणे या गोष्टींना, तसा काहीच अर्थ नाही; कारण आत्मरूपात लीन झाल्याने असे विकल्प राहातच नाहीत.

**चांगया तुझेनि नांवे । करणें न करणें न व्हावें ।**
**हें काय म्हणों, परि न धरवे । मी पण हे ।।४५।।**

आत्मस्वरूप झाल्यामुळे, लौकिकातील अहंकारच नाहीसा झाला आहे. त्यामुळे हे चांगदेवा, तुमच्या चांगदेव या प्रसिद्धीस अनुसरून केले आणि केले नाही, ह्या विषयी काय म्हणावे? समजा म्हटले तरी 'परि न धरवे' ते आत्मस्थितीला योग्य ठरणार नाही. कारण तसे म्हणणे म्हणजे ते 'मी पण' होईल. जो उपाधीचा मीपणा आहे, तो आत्मतत्त्वाशी नाहीसा झाला आहे. कारण आपण आणि मी एकरूपच झालो आहोत. आणि याही पलिकडे आपण एवढे थोर आहात, की आपल्याला परमात्मस्वरूप काय सांगावे? खरे तर आपणच परमात्मस्वरूप आहात. आत्मस्वरूप झाल्यावर अवघे द्वैतच नाहीसे होते. जसे –

**लवण पाणियाचा थावो । माजि रिघोनि गेलें पाहो ।**
**तंव तेंचि नाहीं मा काय घेवो । माप जळा ।।४६।।**



पाणियाचा माजी लवण रिघोनि गेले थावो; तेव्हां, पाहा, त्याची अवस्था जशी होते त्याचे माप जळाच्या ठिकाणी पाहता येते का? तसे जीवात्मा आत्मस्वरूप झाला की, मीठ जसे जलरूपच होते, तसे जीवात्मा आत्मरूपच होतो. खरे तर जीवात्मा आत्मरूपच असतो. जीवाच्या ठिकाणी (पंचभौतिक आकाराच्या ठिकाणी) त्याला जीवात्मा ही उपाधी लागते. आत्मस्वरूप झाल्यावर त्याला आत्मस्वरूपाचे मूल्य येते.

**तैसें तुज आत्मयातें पाही । देखो गेलिया मीचि नाहीं ।**
**तेथें तू कैचा काई । कल्पावया जोगा ।।४७।।**

त्याप्रमाणे आपल्या आत्मरूपाच्या ठिकाणी एकरूप होऊन; मी मला शोधू लागलो, तर आपल्या आत्मरूपातच माझे मीपण विरून गेलेले आहे. त्यामुळे माझे आत्मरूप गवसेना. मग तेथे आपण, चांगदेव म्हणून तरी कसे असाल? कारण आत्मरूपाच्या ठिकाणी कोणाचीही कल्पनाच करता येत नाही. मग आपली तरी कल्पना कशी काय करता येणार? असे पाहा आत्मस्वरूप, एकल, एकटे निर्गुण, निराकार, निर्विकार, अलिप्त असे असते. मग जीवात्मा आत्मरूप झाल्यावर त्याचे वेगळेपण कसे बरे जाणवेल. जसे –

**आकार पूजितां निराकार जालें । शून्यी बुडालें बाईयानो ।।१।।**
**शून्याचा अंकूर शून्य फळलें । व्योमाकार जालें मन तेथें ।।२।।**
**तेथें फळ ना डाळ जातिं ना कुळ । वटेश्वर चांगा जाला निमूळ ।।३।।**
(सं.स.गा. चांगदेवांचे अभंग अ.क्र. ३१ संपा. डॉ. गोसावी)

हे चांगदेवा, असे बघा –

**अवघ्या बाहीं म्या व्योम कवळिलें । अवघां हृदयीं अरुप धरिलें ।।१।।**
**अवघेपणें मी त्याचीच जालें । तेंचि पावलें तदाकारें ।।२।।**
**कांहीं नहोनियां कांहीं एक जाले । अवघाचि शोशिला ब्रह्मरसु ।।३।।**
**रखुमादेविवरू अवघाचि धरिला । अवघाचि गिळिला अवघेपणें ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ६०१ संपा. डॉ. गोसावी)

परंतु हे चांगदेवा,

**जी जागोनि नीद देखे । तो देखणेपणा जेंवि मुके ।**

**तेंवि तूंते देखोनि मी ठाके । कांहीं न होनि ।।४८।।**

जागे असून निद्रेचे सोंग घेणारा जसा देखणेपणाला (ज्ञानाला) मुकतो, त्याप्रमाणे आपल्याला पाहूनही मी निवांत राहिलो; तर काहीच घडणार नाही. आपण प्रत्यक्ष आत्मस्वरूप आहात, हे कळूनही; मी आत्मस्वरूपाचा अनुभव घेतला नाही; तर काहीच होणार नाही. मी डोळे असून आंधळा ठरेल. तसेच जागेपणाने निद्रा कशी पाहता येणार? तसे केले तर निद्राही नाही आणि जागेपणाचाही अनुभव करता येणार नाही. झोपेचा देखणेपणा अर्थात झोपेतील विश्रांती सुखही हरवून जाईल आणि जागेपणाचे ज्ञानसुखही हरवेल. हे चांगदेवा 'तूंते देखोनि मी ठाके' असे केले; तर आपल्या आत्मस्वरूपाचा अनुभव घ्यायलाच पारखा होईन. आपण तर निर्गुण, निराकार, आत्मस्वरूप; अशी अद्वैत अनुभूती करीत आहात. ते अनुभवणे हेच माझे कर्तव्य होय. म्हणूनच मला आत्मस्वरूपाचाच अनुभव घ्यायला हवा. आपण तर केवळ ज्ञानस्वरूप आहात, मग त्याचा अनुभव मी अहंपणाने कसा घ्यावा? मलाही ज्ञानस्वरूपाने ते अनुभवावे लागेल. अंधारात उजेड असणे शक्य नाही किंवा उजेडात अंधार दिसणार नाही. तरी देखील त्यातील आत्मस्वरूप त्या उजेडात आणि अंधारातही असतेच ना? त्यावर अंधार किंवा उजेडाचा काही परिणाम होत नाही. जसे –

**आंधाराचे ठाई । सूर्यप्रकाश तंव नाही ।**
**परी मी आहें हे कांही न । वचेचि जेविं ।।४९।।**

असे पाहा मी किंवा वस्तूचा अनुभव अंधारात किंवा उजेडातही वास्तव रूपाने येतो. हां, हे खरे, अंधारात सूर्यप्रकाश नाही आणि सूर्यप्रकाशात अंधार नसतो. सूर्यप्रकाशात वस्तुमात्र दृश्य होते आणि अंधारात ते झाकोळले जाते, अंधाराने ग्रस्त होते, परंतु ते तर असते तेथेच स्थिर असते. एखादी काळी वस्तु तर अंधारातच गडप झाल्यासारखी वाटते. परंतु ती वस्तु असतेच ना? फक्त दृष्टीभ्रम झालेला असतो, एवढेच. हेच पाहा –

**कां काळा राहे काळवखा । तो आपणा ना आणिकां ।**
**न चोजवे तऱ्ही आसिका । हा मी बाणे ।।**

(अमृ. अ. ४, ज्ञानाज्ञान भेद कथन ओ. ३६)

काळोखात काळा माणूस इतरांना दिसला नाही तरी तो तेथे असतोच.



काळोखाने झाकाळतो इतकेच. त्याच्या माणूस असण्यावर मात्र काळोखाचाही परिणाम होत नाही. काळा माणूस दिसत नाही असे म्हणणे; हे मीपणाने अज्ञानवश असे विधान होईल. अंधार असो की उजेड असो या विकारांचा नित्य अशा चैतन्यतत्त्वावर कोणताही परिणाम होत नाही. कारण ते तर निर्गुण निराकार, निर्विकार आहे. तेच सर्वत्र असूनही, सर्वांतून अलिप्त निर्विकार आहे. ते आहे आणि नाही असा वाद अज्ञानवश असतो. आपण देहासक्तीने असे करीत असतो. जसे–

**तेंवी तुंते मी गिवसी । तेथें तूंपण मीपणेंसी ।**
**उखते पडे ग्रासी । भेटीचि उरे ।।५०।।**

पाहाणारा जसा काळोखात न दिसणाऱ्या माणसाचा शोध घेतो तसा मी जेंव्हा आपल्याला गिवसू लागलो (शोधू लागलो); तर तेथे तूपण म्हणजेच मीपण आहे; असे लक्षात आले. अर्थात तू आणि मी दोन नाहीतच असे लक्षात आले. दृश्य आणि द्रष्टा देखील एकरूपच असल्याचे लक्षात येते. माझेपण तुझेपणात विरघळून गेले, की तुझेपण माझेपणात विरघळून गेले, कळेच ना! जणू उखते पडे ग्रासी. जणू उखोनी (उभयतांनी) परस्परांचा ग्रास घेतला आहे. परस्पर, परस्परस्वरूप झाले आहेत आणि भेट जशी एकरूपतेने जाणवते तसे उभय परस्परांना भेटले. नद्यांच्या संगमाप्रमाणे परस्परांचा संगम झाला. उरली फक्त भेट. अर्थात आत्मस्वरूप. भेट म्हणजे आपले अभेदत्त्व, अद्वैत तेव्हढेच राहील. जसे –

**डोळ्याचे भूमिके । डोळा चित्र होय कौतुकें ।**
**आणि तेणेंचि तो देखे । न डंडळिता ।।५१।।**

डोळ्याच्या भूमिकेने दिसणारे चित्र, कौतुकाचा विषय झाला असतांनाच, डोळा डंडळिता अनेक चित्रांचे विचित्र भास होतात – अर्थात चोळतांना बुबुळावर दाब पडल्याने, कधी दोनदोन दृश्ये, दोन वस्तू दिसू लागतात. तोच चोळणे थांबवले की समोरचे, स्थिर सुंदर चित्र आहे तसेच आहे, असे लक्षात येते. ते स्थिर आणि नित्य आहे हे लक्षात येते. चोळतांना वेगळाच अनुभव येतो खरा; पण चोळणे थांबले तरी, द्रष्टा आणि दृश्य आणि डोळा यांचे एकत्व कायमच असते. डोळा काही अनेक रूपे धारण करीत नाही. क्षणभर

जरी मनाला अहंकार झाला किंवा मायेत अडकलो तरी आत्मरूपाचे दर्शन विचलित होते. भ्रामकता येते. मी आणि तू भेदही वाटू लागतो. परंतु आत्मरूप काही मी आणि तू असे वेगळे होत नाही. अहंकाराने तात्कालिक भांबवलेपण येते खरे. ह्या भांबावलेपणामुळे, भ्रमलेपण येते. म्हणूनच आत्मरूपावर लक्ष केंद्रित व्हायला हवे. जसे –

**देव आहे जैसे तैसा नेणवे सहसा । भांबावला कैसा विश्वजनु ।।**
**तया रूप ना रेखा लय ना लक्षण । ते प्रतिमें आणून वासना रूपें ।।१।।**
**देखा सर्वगत निराळा अद्वैत । तया मूर्तिमंत ध्याय जनु ।।**
**तिहीं देवासि आरू जेथुनि विस्तारू । तो ध्वनि ओंकारू त्या आरू ।।**
**आतां तो नाद ना बिंदु काळा ना छंदु । अक्षय परमानंदु सदोदितु ।।२।।**
**अवतरे तैसाच नव्हे होय तें न संभवे । आहे तें आघवें लाघव रया ।।**
**तो येकट एकला रचला ना वेचला । आदिअंतीं संचला अनंतपणे ।।**
**पृथ्वी आप तेज वायु आकाश । हीं सकळही हारपती प्रळयांतीं ।।**
**तो निरशून्य निरुपम निरंजन निर्वाण । ते दशा पाषाण कें वि पावती ।।३।।**
**पाहतां या डोळां परि न दिसे कांही केल्या । व्यापुनियां ठेला बाहिजु भीतरी ।।**
**तो पदपिंडाअतीतु भवभावरहितु । बापरखुमादेविवरू विठ्ठलु हृदयांत रया ।।४।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. ४५ संपा. डॉ. गोसावी र. रा.)

विश्वजन भांबावले, मायेत गुंतले. अर्थात आत्मरूपाला डंडळिले की देव निर्गुण, निराकार, निराळा, अद्वैत असल्याचे जाणवत नाही. मात्र भ्रांती सरली की त्याचे 'पदपिंडा अतीतु' रूप दिसते. तसे हे चांगदेवा, आपल्यात मी आत्मस्वरूपाचा अनुभव करीत आहे. एकदा का ज्ञान झाले की द्वैत नाहीसे होते. हे चांगदेवा –

**तैसीं उपजतां गोष्टी । न फुटतां दृष्टी ।**
**मी तूं वीण भेंटी । माझी तुझी ।।५२।।**
**आतां मी तूं या उपाधी । ग्रासूनि भेटी नुसधी ।**
**ते भोगिली अनुवादीं । घोळघोळू ।।५३।।**

डोळे चोळल्याने क्षण काळ विचलित झाले की जशी एकच वस्तू दोन-दोन आहेत असे वाटते, तैसी तुझी आणि माझी भेट ही दोघांची भेट वाटली; तरी 'उपजता गोष्टी' अर्थात आत्मस्वरूप उपजले, की दृष्टीची फाटाफूट होत नाही. मी आणि तू असे पृथकपण राहात नाही. तशी आपली आणि माझी भेट वरवर क्षणभर दोन जीवांची भेट आहे असे वाटले; तरी येथे आत्मस्वरूप स्थितीत मी तू पणाच्या अहंकारापलिकडे, अद्वैत स्वरूपात ही भेट आहे. आता मी आणि तू ही अहंकारयुक्त उपाधी, वेगळी प्रतिष्ठित अवस्था परस्परांचा ग्रास आत्मस्वरूपात घडल्याने नुसती 'भेट' नावाची अवस्था, अर्थात केवळ अद्वैत अवस्था निर्माण झाली आहे. हा या भेटीचा अनुवाद अर्थात अर्थ लक्षात घेऊन; आत्मरूप, घोळघोळू (सचैलपणे) परिपूर्णपणे; आपण उभयता, मी, तू पणा टाकून; भोगीत आहोत. जसे –

**विज्ञानाचें ज्ञान अज्ञानीं घनवट । ज्ञानें अज्ञान नीट लाविले दिसे ।।१।।**
**मी तूं हे मात हरपलें दृष्टांत । हृदयीं हृदयस्थ निजतेजें ।।ध्रु।।**
**साकार निराकार शून्याशून्य दिठा । रूपी रूपवाटा हरि माझा ।।२।।**
**बापरखुमादेविवरू हृदयस्थ घटीं । बिंबोनि उफराटी कळा दिसे ।।३।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. २१ संपा. डॉ. गोसावी र. रा.)

किंवा हे कसे झाले पाहा –

**अरे स्वरूपाकारणें विश्वरूप घेतलें । सगुणें झाकिलें निर्गुण रया ।।१।।**
**तत्त्वीं तत्त्व कवळी उगवे रवीमंडळी । अवघीच झांकोळी आपल्या तेजे ।।२।।**
**द्रष्टाचिये दीप्तीं दृश्यचि न दिसे । समरसीं भासे तेज त्यांचे ।।३।।**
**चित्स्वरूपीं नांदे चित्स्वरूपीं भासे । ॐकारासारिसें तदाकार ।।४।।**
**प्रेमकळीं ओतलें सप्रेमळीत तेज । तेथें तूं विराजे ज्ञानदेवा ।।५।।**
(स.सं.गा. ज्ञा.गा. अ.क्र. २५७ संपा. डॉ. गोसावी र. रा.)

हे चांगदेवा, आपण माझ्याप्रमाणेच आत्मस्वरूपाचे अनुभव घेत आहात. त्यासाठी प्रत्यक्ष ज्ञानदेव आणि चांगदेव या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या देहांचे मिलन किंवा दृष्टभेट देखील होण्याची आवश्यकताच नाही. जसे –

**रुचतियाचेनि मिसें । सुचितें जेविजे जैसें ।**
**कां दर्पण व्याजें दिसे । देखतें जेंवि ।।५४।।**
**तैसीं अप्रमेयें प्रमेयें भरलीं । मौनाचीं अक्षरे भली ।**
**रचोनि गोष्टी केली । मेळियेची ।।५५।।**

अन्नाची रुचि आवडली की रुचीने अन्नाचे जेवण घडावे. म्हणजेच चवच चवीची चव घेऊ लागते, आस्वाद घेऊ लागते. जीभ त्याचा आनंद घेते. किंवा आरशाच्या योगाने आपलाच चेहरा आपण पाहातो आणि आपणच आपल्या असलेपणाचा आनंद घेऊ लागतो. त्याचप्रमाणे हे चांगदेवा, प्रमेयांविना प्रमेयांनी अर्थात सिद्धांतांशिवाय सिद्धांत होऊन (मोठ्या आश्चर्यकारकतेने, मोठ्या दिव्यत्वाने, गूढपणे हे होत आहे) आपण ज्या मौनाच्या अक्षरांनी संवाद साधलात (कोऱ्या कागदरूपी मौनाने, संवाद साधलात); मी त्याच प्रमाणांना, प्रमाणितपणाने, अर्थात मौनाच्या भाषेने (केवळ आत्मसंवेदनांच्या अक्षरांनी) अर्थात मौनाच्या अक्षरांनी; ही 'रचोनि गोष्टी करून; 'मेळिये' (भेटी) घडवीत आहे. येथे अप्रमेये ही प्रमेये भरली. येथे सिद्धांत नसतांनाही सिद्धांतांनी हे संवेदन भरले आहे. या रचिल्या गोष्टींतून जीवाचे आणि ब्रह्मतत्त्वाचे (अनोखे) मिलन झाले आहे.

हे चांगदेवा, या मी सादर केलेल्या 'रचल्या गोष्टींतूनही' आपण निजरूपाचा स्वतःच्या ठिकाणी अनुभव करावा; अशी माझी विनवणी आहे. आपणच आपलीच भेट घेत आहोत; असा आश्चर्यकारक अनुभव येईल.

**इयेचें करूनि व्याज । तूं आपणयाते बुज ।**
**दीप दीपपणें पाहे निज । आपुलें जैसें ।।५६।।**
**तैसी केलिया गोठी । तया उघडिजे दृष्टी ।**
**आपणिया आपण भेटी । आपणा माजी ।।५७।।**

हे चांगदेवा, ही जी, 'मौनाच्या अक्षरांनी रचलेली अक्षरे' असलेली गोष्ट मी सादर केली आहे; त्या गोष्टीचा नीट, अधिक सर्वप्रकारे (करूनी व्याज) विचार करून; आपण या गोष्टीची बुज ठेवावी, (त्या गोष्टीचा योग्य विचार करावा, जाणीव ठेवावी) आणि दिव्याने दिव्याचा अनुभव घ्यावा, अर्थात दिव्याने दिव्याचे निजरूप पाहावे (आत्मस्वरूप) पाहावे तसे आपण माझ्या 'मौनाच्या अक्षरांचा' (कोऱ्या पत्रामुळे माझ्या मनात जाणवलेल्या लिखित गोष्टींचा) अनुभव घ्यावा. अर्थात आत्मस्वरूपाचा अनुभव घ्यावा, तैसी केलीया गोष्टी (तसे केले तर) त्यामुळे दृष्टी उघडेल. अर्थात आत्मप्रकाश पडेल, पूर्णज्ञानाचा उदय होईल. अर्थात आत्मस्वरूपाचाच अनुभव येईल. आपण आपलीच भेट आपल्यामध्येच अनुभवत आहात; असा अद्वैताचा अनुभव येईल. कारण आत्मस्वरूपाचे ठिकाणी, मी आणि आपण, असा भेदच नसतो. मौनाच्या अक्षरांतून रचलेल्या गोष्टीमुळे अहंभाव संपून, आत्मस्वरूप प्रकटेल. म्हणून या गोष्टीचा विचार केला तर, म्हणजे अहंकार सोडून मौनाची अक्षरे अनुभवली तर; दिव्यदृष्टीने आत्मस्वरूपाचे दर्शन होऊन; आपण आणि मी हा द्वैत भाव समूळ मावळेल. परब्रह्मांची अद्वैत क्रीडा सच्चिदानंदस्वरूपाने अनुभूत होईल. अशी ही गोष्ट (मौनाची अक्षरे) दृष्टी उघडणारी आहे. जसे–

**जालिया प्रळयी एकार्णव । अपार पाणियाची धांव ।**
**गिळी आपली उगव । तैसे करी ।।५८।।**

प्रलय झाल्यावर, अपार पाणियाची धाव (असंख्य जलप्रवाह) आपला उगम, आपला प्रवाह, आपला मार्ग, सारे कांही, परस्परात, एकमेकांना गिळून टाकतात आणि एकार्णव होतात. (अथांग सागर रूप). त्याप्रमाणे दिव्यज्ञान दृष्टी उघडली की अहंकार; अर्थात, माझे नाव, माझा व्यासंग, माझे स्थान, माझी प्रतिष्ठा, माझी योग्यता, माझा अधिकार आदि सर्व 'अहं' विचारभावना प्रवाह, आपला मायेतून झालेला उगव विसरतात आणि सर्वात्मक तरी निर्गुण, निराकार, निर्विकार अशा कैवल्यस्वरूपात अर्थात आत्मस्वरूपात अद्वैतपणे, सर्व भेदाभेदांचा ग्रास घेऊन, सच्चिदानंदस्वरूप होतात. तसे ही 'मौनाची अक्षरे' जाणून आपण करावे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज जणू चांगदेवांना परमेश्वराच्या विश्वरूपदर्शनाची आठवण करून देऊन आत्मस्वरूपाचे अद्वैतपण जाणून घेण्यास सांगत आहेत. माऊली भाष्य करतात–

**''मागां बाळपणीं येणें श्रीपती । जैं एक वेळ खादली होती माती ।**
**तै कोपोनियां हातीं । यशोदां धरिला ।।१८२।।**
**मग भेणें भेणें जैसें । मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें ।**
**चवदाही भुवने सावकाशें । दाविलीं तिये ।।१८३।।**
**ना तरी मधुवनीं ध्रुवासि केलें । जैसें कपोल शंखे शिवतलें ।**
**आणि वेदांचियेही मतीं ठेलें । तें लागला बोलों ।।१८४।।**
**तैसा अनुग्रहो पैं राया । श्रीहरी केला धनंजया ।**
**आतां कवणेकडेही माया । ऐसी भाष नेणे तो ।।१८५।।**

**एकसरें ऐश्वर्यतेजें पाहलें । तया चमत्काराचें एकार्णव जाहलें ।**
**चित्त समाजीं बुडोनि ठेलें । विस्मयाचां ।।१८६।।**
**जैसा आब्रह्म पूर्णोदकीं । पव्हे मार्कंडेय एकाकीं ।**
**तैसा विश्वरूप कौतुकी । पार्थु लोळे ।।१८७।।**
**म्हणे केवढें गगन एथ होतें । तें कवणें नेलें पां केउतें ।**
**तीं चराचरें महाभूते । काय जाहलीं ।।१८८।।**
**दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाहले ।**
**चेइलिया स्वप्न तैसे गेले । लोकाकार ।।१८९।।**
**नाना सूर्यतेजप्रतापें । सचंद्र तारांगण जैसें लोपे ।**
**तैसीं गिळिलीं विश्वरूपें । प्रपंचरचना ।।१९०।।**
**तेंव्हां मनासी मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे ।**
**इंद्रियांचे रश्मी माघारे । हृदयवरी भरले ।।१९१।।**
**तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें । टकासी टक लागले ।**
**जैसें मोहनास्त्र घातलें । विचारजातां ।।१९२।।**
**तैसे विस्मितु पाहे कोडें । तंव पुढां होतें चतुर्भुज रुपडें ।**
**तेचि नानारूप चहूंकडे । मांडोनि ठेलें ।।१९३।।**
**जैसें वर्षाकाळींचें मेघौडे । कां महाप्रळयींचें तेज वाढे ।**
**तैसें आपणावीण कवणीकडे । नेदीचि उरों ।।१९४।।**
**प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन ।**
**सर्वेचि उघडी लोचन । तंव विश्वरूप देखे ।।१९५।।**
(ज्ञा.अ. ११ ओ.क्र. १८२ ते १९५)

माऊली ज्ञानेश्वर चांगदेवांना निवेदन करतात –

**ज्ञानदेव म्हणे नामरूपें । विण तुझें साच आहे आपणपें ।**
**ते स्वानंद जीवनपे । सुखिया होई ।।५९।।**

आपल्या परीने आपण नामरूपाविण असणे योग्य होय, असे मला (ज्ञानदेवांना) वाटते. कारण आपण स्वानंदसुखात लीन असे जीवन जगत आहात. आत्मस्वरूपाला नावरूप नसतेच; हे आपल्या कोऱ्या पत्राने, (सिद्धांतस्वरूपच) लक्षात आले. म्हणूनच चांगदेव हे देहाचे नाव बाजूला सारून; आपण परिपूर्ण ज्ञानमार्गी जीवन व्यतीत करीत आहात, ही आपली अवस्था, कोऱ्या पत्राने, अर्थात मौनाच्या अक्षरांनी, यथायोग्य निवेदित केली आहे. चांगावटेश्वर यातील चांगा आणि वटेश्वराचे अद्वैतही प्रकट झाले आहे. म्हणून चांगदेव ही नामरूपाची उपाधी आपण सोडून स्वानंदसुखनिवासी झाला आहात.

हे चांगदेवा, पूर्णज्ञान अवस्थेने हा अनुभव येणे, अगदी स्वाभाविक आहे. त्याकरिता आता –

**चांगया पुढतपुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ति ।**
**वेद्य वेदकत्वहि अतीती । पदीं बैसे ।।६०।।**

घरा आलिया ज्ञानसंपत्ति, पूर्णज्ञान प्रतिती झाली आणि आत्मस्वरूप अवस्था प्राप्त झाल्याने; आपण आता 'वेद्य वेदकत्व' वेदांनी सांगितले. वेदकत्त्व अर्थात वेदांत ही, अतीत ठेवून; प्रत्यक्ष वेदांतपदीच निमग्न असावे. आत्मस्वरूप ज्ञान ही अद्वैत अवस्था भोगणे सुरू झाले की वेदातील वेदकत्त्व देखील ठायीच राहाते. कारण ही अवस्था म्हणजेच वेदांतपद होय. सच्चिदानंदपदी विराजमान झाल्यावर ज्ञान, अज्ञान, विज्ञान, पूर्णज्ञान यांची चर्चाच कशाला? प्रत्यक्ष पूर्णज्ञान ही संपत्ती, याचिदेही प्राप्त झाली की; जीवनमुक्त अशी अमृत दशा प्राप्त होते. निर्गुण, निराकार, निर्विकार अशा सच्चिदानंदपदी योगी विराजमान होतो. तोच सद्गुरू, तोच परब्रह्म, तोच आत्मस्वरूप, अद्वैत झाल्यावर ज्ञानाच्या उपाधीही त्यातच हारपतात. हीच अवस्था हे चांगदेवा, आपण आता भोगावी. असे अलौकिक ऐश्वर्य आपणास प्राप्त झाले आहे. त्याच स्वानंदसुखात, आपण अविनाशीपदी असावे. मी ब्रह्मस्वरूप आहे या ज्ञानबोधातच आपण असावे. हा अनुभव वैखरीने कसा कथन करणार?

**म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेंहि मौनकरी ।**
**हे पाणियावरी मकरी । रेखिल पां ।।१७।।**
(अमृ. – अ.१० ग्रंथ परिहार ओ. १७)

**चांगदेवा तुझेनि व्याजें । माऊलिया श्रीनिवृत्तिराजे ।**
**स्वानुभव रसाळ खाजे । दिधलें लोभें ।।६१।।**

हे चांगदेवा, तुझ्यावरील व्याजाने (प्रेमाने) माऊली श्रीनिवृत्तिराज यांनी आत्मस्वरूपाचे स्वानुभवरूपी रसाळ असे खाजे (खाजे नावाचे पक्वान्न) या

मौनाच्या अक्षरांच्या योगाने, रचलेल्या गोष्टीरूपी अक्षरांनी, आपल्याला माझ्याकडून सादर करविले आहेत. माझ्या पत्रातील स्वानंदरूपी आत्मानुभावाची, रसभरीत अनुभवांची भाषा हीच जणू पक्कान्न म्हणून आपल्या सन्मानार्थ, माझ्या सद्गुरू माऊलीने पाठवले आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. हा माऊलींचा, पक्कान्नस्वरूप आत्मानुभव आपण निजबोध म्हणून स्वीकारावा. कारण हे पक्कान्न आपल्यावरील लोभाने आपणास दिले आहे. माझ्या हातांनी ते आपणापर्यंत पोचविण्याचे भाग्य; मला आपल्यावरील लोभाने लाभले.

**एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसें । दोन्ही डोळस आरिसे ।**
**परस्पर पाहतां कैसें । मुकले भेदा ।।६२।।**

असो, ज्ञानदेव आणि चक्रपाणी (चांगदेवांचे एक नाव) असे- दोन्ही डोळस, अर्थात जाणकार आहेत. जाणिवेच्या आरशात परस्परांची प्रतिबिंबे परस्पर पाहतांना; दोघांनाही आपण एकच आत्मस्वरूप आहोत, याचा साक्षात्कार झाला. त्यांच्यातील मी आणि तू हा भेद नाहीसा झाला. दोन पूर्णज्ञानी परस्परांना भेटले की; ते पृथकपणाला, अर्थात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व अशा भेदाला मुकतात. आत्मस्वरूपाने उभयतात अद्वैत पाहतात. बिंब प्रतिबिंब न्यायाने विचार केला तर परस्पर आरशाच्या भूमिकेत येऊनही बिंब तेच प्रतिबिंब किंवा प्रतिबिंब तेच बिंबही नाही आणि प्रतिबिंबही नाही; असा केवळ डोळसपणा, अर्थात ज्ञानमयता निर्माण होऊन; दोघेही परस्पर भेदाला मुकले. दोघेही निर्गुण, निराकार असे आत्मस्वरूप अनुभवू लागले. त्यामुळे दर्पण दर्पण न राहता दर्पणही आत्मस्वरूप झाला. त्यामुळे -

**तियेपरि जो इया । दर्पण करील ओंविया ।**
**तो आत्मा एवढीया । मिळेल सुखा ।।६३।।**

त्याप्रमाणे जो यातील दर्पण ओंविया करील अर्थात भ्रामकता टाकून ज्ञानस्वरूप अवस्थेचे वर्णन करू लागेल; त्याला आत्मसुखाएवढेच आत्मसुख मिळणार. हे चांगदेवा, आपण उभयता, भेदास मुकलो असून; आपणच परस्परांचे बिंब आणि प्रतिबिंब झालो आहोत. एकरूपच नव्हे तर अद्वैत झालो आहोत. या अवस्थेचे वर्णन करण्यासाठी जो ओव्या करील तो आत्मसुखाएवढेच आत्मसुख मिळविल. येथे तर आम्ही, माऊली सद्गुरू



निवृत्तिनाथांच्या कृपेने, मौनाची अक्षरे जाणल्यामुळे, अद्वैत झालेलो आहोत. त्यामुळे ओव्या करणाराही (जो) भिन्न राहिला नाही. म्हणजेच ज्ञानदेवांनी केलेल्या ओव्या ह्या चांगदेवांनी केलेल्याच ओव्या आहेत. अर्थातच ज्ञानदेव आणि चांगदेव अभेदपणाने, अद्वैत योगाने, प्रत्यक्ष परब्रह्माएवढे आत्मसुख मिळविणारे ठरले आहेत. हे चांगदेवा, म्हणजे ही आम्ही रचलेली, मौनाच्या अक्षरांची गोष्ट वास्तविक आपणच रचलेली गोष्ट म्हणून; आत्मस्वरूपी जाणवते आहे. आता आपल्या उभयतात भेदच नाही; तर भेदाने कसे अनुभवणार? पूर्णज्ञानाचा अनुभव आपण अद्वैतभावाने भोगत आहोत. आता असे पाहा -

**नाहीं तेंच काय नेणों असे । दिसें तेंचि कैसें नेणो दिसे ।**
**असें तेंचि नेणों अपैसे । तें कीं होईजे ।।६४।।**

अस्तित्वातच नाही, ते माहीत नाही किंवा जाणत नाही; असे कसे होईल? जे दिसते आहेच ते दिसत नाही असे कसे म्हणता येईल? आहे तेचि जाणवत नाही; असे आपल्या अनुभवास कसे येईल? हे चांगदेवा, आपणात भेदच नाही. मग भेद जाणवत नाही असे कसे म्हणता येईल? तसे केल्यास मिथ्या भेदचर्चा केल्यासारखे होईल. आपण दोघे अद्वैत आहोत. आत्मस्वरूप आहोत. हे अनुभवत असतांना तसे जाणवत नाही; असे कसे म्हणता येईल? आता प्रत्यक्ष आपण उभयता परस्परांच्या भेदास मुकलो आहोत. अद्वैत झालो आहोत. सत्‌चिदानंद अशा आत्मस्वरूपात लीन झालो आहोत. असे घडले असतांना, तसे जाणवत नाही, असे कसे बरे होईल? तू आणि मी असा भेदच सरल्यावर कोरे पत्र आणि रचिली मौनाची अक्षरे भली, ह्यातील भेदच नाहीसा होऊन; केवळ आत्मस्वरूपानुभूतीच तेव्हढी जाणवते आहे. म्हणूनच हे चांगदेवा,

**निदे परौते निदैजणे । जागृति गिळौनि जागणें ।**
**केलें तैसें गुंफणें । ज्ञानदेवो म्हणे ।।६५।।**

हे चांगदेवा, आपण उभयतां सच्चिदानंदस्वरूप आहोत. तेंव्हा ही अवस्था लौकिक निद्रेपलिकडील निद्रेसारखी, लौकिक जागेपणाला गिळून; पूर्णज्ञानस्वरूप जागेपणाची आहे. या अवस्थेतील हे मौनाच्या अक्षरांचे गुंफणे, (ओव्या करणे) हेही आत्मस्वरूप अनुभूतीच्या सारखेच आहे. त्यात माझे आणि तुमचे

म्हणणे एकच झाले आहे. लौकिकाचे अवघे भेद, सच्चिदानंद स्वरूपाच्या महार्णवात नाहीसे होऊन; लौकिक आणि पारलौकिक असेही भेद आता राहिले नाहीत. अशा आत्मस्वरूप स्थितीत हा आत्मस्वरूपाचा आत्मसंवाद आहे इतकेच!

**महाराज :** गणोबा, माऊली ज्ञानोबारायांनी योगीराज चांगदेवांना, 'मौनाच्या अक्षरांनी' आत्मानुभव घडवून; प्रेमस्वरूपा आपल्यातच सामावून घेतले! (महाराज अनंतात पाहात उद्‌गारले)

**गणु :** महाराज!

गणुच्या डोळ्यांना आनंदधारा लागल्या होत्या. भान हरपून तोही अनुभवांमृतात सचैल स्नान करीत होता. महाराजांच्या हाकेने जणू त्याची अष्टसात्विकभावांसह लागलेली समाधी भंग झाली होती. मोठ्या भक्तिभावाने गणुने महाराजांच्या पायावर डोके ठेवले.

●●●



# ४. गृटिकांमृत

गणुने नेहमीप्रमाणे महाराजांना मनोभावे नमस्कार केला. अपेक्षेप्रमाणेच गणुने प्रश्नार्थक मुद्रा केली. महाराजांनी मनोमनी ओळखले.

**महाराज :** काय म्हणताय गणोबा? बोला. बोला, अगदी मोकळेपणाने बोला!

**गणु :** तसं नाही, महाराज, चांगदेव महाराजांचं भाग्य केवढं थोर! कोरा कागद पत्र म्हणून पाठवला आणि माऊलींनी तर त्यांना आत्मस्वरूप अनुभव घडवला.

**महाराज :** गणोबा, तो कोरा कागद साधा नव्हता. चौदाशे वर्ष तपश्चर्या करीत, स्वतःच्या गुरुकुलातून राजयोग, हटयोग, ध्यानयोग, समाधीयोग अशी ज्या ब्रह्मविद्येला नावं आहेत; त्या ब्रह्मविद्येत सिद्ध झालेल्या, महान योगीराज चांगदेवांचं ते पत्र होतं. कोरा कागद म्हणजे जणू मौनानेच, श्री चांगदेवांनी आपले मन, श्री ज्ञानेश्वरांजवळ उघड केलं होतं. त्यात चौदाशे वर्षांचे आणि त्याही पूर्वीच्या जन्मांचे संचित होते. गुरुकुलाच्या कुलगुरूंची प्रतिष्ठा होती. समाधीयोगाने सिद्धपदाला पोहोचलेल्या एका महान योग्याचे ब्रह्मविद्येतील सामर्थ्य एकवटले होते.

**गणु :** महाराज, हे एवढं सगळं त्या पत्रात मौनानं प्रकट केलं आहे, असं तरी कसं म्हणावं?

**महाराज :** योगीराज चांगदेवांची कीर्ति भारतवर्षात पसरलेली होती. गुरुमाऊली श्री निवृत्तिनाथांना, माऊली ज्ञानेश्वरांना, श्री सोपानदेवांना आणि श्री मुक्ताईंना श्री चांगदेवांचा अधिकार माहीत होता.

**गणु** : म्हणजे महाराज, श्री चांगदेवांना, आत्मस्वरूपानुभूती, सच्चिदानंदस्वरूपाचे ज्ञान होते?

**महाराज** : होय गणोबा, होय. परंतु गणोबा लौकिकात म्हणजे व्यवहारात, गुरुकुल चालविणाऱ्या सिद्ध पुरुषालाही, आपल्या आत्मस्वरूप अवस्थेचा विसर पडतो. अहंकार प्रकटतो. हा अहंकार त्याच्या आत्मस्वरूप अवस्थेला विचलित करतो. असा सिद्धपुरुष अहंकाराच्या आधीन गेला की; व्यावहारिक सत्ता, प्रतिष्ठा, अधिकार यांच्यातच स्वतःचे मोठेपण मिरवू लागतो. गणोबा अहो अशी उदाहरणे काय कमी आहेत. रावण, गरुड, परशुराम, विश्वामित्र अशी अगणित उदाहरणे देता येतील.

**गणु** : म्हणूनच 'चौदाशे वर्ष तप करूनही चांगदेव कोराच' असे उद्‌गार मुक्ताईंनी काढले. होय ना?

**महाराज** : अगदी बरोबर. मुक्ताई देखील 'कोरा' म्हणतांना श्री चांगदेवांच्या चौदाशे वर्ष तपाचा उल्लेख करतात.

**गणु** : म्हणजे महाराज, अहंकाराने विचलित झालेल्या चांगदेवांना त्यांच्या अवस्थेचे स्मरण करून देण्यासाठीच, हा खटाटोप, होय ना?

**महाराज** : तेव्हढेच नव्हे. गणोबा, मार्ग भटकलेल्या माणसाला सद्‌गुरूच पूर्णज्ञानावस्थेपर्यंत घेऊन जातो आणि पूर्णज्ञान अनुभूतीही घडवितो. सद्‌गुरूंपासून दूर गेलेल्याला सद्‌गुरूची भेट घडवून देण्यासाठीही, सद्‌गुरूच भेटावा लागतो. श्री चांगदेवांना असा सद्‌गुरू भेटावा व श्री चांगदेवासह सर्वांचे कल्याण व्हावे यासाठीच खटाटोप.

**गणु** : महाराज, माऊली निवृत्तिनाथांच्या आज्ञेवरून, माऊली ज्ञानेश्वरांनी पत्र लिहिले. म्हणजे श्री माऊली ज्ञानोबारायांनी श्री चांगदेवांना आत्मस्वरूप अनुभूती घडविली. याचा अर्थ माऊली ज्ञानोबारायच श्री चांगदेवांचे गुरू झाले. मग, निवृत्तिनाथांनी, मुक्ताईंनी श्री चांगदेवांना अनुग्रह द्यावा असे का सुचविले?

**महाराज** : गणोबा, तुझा प्रश्न मार्मिक आहे खरा. श्री चांगदेव योगमार्गाने सिद्ध झालेले होते. ही परंपरा नाथसंप्रदायाला जवळची आणि सारखी होती. मुक्ताईंचा नाथसंप्रदायातील अधिकार फार मोठा आणि जन्मतःच होता. शिवाय माऊली ज्ञानोबारायांनी भक्तिमार्गाला, भागवत संप्रदायाला जवळ केले होते. माऊलींनी अवतार कार्यही पूर्ण केले होते. मुक्ताई भावंडात सर्वात लहान



होत्या. श्री चांगदेवांना नाथसंप्रदायाचा सद्‌गुरू स्वरूपातील अनुग्रह देऊन; भागवत भक्तांचे, अर्थात भक्तियोगाचे महत्त्वही विदित करण्यास त्या योग्य होत्या. त्यांनी संत नामदेवांना देखील मार्गदर्शन केले होते. ह्या सर्व गोष्टींचा विचार श्री निवृत्तिनाथांना केला. मुक्ताबाईंनीच, कोरा कागद पाहाताच श्री चांगदेवांची परीक्षा केली होती हे लक्षात घेऊन; मुक्ताईंना, श्री चांगदेवांना अनुग्रहित करण्याची आज्ञा, श्री निवृत्तिनाथांनी दिली असावी. परमार्थात लौकिकातील वयोमान आणि ज्येष्ठता यांना अर्थ नसतो. आत्मस्वरूपी सिद्ध होणे महत्त्वाचे होते. शिवाय चौदाशे वर्षे तप केलेल्या, श्री चांगदेवांना लहानग्या मुक्ताईने अनुग्रहित करून; त्यांच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या अहंकाराचे समूळ उच्चाटन करता आले.

**गणु** : महाराज, मला आता केवळ एकच शंका आहे. माऊली ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या पत्राला आपण 'गुटिकांमृत' किंवा 'अमृतगुटिका' असे का बरे म्हणता?

**महाराज** : गणोबा, गुटिका ही दिसायला लहान असते, मात्र गुटिकेत तीव्रतर औषधीरस साठविलेले असतात. त्यामुळे रोग तर तात्काळ बरा होतोच. परंतु आरोग्यही बळावते. माऊली ज्ञानेश्वरांनी 'चांगदेव पासष्टी'च्या सादरीकरणाने श्री योगीराज चांगदेवांच्या बाबतीत दोन्ही गोष्टी साधल्या. शिवाय अकारण निर्माण झालेल्या अहंकारामुळे योगीराज चांगदेवांची अवस्था, हटवादी बालकासारखी झाली आहे; हेही श्री ज्ञानदेवांनी ओळखले. त्यामुळे कमीतकमी ओव्यांमध्ये, योगीराज, महाज्ञानी चांगदेवांना त्यांच्याच भाषेत, सहज समजेल अशा रितीने भावार्थदीपिका आणि अमृतानुभवातील अध्यात्मरसाची तीव्रतर मात्रा तयार करून; मित्राच्या, मातेच्या आणि सद्‌गुरूच्या भूमिकेतून; अतिनम्रतेने, विचक्षणतेने, माऊली ज्ञानेश्वरांनी योगीराज चांगदेवांना दिली आणि अलौकिक अशा आत्मस्वरूप अवस्थेचा साक्षात्कार घडविला.

**गणु** : महाराज, उपनिषदांचे सार असलेल्या श्रीमद्‌भगवद् गीतेवर विस्तृत भाष्य भावार्थदीपिकेच्या रूपाने माऊली ज्ञानोबारायांनी केले. 'अमृतानुभव' हा श्री ज्ञानेश्वरांचा ग्रंथ म्हणजे अद्वैत साक्षात्काराचे अलौकिक दर्शन होय असे आपण सांगितले. 'शिवशक्ती समावेशन' यावरील हे विश्वव्यापी चिंतन आहे असा गौरव आपण केलात. तसे 'चांगदेव पासष्टी'चे विशेषत्व काय आहे?

**महाराज** : खूप चांगला प्रश्न विचारलास, गणोबा योगसाधनेने शुद्धचित्त

होऊन; आत्मस्वरूप झालेल्या श्री चांगदेवांच्या सिद्ध अवस्थेला; अवस्था आणि अधिकाराच्या अहंकाराने निर्माण झालेल्या ढगांनी, मलिनता आणली होती. माऊली ज्ञानेश्वरांनी श्री माऊली निवृत्तिनाथांच्या आज्ञेने, कोऱ्या पत्राला, 'चांगदेव पासष्टी' म्हणजे पासष्ट ओव्यांमध्ये सूत्ररूप पत्र लिहिले. हे सूत्ररूप अद्वैत निरुपण, म्हणजे स्नेहाळ अशा, आत्मस्वरूपाने, आत्मस्वरूपावर आलेले अहंकाराचे मळभ दूर करून; पुन्हा आत्मस्वरूप साक्षात्काराने पावन करणारे हे निरुपण आहे. हा वरवर पाहाता मैत्रभावाने साधलेला संवाद वाटला; तरी कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून, मौनाच्या अक्षरांनी केलेला आत्मसंवादच आहे. म्हणून हे गणोबा, हे केवळ श्री चांगदेवांना लिहिलेले, आत्मस्वरूपदर्शन घडविणारे, लेखन नव्हे तर जो जो वाचक, भोक्ता, साधक हा सूत्ररूप संवाद अनुभवेल; त्याला त्याला आत्मानुभवाचे सुख प्राप्त होईल. तो तो आत्मस्वरूप होण्याचे भाग्य मिळविण्यास पात्र होईल.

**गणु** : म्हणजे महाराज, 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' या विस्तृत ग्रंथांपेक्षाही 'चांगदेव पासष्टी'चे महत्त्व अधिक आहे.

**महाराज** : खरे तर तीनही ग्रंथ आत्मसाक्षात्काराचे दर्शन असून; साधकाला अद्वैत सिद्ध करणारे आहेत. परंतु प्रत्येक ग्रंथाचे एक निश्चित असे अनन्य स्थान आहे. 'चांगदेव पासष्टी'तून आत्मानुभव घ्यावयास सिद्ध झालेल्या साधकाला वाचकाला, श्री चांगदेवांसारखे शुद्धचित्त जाणकार असण्याची अट आहे. म्हणून गणोबा, आपल्यासारख्या वाचक साधकांनी वारंवार जाणून घेण्याचा प्रयत्न करणे, आवश्यक आहे. अन्यथा, पढतमूर्खाची अवस्था होईल. म्हणूनच या श्री ज्ञानेश्वर दर्शनाचा अभ्यास करीत राहाणे हेच आपल्या आधीन आहे हे लक्षात घे.

**गणु** : महाराज, माऊली ज्ञानेश्वरांनी, हे पत्र, सूत्ररूपाने लिहिले आहे, असे म्हणालात, ते कसे?

**महाराज** : सूत्ररूपाने पत्र लिहिले, असे मी म्हणालो; तरी पासष्ट ओव्यांचे अवघेपण लक्षात घ्यायला हवे. माऊलीने, स्वतःलाच, स्वतःचे, लडिवाळ बालक आहोत, असे कल्पून, स्वतःच, स्वतःला आरोग्यसंपन्न करण्यासाठी, अमृतगुटिकेचे, वळसे मौनाच्या अक्षररूपी मकरंदात उगाळून, ती गुटिका, लडिवाळ बालकरूपातील स्वतःला, मैत्र ममतेने आणि लाघवाने, चाखविली आहे. वरवर पाहाता, जरी श्री माऊली ज्ञानेश्वर, योगीराज चांगदेवाला,



आत्मप्रतीतीच्या साक्षात्काराच्या अवस्थेचे भान आणून देण्यासाठी, संवाद करीत आहेत, असे वाटले तरी; समोर श्री योगीराज चांगदेव म्हणजे, स्वतःतील हटवादी चंचल, तरी निरागस बालक असल्याची जाणीव ठेवून; हा संवाद केला आहे. मातेने बाळाला गुटी पाजतांना गोडीगोडीत घ्यावे, गुटी चाटवावी आणि चाटवून झाले की 'झाऽलं!' असे म्हणावे; तशा कौशल्याने हा मित्रसंवाद, आत्मसंवाद होऊन प्रकटला आहे. सूत्ररूप संवादातील एकेका मुद्याचे, टप्प्याचे, तत्त्वाचे आवश्यक तेव्हढे वळसे, शुद्धचित्तरूपी सहाणेवर, उगाळले आहेत. त्या क्रमाने आत्मसाक्षात्कारासाठी अहंकाराचे मळभ दूर करीत. एकेक ओवी पुढे पुढे नेत 'गुटिकांमृत' चांगदेवांच्या गळी उतरविले आहे.

गणोबा, लौकिक व्यवहार, प्रथेप्रमाणे पत्राला, मायना लिहिणे ही माऊली ज्ञानेश्वरांनी नाकारले आहे. कारण त्यांना योगीराज चांगदेवांना तात्काळ परमात्म्याच्या केवलतेची आणि सर्वात्मकतेतही लीलाविग्रहाची आठवण करून द्यायची होती. म्हणून त्यांनी चांगदेवांचे कल्याण चिंतून थेट आत्मस्वरूपाच्या, ऐश्वर्ययोगाला, लीलेला, श्री चांगदेवांच्या ठिकाणी अनुभूत करायला सुरुवात केली. श्री चांगदेव हे वटेश्वरस्वरूप आहेत, याची जाणीव करून देऊन, श्री ज्ञानदेव आत्मसंवाद करतात –

**स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ।**
**दावी मग ग्रासु । प्रगटला करी ।।१।।** चां.पा. ।।

वटेशु अर्थात परमात्मा अथवा अनंत अवकाशस्वरूप सच्चिदानंदघन, जेव्हा जगदाभास दाखवितो, जगाच्या रूपाने नटतो तेव्हां जगताचे ठिकाणी, जीवाला, आपल्या मूळ सच्चिदानंदस्वरूपाचा विसर पडतो. जणू तो अनंत वटेशु लपून राहिला आहे. जेव्हां या जगदाभासात सर्वात्मकतेने अंतरात्मा म्हणून तोच आहे; असा आत्मसाक्षात्कार घडून; आत्मस्वरूप म्हणजे वटेशु प्रकटतो तेव्हा हा जगदाभास व्यर्थ वाटतो. जणू स्वतः प्रकटताच, नटलेल्या रूपांचा त्याने ग्रास घेतला आहे. एवंच वस्तुतः परमात्मा आणि जीव, जगत, जीवात्मा असे द्वैत नाहीच; तर अद्वैत आहे. याकडे श्री ज्ञानदेव लक्ष वेधतात. जीवात्मा हाच परमात्मा आहे, याची ग्वाही देऊन; श्री योगीराज चांगदेव हे आत्मस्वरूपच आहेत. या अनुभूतीचे वर्णन करतात. श्री चांगदेवांना

समजावतात-

**तेवी शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।**
**प्रकाशे, तें एकसरी । संवित्ति ।।१२।।** चां.पा.।।

शिवतत्त्वाच्या योगाने, लीलेने अनेक प्रकारचे पदार्थ, पृथ्वीवर भासतात; तरी शिवतत्त्व प्रकाशले, आत्मसाक्षात्कार झाला; की सर्वांतरी ते एकच 'संवित्ति' तत्त्व असल्याचे लक्षात येते. हे पदार्थ म्हणजे एकात्मपणे 'संवित्ति'च प्रकाशल्याचे जाणवते. आत्मस्वरूपानुभूती येते.

**तें वीं आपणचि आपुला पोटीं । आपणयां दृश्य दावित उठी ।**
**द्रष्टा, दृष्य, दर्शन त्रिपुटी । मांडे तें हे ।।१८।।** चां.पा.।।

ते अनंत अविनाशी अवकाश, ते निर्गुण, निराकार, निर्विकार 'संवित्ति' तत्त्व, ते कैवल्य, ते आत्मरूप, ते सच्चिदानंदरूप असे; अनेक ज्ञानी आत्मानुभूवींनी, ज्याचे वर्णन केले आहे, ते कैवल्य, आपणच, आपल्या पोटातून, आपल्यालाच दृश्य रूप ते दाखवू लागतो. अर्थात ते जगत्‌रूपाने नटते, आणि ते स्वतःच द्रष्टा, दृश्य आणि दर्शन अशी त्रिपुटी स्वरूपात मांडणी करते. वास्तविक ते कैवल्य आहे म्हणजेच अविनाशी, निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंद असे संवित्ति, निजरूप आहे.

**जें म्हणतां नयें कांहीं । जाणो नये कैसे ही ।**
**असतचि असे पाही । असणें जया ।।३०।।** चां.पा.।।

ज्याला गुण आकार असे काही नाही. ते कसे आहे हे जाणताही येत नाही. तरी तेच सत्य आहे, अस्तित्वात आहे, असे त्या सच्चिदानंद स्वरूपाचे, अर्थात आत्मस्वरूपाचे असणे आहे.

**यालागीं मौनेंचि बोलिजे । कांही नहोनि सर्व होईजे ।**
**नव्हता लाहिजे । कांहींच नाही ।।३३।।** चां.पा.।।

याकरता ते भाषेत किंवा शब्दात वर्णन करता येत नाही; म्हणून मौनांनेच त्याविषयी बोलावे; अर्थात अनुभव घ्यावा; कारण लौकिक किंवा दृश्य जगतात ते स्वतः काहीही किंवा कोणतेही रूप, कोणताही पदार्थ न होता ही; सर्व पदार्थ व रूपे तेच असते. काहीही न होताही होते, असते; असे ते



आत्मस्वरूप आहे. त्या आत्मस्वरूपाची अवस्था प्राप्त झाली की; सर्व दृश्यारूपात आपणच आहोत, सर्व दृश्यरूपे आपल्यातच आहेत; तरी आपण यात कोठेही नाही; तरी आपण आहोत; याची अनुभूती येते. हीच कैवल्याच्या अस्तित्वाची खूण होय. तसे आपण आत्मस्वरूपच आहात.

हे योगीराज चांगदेवा आपण तर -

**तया पुत्र तूं वटेश्वराचा ।  रवाजैसा कापुराचा ।**
**चांगया, मज तुज आपणयाचा । बोल एक ।।३७।।** चां.पा.।।

कापुराचा कण ही कापूरच असतो; तसे आपण वटेश्वरस्वरूप म्हणजे आत्मस्वरूपच आहात. माझी जाणीव आणि आपली जाणीव एकच आहे. म्हणूनच 'मज तुज बोल एक' अर्थात आपण उभयता आत्मस्वरूपच आहोत, एकच आहोत. मग पत्र आणि उत्तर असा भेदबोल कसा असेल?

म्हणूनच हे योगीराज चांगदेवा -

**तैसीं अप्रमेयें प्रमेयें भरलीं । मौनाची अक्षरें भली ।**
**रचोनि गोष्टी केली । मेळियाची ।।५५।।** चां.पा.।।

पत्रोत्तराचा प्रश्नच नाही. मौनात आपण उभयता अद्वैत असे आत्मस्वरूपच आहोत. ज्ञान अज्ञान ही त्या आत्मस्वरूपात हारपले आहे. त्या अवस्थेत, खरेतर, प्रमेयच (सिद्धांत) नाहीत. कारण ती आत्मस्वरूप अवस्था हे सिद्धप्रमेय आहे. असे असूनही मी केवळ ती मौनानुभूती अक्षरात रचण्याची गोष्ट केली, प्रयत्न केला. वास्तविक वेदांनाही ते शब्दात सांगता आले नाही. असे हे कैवल्य अर्थात आत्मस्वरूप, अप्रमेय आहे. कारण स्वतःच निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदरूप प्रमेय म्हणून सिद्ध आहे. आपण त्या आत्मस्वरूपाचा अनुभव घेत असावे.

हे चांगदेवा,

**चांगया पुढतपुढती । घरा आलियां ज्ञानसंपत्ति ।**
**वेद्य वेदकत्वहि अतीती । पदी बैसे ।।६०।।**

हे योगीराज, पुढतीपुढती अर्थात ज्ञान, भक्ती, वैराग्य क्रमाने, अर्थात योगसाधनेने, ज्ञानसंपत्ति घरी आली, अर्थात आत्मसाक्षात्कार झाला. आत्मस्वरूप स्थिती प्राप्त झाली की; वेदांनी सांगितलेल्या, वेदकत्वाच्या अर्थात वेदांच्याही

अतीत असे पद अर्थात कैवल्यस्वरूप म्हणजेच संवित्तिस्वरूप, सच्चिदानंदस्वरूप प्राप्त होते आणि मायास्वरूप दृष्ट जगताचा, त्या स्वरूपात विलय झाल्याचा, अनुभव होते, तेंव्हा हे सर्व विश्वही मीच आहे, परमात्माही मीच आहे, तरी मीपणापलिकडे मी आहे; असे आत्मस्वरूप जाणते. तेंव्हा श्री ज्ञानेश्वर, श्री चांगदेव, सद्‍गुरू आणि शिष्य, ज्ञानी आणि अज्ञानी परमेश्वर आणि भक्त अशा द्वैतांचा ग्रास, आत्मस्वरूपात घेतला जातो. आणि केवल अवस्था, मौनावस्था, अक्षर अर्थात अविनाशी, निर्गुण, निराकार, निर्विकार अशी अवस्था प्राप्त होते. त्या सच्चिदानंद अवस्थेतच निमग्न होण्याचे भाग्य लाभते. म्हणूनच हे चांगदेवा 'मौनाची अक्षरे भली.'

अशाप्रकारे श्री ज्ञानेश्वर माऊलींनी एकप्रकारे गुटिकामृत चांगदेवांना सादर केले. श्री चांगदेवांची वृत्ती पालटली. अहंकार सांडला. भक्तिज्ञानवैराग्याची, भागवत वहिवाट प्रशस्त झाली.

●●●



# ५. श्री चांगदेवांचे निवडक अभंग

'चांगदेव पासष्टी' या अमृतगुटिकेने श्री योगीराज चांगदेवांत पालट झाला. नाथसंप्रदाय सोडला नाही तरी; नाथ-भागवत प्रयागात, श्री निवृत्ति, श्री ज्ञानदेव, श्री सोपानदेव, श्री मुक्ताई, श्री विसोबा खेचर, श्री नामदेव या संतांच्या मेळाव्यात, श्री चांगदेव रमले. संत मुक्ताईंकडून अनुग्रह घेतला. संत मुक्ताईंनी बालकाला दीक्षा द्यावी, तान्हुल्याला पान्हा घालावा, तसे श्री चांगदेवांना निजबोध केला. भागवत संतांच्या प्रभावळीत, भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि ज्ञानोत्तर भक्तीच्या वहिवाटेने, चांगदेव चालू लागले. समाधिस्त होईपर्यंतचा हा प्रवास नाथ-भागवत मेळ्यात घडला. श्री योगीराज चांगदेव, संत चांगदेव झाले. मेळाव्यातील विभूतिमत्त्वांप्रमाणेच, वृत्ती पालटल्यावर अभंगरचना केली. या नाथ-भागवत संगमावर, त्यांची भावावस्था, त्यांनी लिहिलेल्या अभंगातून प्रसिद्ध झाली आहे. श्री ज्ञानेश्वर-चांगदेव आणि संत मुक्ताई-चांगदेव यांच्या भेटीनंतरची श्री चांगदेवांची झालेली अवस्था काही निवडक अभंगातूनही प्रत्ययास येते.

**मुक्ताबाई-चांगदेव संवाद**

(१) मी माझें दुरित आशापाश चित्तीं । मोह ममता भ्रांति अहंभावें ।।१।।
हरितसे तेज अभीमान ताठा । एकतत्त्वें वैकुंठा हरिपाठे ।।२।।
नाशिवंत देह पंचतत्त्व मोळी । वायांचि वाहाटुळी उडोनि जाये ।।३।।
मुक्ताई जीवन चांगया दिधलें । निर्गुणी साधिलें घर कैसे ।।४।।

२) गुण ना निर्गुण शब्दातीत । तेथें तूं निश्चिंत बाळा निज ।।१।।
पाळणा लावीला हृदय कमळीं । मुक्ताई जवळी सादविते ।।२।।
शांति क्षमा विदेह पैं वर्णिती । नांव पैं ठेविती अद्वैतासी ।।३।।
वटेश्वरसुत चांगा अवधुत । मुक्ताई शांतावीत ज्ञान दृष्टी ।।४।।

३) निर्गुणाचे डाहाळीं पाळणा लाविला । तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ।।१।।
निज निज बाळा न करी पैं आळी । अनुहात टाळी वाजविते ।।२।।
तेथें निद्रा ना जागृति भोगी पैं उन्मनी । लक्ष तो भेदुनि निजणा तो ।।३।।
निभ्रांत पाळी पाळणा विणवुनी । मन हें बांधोनि पवन दोरा ।।४।।
एकविस सहस्र सहाशें वेळे बाळा । तोहि डोळा स्थिर करी ।।५।।
निद्रा ना जागृति निजसी काई । परियेसी चांगया बोले मुक्ताई ।।६।।

४) चांगा जन्मला माध्यान्ह काळीं । मायबापें दोन्ही नाहीशीं जालीं ।।१।।
मुळींच चांगा नाहींसा जाला । मुक्ताई म्हणे चांगया भला भला ।।२।।
वटेश्वर चांगा मुळीं लागला । पोसणा घेतला मुक्ताईने ।।३।।

५) रावळींचे कर चुकले जाण । गिवसिताती साहीजणें वेळोवेळा ।।१।।
करीं कर धरियला मुष्टीं । करें समावलें आपुल्या दृष्टीं ।।२।।
मुक्ताई करें लेईलें अंजन । चांगया निधान उपदेशिलें ।।३।।

६) आकाशाचा शेंडा घार रांधी मांडा । काडला वाढी कांदा कुल्लाळ भोजन करी ।।१।।
दिहा पडे चांदणें रात्री पडे उष्ण । चोर घरटी घाली तराळ घाली खाण ।।२।।
सासूनें खादलें उंडे सुन तरले । लेकी लासली जांवाई गडबडा लोळे ।।३।।
धमकत घुसळण घातलें पारी । वटेश्वरसुता म्हणे मुक्ताई अवधारी ।।४।।

७) टेंकावरी टेंकल्यावरी टेंकुली । तेथें एक बाळी विस्मो करी ।।१।।
तिचें नांव काय त्याचें नांव काय । विचारोनि पाहे मनामाजी ।।२।।
डोळियांतील बाहुली जालीसे गरुवारु । तिशी सुईण मेळवा अरुवारु ।।३।।
सुईचें आणीवर रचिलें पाठार । मुक्ताई म्हणे चांगया सांग याचा विचार ।।४।।



**उपदेशपर**

८) भावेंभक्ति करूनी वैराग्य जोडसी । तरी तूं पावसी ब्रह्म सुख ।।१।।
ज्ञानतत्त्वीं करी करी हा विचार । निर्गुणीं आकार निरामय ।।२।।
चांग्या सोय घरी ज्ञानवटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारीं बोध करी ।।३।।

९) मुक्त होतासि तो कां बद्ध जालासी । आपल्या बंधने आपण बांधलासी ।।१।।
सांडी बंधन सोय धरी गव्हारा । जाई मूळस्थाना आपुलिया ।।२।।
तेथींचा तेथें राही परीयेसी । चांगयाशीं बोले मुक्ताई ।।३।।

१०) देवी देवो जाला भावसी अबोला । निमोनि उरला आपपरे ।।१।।
आधीं आप वाहीं मग पडें वाही । प्रपंच डोहीं बुडो नका ।।२।।
जंव नाहीं कृपा गुरु फळीं बापा । तंव कैसेनी दीपा पावशील ।।३।।
मुक्ताई चांगया तत्त्वे तत्त्व लया । हरिभावी माया हरपली ।।४।।

**ज्ञानपर**

११) अवघीया डोळां पाहू गेलीये । तंव अवघा अवघेंचि जालिये ।।१।।
काय सांगों गे माये अवघाचिं आहे । अवघेनसी पाहे वटेश्वरी ।।२।।
अवघेपणाची मज पडली भ्रांती । अवघाचि मी संतीं सांडवलो ।।३।।
वटेश्वर चांगा अवघाचि आहे । अवघेनसी पाहे वटेश्वरी ।।४।।

१२) एकविस सहस्रशतें उच्छासी । तो योगियां अभ्यासी स्थिर स्थिर ।।१।।
गमन गमन नाहीं संसार पै नाहीं । वटेश्वरीं सोय सांगितली ।।२।।
वटेश्वरी चांगी जिव्हाळा । सोहं शब्दीं राहिला वटेश्वरी ।।३।।

१३) पतिव्रता नारी व्यभिचार केला । परपुरुष पूजिला बाईयो वो ।।१।।
पतिव्रता नारी ऐसे म्हणावे । नाम पै ठेवावें अव्यक्तासी ।।२।।
चांगा द्वैत होता तो अद्वैत जाला । सोहंशब्दीं राहिला वटेश्वरी ।।३।।

१४) सहजसमाधीं बैसला योगी । सुषुन्मार्गीं निरोधोनियां ।।१।।
गोल्हारमंडळ भेदोनियां जाय । नाहीं ते पाहे डोळेभरी ।।२।।
चांगा वटेश्वर सोहं जाला । अवघाचि गिळीयेला बाईयेवो ।।३।।

१५) वऱ्हाडी आले संसारनगरा । चांगा नोवरा केळवला ।।१।।
हातीं कांकण उभा वटेश्वरीं । शांति हे नोवरी पर्णावया ।।२।।
पर्णिली शांति बैसली पाटीं । मुक्ताई करवली हळदुली वाटी ।।३।।

१६) आत्मा हा नोवरा कुडी हे नोवरी । लिंबलोण करी वोहरासी ।।१।।
सोहळा जाला नोवरा गांवा गेला । वेगीं आईती करा नोवरी बोलवा ।।२।।
न्हाणिली धुणिली जगस्कंधीं मिरविली । बोलवीत गेली चौघेजणें ।।३।।
ज्याची नोवरी त्या हातीं लाविली । चांगा म्हणे आतां निश्चिंत झाली ।।४।।

**कूट**

१७) सासूचे आधीं सून जन्मली । सून मारून सासू नोवरी झाली ।।१।।
आचोजीं चोजविलें । तें स्वर्गीं जाणवलेरें भाई ।।२।।
पुत्र पितियाचा व्रतबंध करी । वांझ सासू कन्यादान जे नोवरी ।।३।।
सिद्धांतींचे वर्म अनुभवी जाणे । वटेश्वर चांगा बोलिला खणें ।।४।।

'श्री सकलसंतगाथा' या प्रा.डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या, पुणे येथील सारथी प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या (ऑगस्ट २००० शके १९२२) संतगाथा खंड पहिला मधील, 'श्री चांगदेवांचे अभंग' या संग्रहात एकूण ४६ अभंग दिले आहेत. (अभंगाची वर्गवारी त्यांच्या संग्रहानुसार केली आहे) श्री चांगदेवांच्या अभंगावर भाष्य करणे, हे या ग्रंथात अपेक्षित नाही. माऊली ज्ञानेश्वर आणि भावंडे यांची भेट झाल्यानंतर श्री चांगदेवांमध्ये काही बदल झाला काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी काही निवडक अभंग येथे वानगीदाखल घेतले आहेत. त्या अभंगांवर नजर टाकल्यास, श्री चांगदेवांमध्ये काही प्रमाणात वृत्तीचा पालट नक्कीच झाला हे लक्षात येते. सगुण निर्गुणाची चर्चा चांगदेवांनी या भावंडांच्या मार्गाने केली आहे हे लक्षात येते. प्रतिमा, रूपके आणि कूट रचनांचे, श्री ज्ञानदेव आणि मुक्ताई यांच्या चरणातील, प्रतिमा रूपके व कूटे यांशी साम्य आहे. श्री चांगदेव महाराज हे श्री वटेश्वरांचे पुत्र, श्री वटेश्वरांचे सत्‌शिष्य, असे योगमार्गाने सिद्धज्ञानी होत. त्यांची साधना नाथ संप्रदायाला, सदृश्य स्वरूपाची आहे. त्यामुळे अभंगामध्येही ते 'सिद्धांतींचे वर्म अनुभवी जाणे' असे म्हणतात. तसेच 'एकविससहस्रशते' साधनेचा उल्लेख करून; द्वैत आणि अद्वैत स्थितीविषयी प्रांजळ भाष्य करतात. अभंगाच्या शेवटी नाममुद्रेबरोबर काही अभंगात नव्याने सद्‌गुरूपदी लाभलेल्या मुक्ताईंचा मोठ्या भक्तिभावाने आणि लडिवाळपणाने उल्लेख करतात. मात्र 'चांगावटेश्वर' हा उल्लेख सर्वत्र असतोच. अनेक अभंगांमध्ये केवळ वटेश्वरांचा उल्लेख आढळतो. नाथसंप्रदायातील योगसाधनेचा, अद्वैत सिद्धीचा उल्लेख सर्वच अभंगात आहे. कूटरचना तर थेट मुक्ताईंशी साधर्म्य सांगणाऱ्या आहेत. आता संशोधकांना यांत प्रश्न पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. चांगदेवांचे सर्व अभंग हे श्री ज्ञानेश्वर, मुक्ताई यांच्याशी झालेल्या भेटीनंतरचे आहेत का? चौदाशे वर्षे स्तंभनपूर्वक हटयोग साधना करीत गुरुकुल चालविणाऱ्या श्री चांगदेवांनी नेमकी अभंगरचना केव्हां सुरू केली असेल? चौदाशे वर्षे म्हणजे श्री ज्ञानदेवांपूर्वी चौदाशे वर्षे अर्थात इ.पूर्व दोनशे वर्षाचा विचार केला तर श्री चांगदेवांच्या अभंगरचना आणि त्यातील विषय मांडणी बुचकळ्यात टाकणारी वाटते. याचा अर्थ या भावंडांच्या भेटीपूर्वी अभंगरचना आणि 'तत्त्वसार' या रचना केल्या नसाव्यात. केलेल्या असतील तर त्यातील भाषा कोणती असावी व त्या रचना नेमक्या आहेत तरी कोठे? याची आज खात्रीलायक कोणतीही माहिती हाताशी नसतांना, केवळ एवढेच म्हणता येते की, आदिनाथ सिद्ध भगवान शिव यांच्या मार्गाने थोर योगसाधना करणारा हा योगी, नाथ परंपरेतील सर्व योगविद्या पारंगत होता. पूर्णसिद्ध, समाधीयोग ज्ञानी असा सद्‌गुरू होता. शिष्यपरिवार मोठा असावा व तो नाथसंप्रदाय वा सिद्धसंप्रदायात समाविष्ट झाला असावा. त्यातील काही शिष्यवर्ग भागवत संप्रदायास येऊन मिळाले असावेत. चांगदेवांना चक्रपाणींसह अनेक नावे होती. तरी श्री चांगदेव हे निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आणि नामदेव यांशी साधर्म्य असलेले नाव अधिक प्रसिद्ध आहे. भागवत मेळाव्यात दाखल झाल्यानंतरही, नाथसंप्रदायाचा प्रभाव अतिशय टोकदारपणे जाणवतो. अर्थात यातील बहुतेक विधाने केवळ तर्काधीन आहेत. असे असले तरी श्री चांगदेवांच्या निमित्ताने आत्मस्वरूपज्ञान घडविणारा संक्षिप्त ग्रंथ 'चांगदेव पासष्टी' रूपाने सर्वांना प्राप्त झाला. श्री ज्ञानेश्वर माऊलींचा; मौनाच्या अक्षरांच्या स्वरूपातील मित्रसंवादांच्या कारणाने 'आत्मसंवाद' तथा आत्मसाक्षात्कार सर्वसामान्यांपर्यंत पोचविणारा ग्रंथ प्रगटला, हे केव्हढे भाग्य!

**संदर्भ ग्रंथ :–**

१) श्री सकलसंतगाथा खंड १ व २, संपा. प्रा.डॉ. र. रा. गोसावी.
२) ज्ञानेश्वरी
३) अमृतानुभव
४) चांगदेव पासष्टी

●●●